


श्री १०८ आचार्य शांतिसागरमहाराज यांचे संघासह

**श्री अतिशयक्षेत्र दहिगांव येथील रथाची नैमित्तिक मिरवणूक.**

श्री १०८ चारित्रचक्रवर्ति आचार्य

# शांतिसागर महाराज



श्रीक्षेत्र दहिगांव येथें प्रतिष्ठेच्यावेळीं

माघ शु॥ ७ संवत् १९९५ रोजीं घेतलेला फोटो.

M P, Phaltan. )

# कवलचांद्रायणव्रतकथा

## भाग १ ला

# प्रास्ताविक शब्द



चंद्रकलेप्रमाणें या कवलचांद्रायणव्रतांत एक एक घास (कवल) वाढवीत जाणें व कमी करीत जाणें असा याचा विधि असल्यामुळें यास कवलचांद्रायणव्रत म्हणतात. हें व्रत अधिक मास वर्ज्य करून कोणत्याही महिन्यांत करण्याची शास्त्राज्ञा आहे; तथापि अधिक मासांत क्षयातिथि नसल्यास हें व्रत करण्याची रूढी आहे. व्रतनिर्णयपुस्तकांत हें व्रत हिवाळ्यांत व पावसाळ्यांत करावें असें म्हटलें आहे. व तें उत्तम, मध्यम व जघन्य अशा तीन प्रकारानीं करितां येतें.

(१) कोणत्याही महिन्याच्या अमावाइयेचा उपवास करून शुद्ध १ पासून एक एक घास वाढवीत शुद्ध १४ स चवदा घास घेणें. पौर्णिमेचा उपवास करून वद्य १ स पुन्हां चवदा घास घेणें. पुढें दररोज एक एक घास कमी करीत वद्य १४ स एक घास घेणें. अमावाइयेचा उपवास करून शुद्ध १ स पारणें करणें हा *उत्तम विधि होय. (२) अमावाइयेचा उपवास करून प्रतिपदेपासून एक एक घास वाढवीत पौर्णिमेस पंधरा घास घेणें. वद्य प्रतिपदेपासून एक एक घास कमी करीत वद्य १४ स एक घास घेणें. वद्य अमावाइयेचा उपवास करून शुद्ध १ स पारणें करणें हा §मध्यम विधि होय. (३) अमावाइयेचा उपवास करून शुद्ध १ पासून एक एक घास वाढवीत शुद्ध १५ स पंधरा घास घेणें. वद्य १ पासून एक एक घास कमी करीत वद्य १४ स एक घास घेऊन अमावाइयेचें पारणें करणें हा †जघन्यविधि होय.

---

* जिनसेनकृत हरिवंशपुराण श्लोक ९१ सर्ग २४ वा.

§ व्रतनिर्णयग्रंथ व अपभ्रंशभाषाकथा.

† किसनसिंहकृत क्रियाकोष.

या व्रताबरोबरच दीपचांद्रायण, धूपचांद्रायण, फलचांद्रायण हींही व्रतें करितां येतात. ज्याप्रमाणें घास वाढविणें व कमी करणें तसेंच दीप, धूप व फलें वाढवीत व कमी करीत *जिनपूजा करावी. हें व्रत §मारवाडी ( शास्त्रीय ) महिन्याप्रमाणें पौर्णिमेचा उपवास करून वद्य प्रतिपदेपासूनही करितां येते. पूर्वी इकडेही वद्य पक्षांत व्रतारंभ करण्याची परिपाठी होती.

हें व्रत ज्या महिन्यांत करावयाचें त्या महिन्यांत क्षयतिथि व वृद्धितिथि नसावी हा उत्तमपक्ष. वृद्धितिथि असल्यास ज्या तिथीची वृद्धि असेल ती तिथि दुबार करावी हा मध्यमपक्ष. ज्या महिन्यांत क्षयतिथि असेल व व्रत करणें अगदींच आवश्यक असेल तर वद्य १४ अगर शुद्ध १४ चा उपवास करून व्रतारंभ करावा व वद्य ३० अगर शु॥ १५ स व्रत पूर्ण करावें. अशी शास्त्राज्ञा आहे. तथापि वद्य ३० अगर शुद्ध १५ स व्रतारंभ करून शुद्ध अगर वद्य १ स व्रत पूर्ण करणेची रूढी आहे. कारण " शास्त्राद्रूढीर्बलीयसी "

या व्रतांत लापसीचा किंवा चुरम्याचाच घास घेण्याचा कोणत्याही विधींत निर्बंध नाहीं. कोणत्याही शुद्ध अन्नाचा घास घेण्याची आज्ञा आहे. त्याचप्रमाणें दुसऱ्यानें हातांत घास देण्याची पण आवश्यकता नाहीं तथापि कोणा माहितगार व्यक्तींचें समक्षच घास घेणें योग्य आहे. पहिला घास ज्या प्रमाणांत घेतला असेल तेंच प्रमाण सर्व घासांचें असावें. घासाचें प्रमाण शास्त्रांत एक हजार तांदळाचें सांगितलें आहे. यावरून घास मोठ्या कागदी लिंबा एवढा असावा. यापेक्षां मोठा नसावा. लहान घेण्यास हरकत नाहीं.

---

* व्रतनिर्णय ग्रंथ.

§ यशःकीर्तिकृत कवलचांद्रायणव्रतोद्यापन-आधार-मंत्र व श्लोक—ॐ ह्रीं चांद्रायणव्रते शुक्ले पूर्णमासादिने पंचदशग्रासमुक्तभुक्तद्योतनाय ।

या व्रताची मूळकथा अपभ्रंश भाषेंत आहे. त्याचें मराठी हिंदी भाषांतर छापले आहे. आम्हीं मूळ कथेची प्रत फार अशुद्ध असल्यामुळें ती शुद्ध करून त्याची शब्दशः हिंदी भाषांतरेंही प्रसिद्ध केलीं आहेत. या कामी मूळ प्रत शुद्ध करून व त्याचे हिंदी अनुवाद करून थोडी प्रस्तावनाही जोडून दिल्यामुळें श्री. प्रो हिरालालजी किंग एडवर्ड कॉलेज अमरावती व श्री. कोठारी मोतीचंद गौतमचंद एम. ए. संपादक जैनबोधक यांचें आम्हीं फार आभारी आहोत. व पं. बंशीधरजी सोलापूर, श्री. प्रो. ए. एन. उपाध्ये डी. लिट् राजाराम कॉलेज कोल्हापूर यांनींही या कथेच्या संशोधनाचें व अनुवादाचें कामीं पूर्ण सहाय्य केले असल्यामुळें त्यांचे आम्हीं फार आभारी आहोंत. त्याचप्रमाणें हें पुस्तक प्रकाशनाचें कामीं श्री. पं. जिनदास पार्श्वनाथ फडकुले, न्यायतीर्थ व गुणपाल दादा कचे यांची बरीच मदत झाल्यामुळें त्यांचेही आम्हीं फार आभारी आहोंत.

मूळ प्रत येथील ब्रा. ब्र. हिराचंद अमोलिक यांचें भंडारांतील व एक प्रत श्रीक्षेत्र दहिगांव येथील श्रीमहातिसागर शास्त्रभंडारांतील व श्री. प्रो. हिरालाल यांच्या जवळील दोन प्रती याप्रमाणें चार प्रतीवरून शुद्ध करून छापल्या आहेत. सर्वांच्या सोईकरितां मूळ अपभ्रंश भाषेच्या कथेचें व श्री. देवेंद्रकीर्तिकृत संस्कृत चांद्रायणव्रतोद्यापनाचें मराठी छंदबद्ध भाषांतर आमचे बंधु चि. खुशालचंद यांनीं केलेलें सोबत जोडलें आहे. त्याचप्रमाणें हरिवंशपुराणांतील व्रतविधिचे श्लोक व व्रतनिर्णयांतील श्लोक, अनुवाद, किसनसिंहकृत हिंदी छंदबद्ध कथा, श्रीदेवेंद्रकीर्तिकृत संस्कृत चांद्रायणव्रतोद्यापन, श्री. जीवराज देवचंद यांनीं केलेली मराठी छंदबद्ध कथा व मराठी कथा सोबत छापल्या आहेत. या पुस्तकांत श्रीयशःकीर्तिकृत

---

येनं ये कुरुते नरो व्रतवरं चांद्रायणाख्यं मुदा ।
मासादेः प्रतिपत्तिथौ च गृह्णेत (?) कृष्णाद्यपक्षाच्छुभं ॥
मासैकैकमप्याधिकं (?) कुरु बुधा घस्रांत त्वं पंचदिक् ।
एकैकं कवलं विमुच्य सुखदं मासांतपूर्णा तिथौ ॥

कवलचांद्रायण उद्यापन छापण्याचा आमचा विचार होता, परंतु ती प्रत फार अशुद्ध असल्यामुळें छापली नाहीं. ईडरचें भंडारांत एक प्रत सं. १८६७ सालची लिहिलेली आहे पण तीही अशुद्धच आहे. ती शुद्ध करून ईडरनिवासी रा. दोशी केवळदास रावजी छापविणार आहेत.

या पुस्तकांत कवलचांद्रायणाची शक्य तितकी माहिती व शुद्ध पाठ छापून प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे; तथापि हस्तदोषां-मुळें व इतर कांहीं कारणामुळें कोठें अशुद्धि राहिली असल्यास त्याबद्दल वाचकांनीं क्षमा करून दोष कळविण्याची कृपा करावी. पुढील आवृत्तींत दुरुस्त करूं. या पुस्तकाचा सर्वांनीं स्वाध्याय करून लेखकास व प्रकाशकास उपकृत करावें एवढी विनंति करून बरीच लांबलेली प्रस्तावना संपवितों.

फलटण
ता. १३-९-२९.

वाङ्मयसेवक—
वीरचंद कोदरजी गांधी.

---

## प्रस्तावना

'चांद्रायणव्रतकथा' की दो मूल प्रतियां तथा उनकी नकल मेरे पास फलटण ( सातारा ) निवासी श्रीमन् वीरचंद कोदरजी गांधीने संशो-धनार्थ भेजी थी। इनमेंसे एक प्रति ५॥×११ इंचके पोथीके आकारमें है इन पत्रोंपर ७९–८० पृष्ठ संख्या दी हुई यह प्रति बहुत प्राचीन और शुद्ध दिखती है। और दूसरी प्रति ७×४ इंचके गुटकाकार चार पत्रोंमें समाप्त हुई है। इन पत्रोंपर ४६४,४६५,४६६ पृष्ठ संख्या दी हुई है। यह प्रति अर्वाचीन

है। जिससे जान पडता है ये दोनों कथायें किसी बृहत् संग्रहोंके एक अंशमात्र है। इनमें अनेक जगह पाठ अशुद्ध और छूटा हुआ है। मेरे पास दो अन्य कथासंग्रहकी प्रतियां है जिनमें भी मुझे यह व्रतकथा मिलगई। यद्यपि इन संग्रहोंका पाठ भी बहुत त्रुटित और अशुद्ध है, पर चारों पाठोंको साम्हने रखनेसे शुद्ध पाठ तैयार करना बहुत कुछ सरल होगया।

इस कथाके कर्ताका नाम कथाके प्रारम्भमें शुभचंद्र मुनि दिया हुआ है। उन्होंने यह व्रतविधान एक राजा जिनका नाम कुवलयचंद्र या प्रजापाल था, और उनकी राणी विनयश्रीको सुनाया था, जिसे सुनकर उन्होंनें वह व्रत धारण किया और सद्गति प्राप्त की। ये शुभचंद्रमुनि कौन थे और कब हुये इसका अभी निर्णय करना कठिन है।

इस कथाकी भाषा अपभ्रंश है जो नौवी शताब्दिसे तेरहवी चौदहवी शताब्दितक देशके भिन्न भिन्न भागोंमें सुप्रचलित रही और जिसनें हिंदी, गुजराथी और मराठी भाषाओंको जन्म दिया। इस भाषाके ग्रंथ अभी अभी जैन भंडारोंमें बहुत मिले हैं और मिलते जारहे हैं। इनके प्रकाशमें आनेसे भारतीय भाषाविकासके इतिहासकी अनेक गुत्थियां सुलझनेकी आशा की जाती है। इस भाषाका साहित्य जैनियोंकी अनुपमनिधि है।

श्रीमान् गांधीजीके आग्रहसे मैंने इस कथाका हिंदी अनुवाद भी कर दिया है। गांधीजीकी इस धार्मिक प्रेरणाके लिये मैं उनका अनुगृहीत हूं। बिना उनके तीव्र प्रेरणाके कमसे कम अभी मैं इसके संशोधन व अनुवादकी ओर चित्त देनेमें असमर्थ रहता।

---

किंग एडवर्ड कॉलेज.
अमरावती,
ता. २४-७-३८.

प्रो. हिरालाल जैन

# प्रस्तावना

इस कथाके रचयिता के नाम, ग्राम आदि विषयोंमें मैं कुछ भी नहीं कह सकता। इस कथा के प्रारंभ में जो शुभचन्द्र मुनीश्वरका नामोल्लेख पाया जाता है वे ही इस द्रव्यकथा के रचयिता हैं ऐसा किन्हीं २ विद्वानों का मत है, किन्तु मैं उनसे सहमत नहीं हो सकता। मेरे ख्यालसे इस कथा के रचयिता भगवान् शुभचन्द्र मुनीश्वर न होकर अन्य कोई विद्वान् आचार्य या पंडित मालुम होते हैं। यह बात इस कथाका आद्यंत भाग देखनेसे मालुम होती है।

"पुणु" यह पद प्रारंभिक अंशमें देखनेसे मालुम हो सकता है कि प्रजापाल महाराजने जो अनेक प्रश्न मुनिमहाराजको पूछे थे उनमें से एकका यह कथा उत्तररूप है। अतः स्पष्ट होजाता है कि यह कथा किसी प्राकृत कथाकोषसे उध्दृत की है।

अनुयोग करनेवाले राजा का नामाभिधान कुवलयचंद न होकर मेरे ख्यालसे प्रजापाल नरेंद्र है। उसके राणी का नाम भी विनयश्री नहीं मालुम होता। राजा का नाम कदाचित् प्रजापाल भी नहीं होगा। उन दोनों का नाम कथाकोष के प्रारंभिक अंशमें मिल सकेगा।

फलटण
ता. १३-९-२९. } मोतीचंद गौतमचंद कोठारी.
एम्. ए.

# प्रस्तावना ( पुरवणी )

प्रस्तावना छापल्यानंतर श्रीश्रुतसागरविरचित कवलचांद्रायणव्रतकथा (संस्कृत) झालरापाटण येथील श्री. ऐ. पन्नालाल दि० जैन सरस्वती भवनमधून मिळाल्यामुळें ती मूळकथा व त्याचें मराठी भाषांतर श्री. पं. जिनदास शास्त्री सोलापूर यांचेकडून करवुन त्याचप्रमाणें त्याचे मराठी छंदबद्ध भाषांतर आमचे बंधु चि० खुशालचंद यांचेकडून करवून ते सोबत जोडलें आहे. कवलचांद्रायणव्रतकथा संस्कृत व त्यांचं भाषांतर भाग २ मधील पृष्ठ १५ ते २८ पर्यंत श्रीधर प्रेस, सोलापूर येथें छापिलें आहे; व बाकीचें सर्व काम येथील श्रीमालोजी-विजय प्रेस, फलटण येथें छापिलें आहे.

मिति आषाढ शु॥. १५ सं. १९९८ वी. सं. २४६८

वाङ्मयसेवक,

**वीरचंद कोदरजी गांधी**

# अनुक्रमणिका

## भाग १ ला.


| विषय | कर्ता | पृष्ठ |
|---|---|---|
| प्रस्तावना ( पुरवणी ) ... ... ... | ... | ७ |
| अनुक्रमणिका ... ... ... | ... ... | ८ |
| जम्बूस्वामी स्तुति ... ... | खु० को० गांधी... | १० |
| ज्ञानीपुरुषाचें लक्षण ... ... | श्री. द्यानतरायजी | १४ |
| पंचकल्याणिकाचें पद ... ... | श्री. भागचंदजी | १४ |
| कवलचांद्रायणव्रतकथा ( मराठी गद्य ) ... | वी० को० गांधी... | १५ |


## भाग २ रा.


| विषय | कर्ता | पृष्ठ |
|---|---|---|
| व्रततिथिनिर्णय ... ... ... ... | ... | १ |
| चांद्रायणव्रतविधि ... ... ... ... | ... | ५ |
| कवलचंद्रायणवयकहा ... ... ... | ... | ७ |
| चांद्रायणव्रतकथा हिंदी भाषनुवाद | प्रो. हिरालालजी जैन... | ९ |
| ” ” | प्रो. मो. गो. कोठारी... | १२ |
| कवलचांद्रायणव्रतकथा ( संस्कृत ) ... | श्री. श्रुतसागर ... | १५ |
| कवलचांद्रायणव्रतकथा ( मराठी भाषानुवाद ) ... | पं. जिनदासशास्त्री... | २५ |


## भाग ३ रा.


| विषय | कर्ता | पृष्ठ |
|---|---|---|
| कवलचांद्रायणव्रतकथा ( मराठी छंदबद्ध ) ... | खु. को. गांधी... | १ |
| ” ... | जिवराज देवचंद... | १५ |

## भाग ४ था


| विषय | कर्ता | पृष्ठ |
|---|---|---|
| चांद्रायणव्रतकथा (मराठी छंदबद्ध) | खु० को० गांधी... | १ |
| चंद्रप्रभुअष्टक व प्रत्येक पूजा ... | ,, ... | ७ |
| चांद्रायणव्रतकथा ( हिंदी ) ... | किसनसिंह... | १९ |
| समुच्चय प्रत्येकपूजा ( संस्कृत ) ... | भ० देवेंद्रकीर्ति .. | २० |
| जम्बूस्वामींनी दीक्षा रास स्तुती, पदें वगैरे ... | ... | २९ |
| श्रीशांतिसागराष्टक ... | खु० को० गांधी... | |

# श्रीजम्बूस्वामी स्तुति

( चालः—उद्धवा शांतवन कर जा )

केवली जंबुस्वामीचें । निर्वाणस्थान उत्कृष्ट ॥ ध्रु० ॥
मथुरा चौऱ्यासी ऐसें । नमुं भाव धरोनी सुष्ट ॥
घेउनी बालपणीं दीक्षा । साधिलें जयें ज्ञाणिं मोक्षा ॥
तच्चरित्र संक्षेपांत । वदण्या बुद्धि मज होत ॥

चालः—तज्जननी बोले बाला ।
योग्य न तव वय दिक्षेला ॥
मम आण गळ्याची तुजला ॥

सुकुमारा जाइ न विपिनीं । विरहानलिं लोटुनि जननी ॥ १ ॥
उगवतां भानु कां राहे । मनिं शोधुन अपुल्या पाहे ।
संसृती-सौख्य आजवरी । भोगुनी वीट ये भारी ॥
ज्ञानी न पडे या फंदीं । आत्मीं रत परमानंदी ॥

चालः—शशिविना चांदनी कैसी ।
तारकाविणें निशि जैसी ॥
पतिवाचुन भामिनि तैसी ।

मज नसे कोणि आधार । नच घेई संयमभार ॥ २ ॥
पिंजरा जरी मणिमयसा । शुक मानि तयापरि बंध ।
त्यासमान संसृतिभोग । ज्ञानीजन मानिति फंद ॥
माता बोले मज अंधा । बाळा तूं यष्टी खास ।
मज तूंच प्राणआधार । जग शून्य तुझ्याविण सारे ।

चालः—मुळिं सार न संसारांत ।
जन फसति मोहजालांत ॥
किति झाले माता तात ।

हा जन्ममृत्युचा फेरा चुकवाया पथ हा श्रेष्ठ ॥ ३ ॥
वध महाव्रतें हीं पांच । अति दुर्धर मेरुच पांच ।
परिषह बाविस जिंकाया । संजमहि तिक्ष्ण असिधार ॥
त्या प्रबल मोहनियकर्मा । संयम-असि करिं घेऊन ।
मी महाव्रतें आचरुन । परिषह बाविस साहून ॥

चालः—करि क्षणांत चक्काचूर ।
जरि बाल महारणधीर ॥
जगिं खराच तो हो वीर ।

हें सत्य जाणुनी माते । दे आज्ञा संयमिं मातें ॥ ४ ॥
पिंपळ पुष्पाविन अथवा । फल नसतां नागरवेल ।
त्यापरि स्त्रियापरिवार । नित झुरे आई तव फार ॥
कास या रडे भगिनी गे । माता परिवारासाठीं ।
स्त्री रडे सुखास्तव ऐसी । धिक्! धिक्!! धिक्!!! हा संसार ॥

चालः—दुःखी इतुक्या जीवासी ।
लोटुनि कां शिव वांछीसी ॥
कां कष्ट असे साहीसी ।

सोडुनी मृदुल शय्येला । भूसेज रुचे कां तुजला ॥ ५ ॥
मज ये न आड मम जननी । मी घेइन संयमभार ॥
चौऱ्यासिलक्ष योनींत । भ्रमती नित जीव समस्त ।
मी केवलि होउन माते । बोधीन भव्य जीवांतें ॥
होईल मुक्तिसहवास । अष्टम भूमाजीं खास ।

चालः—विनविता परीजन माता ।
विद्युत्तस्कर तत्कांता ॥
भवदेव पूर्वभवस्मरतां ।

आळवितां नच तो बळला । वनिं जाउनि नमि मुनिचरणा ॥ ६ ॥
दे प्रदक्षिणा त्या तीन । बैसे मुनिसन्निध नमुन ॥
मुनि वदती जंबुकुमारा । सुख भोगी बालपणांत ॥
घे दिक्षा वृद्धपणीं वा । शिव साधी तप आचरून ॥

चालः—ऐकुनी मुनींचे बोल ।
संसारसौख्य हें फोल ॥
संसृतीं नारि विषवेल ।

जर असें सत्य सुख यांत । त्यजिति कां चक्रि तीर्थेश ॥ ७ ॥
भो मुनीवरा मज द्यावी । जिनदिक्षा बिनती हीच ।
मुनि समजावित जरि त्यास । सुविचार न किंचित ढळला ॥
असतां चोविस वर्षांचा । दिक्षा घे जंबुकुमार ।
चांद्रायणव्रत उत्कृष्ट । आचरून प्रभु विधियुक्त ।
करि पंचमुष्टि निज लोच । हो घोर तपें कैवल्य ॥
जे लोकालोक प्रकाश । ऐसें हो केवलज्ञान ।

चालः—मथुरा चौऱ्यांसी स्थान ।
जंबूस्वामी निर्वाण ॥
वंदितां आत्मकल्याण ।

जय जय जय मंगलकार । स्तव करा नारि नर सतत ॥ ८ ॥
भवदेव द्वितिय शिवदेव । दिविं विद्युन्माली देव ।
जिनमती साध्वि गर्भांत । अर्हद्दासांच्या सदनीं ॥
अवतरला जंबकुमार । यापरि घेउन भव चार ॥

श्रेणिकभूपाच्या समयीं । नगरी राजगृहीं रुचिर ।
दाखवी पराक्रम थोर । वय लहान असतांनाही ॥
जिंकिला मोहप्रबलारी । मग कथा काय इतरांची ।

चालः—जे अंतिम केवलि होत ।
करुं भावें त्या प्रणिपात ॥
तत्क्षणिं अघ विलया जात ।

नत दास वदि तच्चरणीं । गुण चिंतुनि वारंवार ॥ ९ ॥

## ज्ञानीपुरुषाचें लक्षण ॥ पद ॥ राग–आसावरी

भाई! ज्ञानी सोई कहिये ॥ टेक ॥ करम उदय सुख दुख भोगेतें, राग विरोध न लहिये ॥ भाई० ॥ १ ॥ कोऊ ज्ञान क्रियातें कोऊ, शिवमारग बतलावें ॥ नय निहचै विवहार साधिकें, दोऊ चित्त रिझावें ॥ भाई० ॥ २ ॥ कोई कहै जीव छिनभंगुर, कोई नित्य बखानें ॥ परजय दरवित नय परमानें, दोऊ समता आनें ॥ भाई० ॥ ३ ॥ कोई कहै उदय है सोई, कोई उद्यम बोलै ॥ द्यानत स्यादवाद सुतुलामें[१], दोनों वस्तैं[२] तोलै ॥ भाई० ॥ ४ ॥

---

## ॥ जिनेश्वराच्या पंचकल्याणिकाचें पद ॥ राग–सोरठ

स्वामीजी तुम गुन अपरंपार, चंद्रोज्वल अविकार ॥ टेक ॥ जबै तुम गर्भमांहि आये, तबै सब सुरगन मिलि आये ॥ रतन नगरीमें बरषाये, अमित अमोघ सुढार ॥ स्वामीजी० ॥ १ ॥ जन्म प्रभु तुमने जब लीना, न्हवन मंदरपै हरि कीना । भक्ति करी सची सहित भीना, बोला जय-जयकार ॥ स्वामीजी० ॥ २ ॥ जगत छनभंगुर जब जाना, भये तब नगनवृत्ती बाना ॥ स्तवन लौकांतिकसुर ठाना, त्याग राजको भार । स्वामीजी० ॥ ३ ॥ घातिया प्रकृति जबै नासी, चराचर वस्तु सबै भासी ॥ धर्मकी वृष्टि करी खासी, केवलज्ञानभंडार ॥ स्वामीजी० ॥ ४ ॥ अघाती प्रकृति सुविघटाई, मुक्तिकान्ता तब ही पाई ॥ निराकुल आनंद असहाई, तीनलोकसरदार ॥ स्वामीजी० ॥ ५ ॥ पार गणधर हू नहिं पावै, कहांलग भागचन्द गावै ॥ तुम्हारे चरणांबुज ध्यावै, भवसागरसों तार ॥ स्वामीजी० ॥ ६ ॥

---

१ उत्तम तराजूमें. २ वस्तूएं.

# ॥ कवलचांद्रायणव्रतकथा ॥

( लेखकः—वीरचंद कोदरजी गांधी )

पूर्वी या भूमंडलावर पुत्रवत् प्रजेचें पालन करणारा प्रजापाल ( कुवलयचंद्र ) नांवाचा राजा राज्य करीत होता. त्याला ‡पतिभक्तिपरायण अशी विनयश्री नांवाची प्रियपत्नी होती. कोणे एके वेळीं कामविकाराला जिंकिलें आहे ज्यांनीं अशा श्रीशुभचंद्रमुनींना नमस्कार करून राजानें मोठ्या विनयानें विचारिलें कीं, महाराज! या पृथ्वीतलावर कवलचांद्रायणव्रत कोणी केलें होतें? त्याचें फल काय प्राप्त झालें? ते कसें करावें? व त्याचा उद्यापनविधि कसा करावयाचा? वगैरे सांगण्याची कृपा करावी.

राजाचा प्रश्न ऐकून आचारशास्त्राचे मर्म जाणणारे असे ते मुनीश्वर म्हणाले, हे आसन्नभव्य राजा! कवलचांद्रायणाचा विधि तुला सांगतों स्थिरचित्त करून ऐक.

व्रतिकानें चार कषाय ( क्रोध, मान, माया, लोभ ), विषय व चार प्रकारच्या आहारांचा ( अन्न, पान, खाद्य, लेह्य ) त्याग करून अमावास्येचा *उपवास करून परमात्मस्वरूपाचें चिंतन करावें. नंतर शुक्ल प्रतिपदेच्या दिवशीं एका शुद्ध चैतन्यस्वरूप आत्म्याचें ध्यान करून एक घास ग्रहण करावा. द्वितीयेला व्यवहार व निश्चयनयानें आत्मस्वरूपाचा व श्रावक–यति धर्माचा विचार करून दोन घास घ्यावेत. तृतीयेला सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, सम्यक्चारित्र या रत्नत्रयस्वरूप आत्म्याचें चिंतन

---

‡ कुलधर्म पाळण्यांत तत्पर.

अभ्युत्थानमुपागते गृहपतौ तद्भाषणे नम्रता ।
तत्पादार्पितदृष्टिरासनविधौ तस्योपचर्या स्वयम् ॥
सुप्ते तत्र शयीत तत्प्रथमतो जह्याच्च शय्यामिति ।
प्राच्यैः पुत्रि निवेदिताः कुलवधू सिद्धान्तधर्मा इमे ॥

* कषायविषयाहारो त्यागो यत्र विधीयते ।
उपवासः स विज्ञेयो शेषं लंघनकं विदुः ॥

करून तीन घास घ्यावेत. चतुर्थीला चार *पुरुषार्थांचें ( धर्म, अर्थ, काम, मोक्ष) चिंतन करून सत्पात्राला चार प्रकारचें †दान (आहारदान, औषधदान, अभयदान, शास्त्रदान ) देऊन चार घास ग्रहण करावेत. पंचमीला पंचाचाराचें ( दर्शनाचार, ज्ञानाचर, चारित्राचार, तपाचार, वीर्याचार ) चिंतन, करून पांच घास ग्रहण करावेत. षष्ठीला षट्द्रव्यांच्या ( जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश, काल ) स्वरूपाचें चिंतन करून सहा घास घ्यावेत. सप्तमीला ||सप्तपरमस्थानाचें चिंतन करून सात घास घ्यावेत. हे चारित्रवान् राजन्! अष्टमीला सम्यग्दर्शनाच्या आठ ‡अंगांचा विचार करून आठ घास घ्यावेत. नवमीला नऊ पदार्थांचें ( जीव, अजीव, आस्रव, बंध, संवर, निर्जरा, मोक्ष, पुण्य, पाप ) चिंतन करून नऊ घास घ्यावेत. दशमीला दशधर्मांचें ( उत्तमक्षमा, मार्दव, आर्जव, सत्य, शौच, संयम, तप,

---

*द्रव्य उपार्जुनि कुटुंब पोसिती । धर्म न करिती कांहीं एक ॥ध्रु०॥ जैसे वनिं पशु चारा उपार्जिति । पाडस पाळिती मोहबळें ॥१॥ धर्म नाहीं तेथें पशु म्हणविला ॥ तैसा नर झाला धर्माविण ॥२॥ धर्म, अर्थ, काम तिन्हींही साधिजे । सफळ करिजे नरजन्म ॥३॥ कणाविण भूस निर्फळ हें जैसें । धर्माविण तैसें अर्थ काम ॥४॥ धर्मेंकरूनिया तरिजे संसारा । महतिसागरा धर्म तारू ॥५॥

†ज्ञानवान् ज्ञानदानेन, निर्भयोऽभयदानतः ।
अन्नदानात्सुखी नित्यं, निर्व्याधिर्भेषजाद्भवेत् ॥

||सज्जातिसद्गृहस्थत्वं पारिव्राज्यं सुरेंद्रता ।
साम्राज्यं परमार्हत्यं निर्वाणं चेति सप्तधा ॥

‡पाळी हें दर्शन निःशंकितादिक । दोष शंकादिक न पाळितां ॥ध्रु०॥ निःशंकिता होय निर्भय धर्मार्थी । निर्वांछा भोगार्थी निःकांक्षिता ॥१॥ निंदा वर्जुनीया निर्विचिकित्सिता । मूढत्व टाकितां अमोढ्य हा ॥२॥ जिनशासनाचे दोष आच्छादन ॥ ते उपगूहन पांचवा हा ॥३॥ संस्थितिकरण बोधुनि भ्रष्टासि । प्रीति साधर्मीसी वात्सल्य हा ॥४॥ प्रकाश धर्मांचा प्रतापें उत्कृष्ट ॥ प्रभावनोद्भट प्रभाव हा ॥५॥ दर्शनाचे अष्ट आचार हे पाळी । अष्टदोष टाळी महति म्हणे ॥६॥

त्याग, आकिंचन्य, ब्रह्मचर्य ) चिंतन करून दहा घास घ्यावेत. एकादशीला आकरा प्रतिमांचें ( दर्शन, व्रत, सामायिक, प्रोषध, सचित्तत्याग, रात्रिभोजनत्याग, ब्रह्मचर्य, आरम्भत्याग, परिग्रहत्याग, अनुमतित्याग, उद्दिष्टाहारत्याग ) स्वरूप लक्षांत आणून आकरा घास घ्यावेत. द्वादशीला श्रावकाच्या बारा व्रतांचें ( अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य, परिग्रहप्रमाण हीं पांच अणुव्रतें; दिग्व्रत, देशव्रत, अनर्थदंडव्रत, हीं तीन गुणव्रतें; देशावकाशिक, सामायिक, प्रोषधोपवास, वैयावृत्य हीं चार शिक्षाव्रतें ) चिन्तन करून बारा घास घ्यावेत. त्रयोदशीस पापनाशक तेरा प्रकारच्या चारित्राचें ( अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य अपरिग्रह हीं पांच महाव्रतें; ईर्या, भाषा, एषणा, आदाननिक्षेपण, व्युत्सर्ग ह्या पांच समिति; मनोगुप्ति, वचनगुप्ति, कायगुप्ति ह्या तीन गुप्ति ) चिंतन करून क्रमप्राप्त ग्रहणयोग्य तेरा घास घ्यावेत. ( घासाचें प्रमाण मोठ्या कागदी लिंबापेक्षां जास्त नसावें ). चतुर्दशीला श्रावकाच्या चौदा ‡ गुणांचें चिंतन करून आसक्ति रहित चौदा घास घेणें. भोजनावर आसक्ति ठेवल्यानें मानसिक शुद्धि नष्ट होते सबब 'आसक्ति रहित' हें विशेषण सर्व ठिकाणीं लावावयाचें आहे. पौर्णिमेला पंधरा योगांचें ( सत्यमनोयोग, असत्यमनोयोग, उभयमनोयोग, अनुभयमनोयोग हे चार मनोयोग; सत्यवचनयोग, असत्यवचनयोग, उभयवचनयोग, अनुभयवचनयोग हे चार वचनयोग; औदारिककाय०, औदारिकमिश्रकाय०, वैक्रियककाय०, वैक्रियकमिश्र०, आहारककाय०, आहारकमिश्र०, कार्माणकाय० हे सात काययोग; असें १५ योग ) चिंतन करून पंधरा घास घ्यावेत.

---

‡ न्यायोपात्तधनो यजन्गुणगुरून्सद्गीस्त्रिवर्गं भज- ।
न्नन्योन्यानुगुणं तदर्हगृहिणीस्थानालयो ह्रीमयः ॥
युक्ताहारविहार आर्यसमितिः प्राज्ञः कृतज्ञो वशी ।
शृण्वन्धर्मविधिं दयालुरघभीः सागारधर्मं चरेत् ॥११॥

वय १ ला ||मिथ्यात्वाचा त्याग करून चौदा *मार्गणाच्या स्वरूपाचें चिंतन करून चौदा घास घ्यावेत. वय २ ला रागद्वेषाचा त्याग करून तेरा †द्वीपांच्या स्वरूपाचा विचार करून तेरा घास घ्यावेत. वय ३ ला तीन ‡मूढतेचा त्याग करून बारा प्रकारच्या ¶तपाचें व बारा अनुप्रेक्षांचें ( अनित्य, अशरण, संसार, एकत्व, अन्यत्व, अशुचि, आश्रव, संवर, निर्जरा, लोक, बोधिदुर्लभ, धर्म ) चिंतन करून बारा घास घ्यावेत. वय ४ ला चार विकथेंचा ( स्त्रीकथा, राष्ट्रकथा,

---

||लोकीं नाहीं पाप मिथ्यात्वा समान ॥ सम्यक्त्वासमान धर्म नाहीं ॥ध्रु०॥
नीचदेवभक्त कुगुरुसेवक ॥ कुज्ञानपाठक कुमती जो ॥१॥
कुधर्मी होऊनी करी कुतपासी ॥ पावे कुगतींसी मिथ्यात्वी तो ॥२॥
महति म्हणती मिथ्यात्वी जो जीव ॥ भोगी दुःख सर्व कुगतींचें ॥३॥

*गइ-इंदिये च काये, जोये वेये कसाय-णाणे य ।
संजम-दंसण-लेस्सा-भविया-संमत्त-संण्णि-आहारे ॥१॥

†जंबूद्वीप, धातकीखंडद्वीप, पुष्करवरद्वीप, वारुणीवरद्वीप, क्षीरवरद्वीप, घृतवर, क्षौद्रवर, नंदीश्वरवर, अरुणवर, अरुणभासवर, कुंडलवर, रुचकवर, भुजंगवर.

‡देवशास्त्रगुरु याहाचे जे गुण ॥ न घेती अज्ञान त्रिमूढ ते ॥ ध्रु० ॥
भावें देवमूढ अर्हतासि मानी ॥ स्वरूप न जाणे अर्हताचें ॥१॥
भावें शास्त्रमूढ जिनशास्त्र ऐके ॥ अर्थ न विलोके त्या शास्त्राचा ॥२॥
भावें गुरुमूढ गुरुभक्ति करी ॥ वचन न धरी सद्गुरूचें ॥३॥
ऐशा मूढपणें सम्यक्त्व मळीन ॥ अशुद्ध श्रद्धान महति म्हणे ॥४॥

¶अनशन ऊनोदर करै, व्रतसंख्या रस छोर ।
विवित्तशयन आसन धरै, कायकलेश सुठोर ॥
प्रायश्चित धर विनय जुत, वैयाव्रत स्वाध्याय ।
पुनि उत्सर्ग विचारकै धरै ध्यान मन लाय ॥

भोजनकथा, चोरकथा ) त्याग करून आकरा *अंगांचें चिंतन करून आकरा घास घ्यावेत. वद्य ५ ला पांच पापांचा ( हिंसा, असत्य, चोरी, कुशील, परिग्रह ) त्याग करून दहा प्रकारच्या भाषासमितींचा ( भावसत्य, उपमासत्य, व्यवहारसत्य, प्रतीतिसत्य, संभवनासत्य, जनपद-सत्य, संवृतिसत्य, नामसत्य, स्थापनासत्य, स्वरूपसत्य ) विचार करून दहा घास घ्यावेत. वद्य ६ला § सहा अनायतनाचा त्याग करून † नवधाभक्तीचा विचार करून नऊ घास घ्यावेत. वद्य ७ ला सात ‡ व्यसनांचा त्याग करून ज्ञानाच्या आठ ||अंगांचा विचार करून आठ घास घ्यावेत. वद्य

---

*प्रथमहि आचारांग गणि, दूजो सूत्रकृतांग। ठाणअंग तीजो सुभग, चौथो समवायांग ॥ व्याख्या पण्णति पंचमो, ज्ञातृकथा षट आन। पुनि उपासका-ध्ययन है, अन्तःकृत दश ठान ॥ अनुत्तरणउत्पाद दश, सूत्रविपाक पिछान। बहुरि प्रश्नव्याकरणजुत, ग्यारह अंग प्रमाण ॥

§ कुगुरु, कुदेव, कुर्धम धर, कुगुरु, कुदेव, कुधर्म।
इनकी करे सराहना, षड अनायतन कर्म ॥

† पडिगहमुच्चठाणं पादोदयमच्चणं च पणमं च।
मणवयणकायसुद्धि एसणसुद्धि च विधिमाहुः ॥
अलुब्धता श्रद्धा भक्ति। ज्ञान दया शांति शक्ती ॥
सप्त गुण हे ज्याचे अंगीं। तोचि सृष्ट दाता जगीं ॥

‡ द्यूतमांससुरावेश्याखेटचौर्यपराङ्गनाः।
महापापानि सप्तैव व्यसनानि त्यजेद्बुधः ॥

|| ज्ञानाचे आचार अष्टही पाळून ॥ प्रदीप्त तें ज्ञान हृदयीं होये ॥ धृ० ॥ गुरु सांगे तैसें उच्चारी अक्षर ॥ प्रथम आचार जाणिजे हा ॥१॥ गुरु सांगे अर्थ तो सर्व झेलावा ॥ दुसरा जाणावा आचार हा ॥२॥ शब्द अर्थ दोनी संपूर्ण झेलीजे ॥ आचार जाणीजे तिसरा हा ॥३॥ चतुर्थ पाठ हा घोकी योग्य काळीं ॥ नियम सांभाळीं पांचवा हा ॥४॥ षष्टम विनय जोडी हस्त दोन ॥ गुरुचें स्तवन सातवा हा ॥५॥ अष्टम गुरुचा करी बहुमान ॥ मग होय ज्ञान महति म्हणे ॥६॥

८ ला *आठमदाचा त्याग करून सात नयांचा ( नैगम, संग्रह, व्यवहार, ऋजुसूत्र, शब्द, समभिरूढ, एवंभूत ) विचार करून सात घास घ्यावेत. बध ९ ला नऊ नोकषायांचा ( हास्य, रति, अरति, शोक, भय, जुगुप्सा स्त्रीवेद, पुंवेद, नपुंसकवेद ) त्याग करून षट्‌कालाच्या ( सुखमासुखमा, सुखमा, सुखमादुखमा, दुखमासुखमा, दुखमा, दुखमादुखमा ) स्वरूपाचा विचार करून सहा घास घ्यावेत. बध १० ला दहा प्राणांचा ( स्पर्शन रसन, घ्राण, चक्षु, श्रोत्र हीं पांच इंद्रियें; मनोबल, वचनबल, कायबल, हें तीन बल; आयुष्य व श्वासोच्छ्वास ) हिंसेचा त्याग करून पंच ¶लब्धीच्या स्वरूपाचा विचार करून पांच घास घ्यावेत. बध ११ ला ८ अशुभ ध्यानांचा ( इष्टवियोग, अनिष्टसंयोग, पीडाचिंवतन निदान अशीं चार आर्तध्यानें; हिंसानंद, मृषानंद, चौर्यानंद, परिग्रहानंद अशीं चार रौद्रध्यानें ) त्याग करून चार अनुयोग ( प्रथमानुयोग, करणानुयोग, चरणानुयोग, द्रव्यानुयोग ) व अनंतचतुष्टय ( अनंत-दर्शन-

---

*अष्टविध मद ज्याचे अंगीं असे ॥ सम्यक्त्व न दिसे तयालागीं ॥ ध्रु० ॥ जातीचा कुळींचा तिजा प्रभुत्वाचा ॥ चतुर्थ रूपाचा अभिमान ॥१॥ ज्ञानाचा बळाचा सातवा तपाचा। आठवा शिल्पीचा अभिमान ॥२॥ जात्यादिक हीन सम्यक्त्व जो झाला ॥ अभिमानी त्याला न माने तो ॥३॥ अभिमानी ऐसा न पाहे विशुद्धी ॥ जाति कुळ शोधी महति म्हणे ॥४॥

¶थावरतें सैनी होय ए ही खयउपसम है।
दान पूजा उचत बिसोहि उपयोग है ॥
गुरु उपदेश तत्त्वग्यान सोही देसना है।
अंत कोराकोरी कर्मकी थिति प्रायोग है ॥
जगमैं अनंत बार चारि लब्धि पाई इनि।
कर्णलब्धि विना समकितकौ न जोग है ॥
अधो अपूरव अनिवृत कर्न तीन करै।
मिथ्यामाहिं पीछै चौथा सम्यक नियोग है ॥

ज्ञान-सुख-वीर्य) यांचा विचार करून चार घास घ्यावेत. वद्य १२ ला बारा अविरतीचा ( षट्कायजीव-पांच स्थावर व एक त्रस—हिंसा व पांच इंद्रियें व मन यांस ताब्यांत न ठेवणें ) त्याग करून देव, गुरु, शास्त्र व अधो-मध्य-उर्ध्व अशा तीन लोकांच्या स्वरूपाचा विचार करून तीन घास घ्यावेत. वद्य १३ला तेरा काठिया ( चोर ) चा (जुआ, आळस, शोक, भय, कुकथा, कौतुक, क्रोध, कृपणबुद्धि, अज्ञानता, भ्रम, निद्रा, मद, मोह ) त्याग करून *श्रावक व † यति धर्माचा विचार करून दोन घास घ्यावेत. वद्य १४ ला भोजनाच्या चौदा मलांचा ( पू , रक्त, मांस, अस्थि, कातडें, नख, केंश, मेलेला द्वींद्रिय प्राणी, त्रींद्रिय प्राणी, चतुरिंद्रिय प्राणी, कंद, बीज, मुल फल, कण-कुंड) त्याग करून वस्तुस्वभावाचा आत्मधर्माचा विचार करून एक घास घ्यावा व शेवटीं अमावास्येचा उपवास करावा व वरीलप्रमाणेंच वस्तुस्वरूपाचें चिंतन व धर्मध्यान करावें. नंतर शुद्ध १ स उत्तम अक्षत व तीस कमल-पुष्पांनीं देव, गुरु व शास्त्र यांची पूजा करून यथाशक्ति चतुर्विध संघास ( मुनि, अर्जिका, श्रावक, श्राविका ) आहारादि दानें देऊन पारणें करावें.

भगवान श्रीआदिनाथ तीर्थंकराचे पुत्र बाहुबलींनीं हें व्रत करून केवलज्ञानाची प्राप्ति करून घेतली. तसेंच पुत्री ब्राह्मी व सुंदरींनीं हें व्रत

---

* सवैया ३१ लज्जावंत दयावंत प्रसन्न प्रतीतवंत, परदोषकों ढकैया पर उपकारी है ॥ सौम्यदृष्टी गुणग्राही गरिष्ट सबको इष्ट, सिष्ट पक्षी मिष्ठवादी दीरघ विचारी है ॥ विशेषज्ञ, रसज्ञ, कृतज्ञ, तज्ज्ञ, धरमज्ञ न दीन न अभिमानी मध्य व्यवहारी है ॥ सहज विनीत पापक्रियासों अतीत ऐसो, श्रावक पुनीत इकबीस गुणधारी है ॥

मद्यमांसमधुत्यागैः सहोदुम्बरपंचकैः ।
अष्टौ मूलगुणानाहुर्गृहिणां श्रमणोत्तमाः ॥

† वदसमदिंदियरोधो । लोवो अवसमचेलमस्नानं ॥
खिदिसयमदन्तवणं । तिडिभोयणमेयभुत्तं च ॥

करून अच्युतस्वर्गात इंद्रप्रतींद्रपद मिळविलें. या व्रताचें पालन करून जंबूस्वामीस मोक्ष प्राप्त झाला. याचप्रमाणें आणखी कित्येक जीवांनीं या व्रताचें पालन करून कर्मक्षय करुन मोक्षधाम प्राप्त करुन घेतलें आहे.

जी स्त्री या महान व्रताचें पालन करते ती आपल्या उज्वल यशानें आपल्या कुलरूपी आकाशास निर्मल करुन उभयपक्षाचा उद्धार करून स्त्रीलिंग छेदून स्वर्गमोक्षाची प्राप्ति करून घेते.

ज्यामध्यें क्रमानें घास वाढवीत जाणें व कमी करीत जाणें असा विधि आहे अशा प्रकारचें हें *चांद्रायणव्रत करून निर्दोष व गुणवान् असे मुनि, अर्जिका, श्रावक, श्राविका निश्चयानें मोक्ष प्राप्त करून घेतात.

हें ऐकून राजानें आपल्या प्रियपत्नीसहीत हें सुंदर चांद्रायणव्रत घेऊन त्याचें यथाविधि पालन केलें. मनामध्यें भगवंताच्या चरणकमलांचें स्मरण करून उत्तमोत्तम अशा भावनांचें चिंतवन करून मनास विषयापासून अलिप्त ठेवून आर्तरौद्र ध्यानाचा त्याग करून मुनीश्वरांच्या चरणकमलांची पूजा केली व अतीशयवंत अशा पुण्याची प्राप्ति करून घेतली. हृदयामध्यें परमात्म्याचें ध्यान करून अत्यंत सूक्ष्म सम्यक्त्वाच्या द्वारें शांति ग्रहण करून अंतकाळीं संन्यास ग्रहण करून राजा अच्युतस्वर्गामध्यें देव झाला व राणीहि स्त्रीलिंगाचें छेदन करून जिनेंद्रास नमस्कार करून तेथेंच देव झाली. *

---

*कवलचांद्रायणव्रतविधिचे प्रकार—(१) आरंभींची अमावस्या, मधील पौर्णिमा व शेवटची अमावस्या याप्रमाणें तीन उपोषणें करून क्रमानें घास वाढवीत व कमी करीत व्रत करणें (२) आरंभीच्या व शेवटच्या अमावास्येची उपोषणें करून वरील प्रमाणें व्रत करणें (३) आरंभीच्या किंवा शेवटच्या अमावास्येचा उपवास करून वरील प्रमाणें व्रत करणें.

*ही "कवलचांद्रायणव्रतकथा" मागधी कथेच्या व श्रीदेवेंद्रकीर्तिकृत व्रतोद्यापन वगैरेच्या आधारें लिहिली आहे.

# कवलचांद्रायणव्रतकथा

# भाग २ रा.

# व्रततिथिनिर्णय

यावत्सु वासरेषूश्चैर्यद्व्रतं च प्ररूपितम् ।
तिथिक्षयश्चेत्स्यात्तत्र दिनं पूर्वं समाश्रयेत् ॥१॥
यथा नंदीश्वराख्यस्य व्रतस्याष्टदिनेषु च ।
यदा तिथिक्षयो नूनं सप्तम्यां व्रतमाचरेत् ॥२॥
व्रतोक्तदिनसंदोहे तिथिवृद्धिर्यदा भवेत्
तदैव तद्व्रतं द्विः स्यादिति प्रोक्तं गणाधिपैः ॥३॥
दशम्यां कांजिकाहारो यथा नंदीश्वरे व्रते ।
दशमीतिथिवृद्धिश्चेद्द्विवारं कांजिकाशनम् ॥४॥
यदान्तिमतदिवावृद्धिर्व्रतोक्तदिवसेषु च ।
तदा यथोक्तघस्रा हि कार्या नैवाधिकं चरेत् ॥५॥
तिथिवृद्धिर्यत्र पक्षे यस्यामुक्तं व्रतं हि यत् ।
तत्पूर्वस्यां तिथौ कुर्यादुत्तरस्यां तिथौ न हि ॥६॥
यस्मिन्नब्दे* भवेतां हि द्वौ मासौ च यदा ध्रुवम् ।
उत्तरे व्रतमादेयं प्रथमे न कदाचन ॥७॥
व्रतोक्तदिवसस्तोमे त्रुटितैका तिथिर्भवेत् ।
तत्रैव तिथिवृद्धिश्चेत् कथं कुर्यात्तदा व्रतम् ॥८॥
घस्राणां केवला संख्या यत्र प्रोक्ता मनीषिभिः।
घस्रतुल्यतया तत्र संपूर्णा दिवसा ध्रुवम्॥९॥
यथा मासाश्रितो ज्ञेया ज्येष्ठजिनवरादयः ॥

---

*'मासे' इत्यपि पाठः

ज्येष्ठमासे च कर्तव्यं नान्यत्र खलु मासके ॥१०॥
यथा तिथ्याश्रिता: उक्ता: पंचमी प्रमुखा अपि ।
पंचम्यां च तिथावेत्र नान्यत्र स्यात्तिथौ ध्रुवम् ॥११॥
घस्रसंख्याश्रिता ज्ञेया व्रतशुद्ध्यादयो यथा ।
यावंतो वासरा: प्रोक्तास्तावंतो नाधिकं भवेत् ॥१२॥
रोहिणी प्रमुखा: सर्वे यथा ताराश्रिता मता: ।
यस्मिनृक्षे व्रतं प्रोक्तं तस्मिन्नेव हि नान्यथा ॥१३॥
मासादित्रयमाश्रित्य ये भवन्ति व्रतव्रजा: ।
मासादिषु यथोक्तेषु यथा नंदीश्वरादय: ॥१४॥
जघन्यमध्यमोत्कृष्टभेदाच्च त्रिविधा: खलु ।
व्रतानां च प्रकारा: स्युरुद्दिष्टा व्रतकोविदै: ॥१५॥ (व्रतनिर्णय)
पंचम्यादिविधिं कृत्वा शिवान्ताभ्युदयप्रदम् ॥
उद्योतयेद्यथासंपन्निमित्ते प्रोत्सहेन्मन :॥१६॥
समीक्ष्य व्रतमादेयमात्तं पाल्यं प्रयत्नत:॥
छिन्नं दर्पात्प्रमादाद्वा प्रत्यवस्थाप्यमञ्जसा ॥१७॥ (सागारधर्मामृत)

## व्रतिकांनीं खालील गोष्टी ध्यानांत ठेवाव्यात.

ज्यांना व्रत करावयाचें आहे त्यांनीं जिनमंदिरांत जाऊन गुरुजवळ मी व्रत घेऊं इच्छितों आपण तें द्यावें असें आदरानें म्हणावें. गुरु व्रत देतांना अष्टमूलगुणांचें पालन करण्याचा उपदेश करतात. तो आपण ऐकावा व आठ मूलगुणासह व्रत धारण करावें. आम्ही येथें अष्टान्हिकादिकांना व्रत शब्दानें उल्लेखिलें आहे. यालाच पूर्वाचार्यांनीं नैमि-

त्तिक तपोविधि झटलें आहे. या व्रतविधींत उपवास, एकाशन, रसत्याग वगैरे प्रकार सांगितलेले असतात म्हणून यास तपोविधि म्हणणें योग्य आहे.

चातुर्मासाच्या आरंभीं अष्टान्हिकास सुरुवात होतें व पुढें रविवार व्रत, सप्तपरमस्थान, षोडशारण, दशलक्षण वगैरे व्रतें या चातुर्मासांत क्रमानें येतात. यास्तव धार्मिकांस व व्रतिकांस पुण्यसाधन करण्यास हा चातुर्मास एक उत्कृष्ट साधन मानिला आहे. या चातुर्मासांत मुनिगण व क्षुल्लकादि त्यागी विहार बंद करून एके ठिकाणीं आत्मध्यान व धर्मोपदेशांत वेळ घालवितात, म्हणून चार महिनेपर्यंत धार्मिक लोकांना गुरुसेवा, आहारदान वगैरे धर्मकृत्यें करण्याचा शुभ अवसर प्राप्त होतो. जेथें जेथें गुरुसमागम घडतो तेथें तेथें धार्मिक श्रावकांनीं जाऊन पुण्यसंचय करावा. व्रत पाळणाऱ्यांनीं पुढील गोष्टी ध्यानांत ठेवाव्यात.

## व्रततिथिनिर्णयाच्या श्लोकांचा भाषानुवाद

जितक्या दिवसांचें जें व्रत सांगितलें असेल, त्यामध्यें जर तिथिक्षय येत असेल तर पूर्वीच्या दिवसाचा आश्रय करावा म्हणजे व्रतारंभ एक दिवस अगोदर करावा; उदाहरणार्थ-नंदीश्वरनांवाच्या व्रताच्या आठदिवसांमध्यें जर तिथीचा क्षय येत असेल तर +सप्तमीलाच तें व्रत सुरू करावें ॥१।२॥ व्रताकरितां सांगितलेल्या दिवसांमध्यें तिथिवृद्धि जेव्हां असेल त्यावेळेसच तें व्रत दोन वेळ करावें ( म्हणजे जी तिथि वाढली असेल त्या तिथीचा विधि दोन वेळ करावा. ) उदा०-नंदीश्वरव्रतामध्यें दशमी तिथिला कांजिकाहार करावयास सांगितला आहे. दशमीतिथिची वृद्धि झाल्यास दोन्हीं वेळां ( अर्थात् दोन्हीं दिवशीं ) कांजिकाहार घ्यावा ॥३।४॥ व्रताच्या सांगितलेल्या दिवसांमध्यें शेवटच्या दिवसाची जर वृद्धि होत असेल तर

+अष्टमीलाही व्रत सुरू करून वद्य १ ला पूर्ण करण्याची रूढी आहे.

सांगितलेल्या दिवसांइतकेंच व्रत करावें; अधिक दिवस करूं नये ॥५॥ ज्या पक्षामध्यें ज्या तिथीला व्रतारंभ करावयास सांगितला असेल त्या तिथीची वृद्धि येत असेल तर त्या तिथीच्या प्रारंभिक तिथिला व्रतारंभ करावा; उत्तर तिथिला ( म्हणजे दुसऱ्या तिथिला ) करूं नये ॥६॥ ज्या वर्षी अधिक मास येत असेल त्यावर्षी अधिकमासाच्या दुसऱ्या महिन्यांत व्रत ग्रहण करावें; पहिल्यांत कधींही ग्रहण करूं नये. ॥७॥ व्रताकरितां सांगितलेल्या दिवससमूहामध्यें जर एखाद्या तिथीचा क्षय झाला व एकाद्या तिथीची वृद्धिही झाली तर त्यावेळीं व्रत कसें करावें? ॥८॥ ज्या ठिकाणीं विद्वानांनीं केवळ दिवसांची संख्या सांगितली आहे त्याठिकाणीं दिवसांची संख्या समान येत असल्यामुळें दिवस संपूर्ण होतात. (एका तिथीचा क्षय व एका तिथीची वृद्धि झाली असतां दिवसांची संख्या बरोबर भरून निघत असल्यामुळें व्रतामध्यें फेरफार करण्याची जरूरी नाहीं अर्थात् व्रत अगोदर एक दिवस घेण्याची जरूरी नाहीं. ) ॥९॥ ( व्रतनिर्णय. )

कांहीं व्रतें मासाश्रित असतात तीं त्याच मासांत करावींत, इतर मासीं करतां येत नाहींत. जसें ज्येष्ठजिनवरव्रत हें ज्येष्ठ महिन्यांत करावें. ॥१०॥ कांहीं व्रतें तिथ्याश्रित असतात. तीं त्याच तिथीला करावी लागतात. जसें पंचमी व्रत. कांहीं व्रतें दिवसाश्रित असतात ती तेवढेंच दिवस करावींत अधिक किंवा कमी दिवस करूं नयेत. जसें चारित्रशुद्धि व्रत अर्थात् बाराशे चोतीस नांवाचें व्रत. हें सांगितलेल्या दिवसापेक्षां अधिक दिवस करूं नये. कांहीं व्रतें विशिष्ट नक्षत्रींच करावीं लागतात. जसें रोहणीव्रत. हें रोहिणी नक्षत्रावरच करावें लागतें. कांहीं व्रतें महिना, पक्ष, व दिवस यांनीं नियमित झालेलीं असतात. जसें नंदीश्वर व्रत आषाढ, कार्तिक आणि फाल्गुन या महिन्यांतच व याच्या शुक्ल पक्षांतच आणि आठ दिवसच करावें लागतें ॥११-१४॥

सामर्थ्याला अनुसरून व्रताचे तीन प्रकार–जघन्य, मध्यम आणि उत्तम असे सांगितले आहेत. म्हणून श्रावकांनीं आपल्या शक्तीला अनुसरून उत्तमादि प्रकाराचा अवलंब करावा. ॥१५॥

श्रावकांनीं पंचमी, पुष्पांजली, मुक्तावली, रत्नत्रय वगैरे व्रतें करून आपल्या संपत्तीच्या मानानें त्या व्रताचें उद्यापन करावें. हीं व्रतें स्वर्ग वगैरे अभ्युदयसुख आणि शेवटीं निर्वाणपद देणारीं आहेत. हीं व्रतें ह्मणजे श्रावकांच्या नैमित्तिक क्रिया आहेत. या नैमित्तिकक्रिया करितांना नित्य क्रियेपेक्षां आपलें मन उत्सुक ठेवावें. ॥१६॥ आपला व देश, काल, अनुकूलता वगैरेचा पुढें मागें विचार करून कोणतेंही व्रत घ्यावें आणि तें घेतलेलें यत्नपूर्वक पाळावें. कदाचित् मदाच्या आवेशानें अथवा प्रमादानें (बेसावधपणानें) त्या व्रताचा भंग झाल्यास तत्काल शास्त्रोक्तविधीनें प्रायश्चित्त घेऊन पुनः पूर्वीप्रमाणें तें व्रत पाळावें. ॥१७॥

---

## ॥ चांद्रायणव्रतविधि ॥

योऽमावास्योपवासी प्रतिपदि कवलाहारमात्रः पुरस्तात् ।
तद्वृद्ध्या पौर्णमासीमुपवसनयुतो ह्रासयन्ग्रासमग्रे ॥
सामावास्योपवासः स भजति तपसश्चंद्रगत्यानुपूर्व्या ।
चार्व्या चांद्रायणस्य प्रविततयशसः कर्तृणः कर्तृभावं

**जिनसेन विरचित हरिवंश सर्ग ३४ वा श्लोक ९१**

चांद्रायणं कवलपूर्वकमेतदुक्तं
कुर्याद्दतौ शिशिरके च दिनेषु धीमान्
त्रिंशन्मितेषु व्रतमत्र हि ग्रासवृद्ध्या
हान्या च शुक्लप्रतिपत्तिथिमाचरेच्च

पूर्णिमातिथिपर्यंतं क्रमवृद्ध्या प्रयत्नतः
प्रत्यहं ग्रासवृद्ध्या च करोतीह व्रतं मुदा ॥
पक्षे कृष्णे ग्रासहान्या प्रतीपत्प्रमुखासु च
आचतुर्दशपर्यंतममायां प्रोषधं भजेत् ॥
अनेन विधिना चैतद्व्रतमायाति पूर्णताम्
व्रते पूर्णे यथाशक्ति प्रोद्यापनमपीहते ॥
जिनागमे प्रणीतानि व्रतान्यन्यानि संति च
दीपधूपफलानां च त्रिंशच्चांद्रायणा मताः ॥

## चांद्रायणविधिच्या श्लोकांचा भाषानुवाद

जो अमावास्येला उपवास करितो, प्रतिपदेला एक कवलाचाच आहार घेतो, जो पुढें एक एक कवलाची वृद्धि करीत पौर्णिमेला उपवास करितो, जो पुढें एक एक कवल कमी करीत अमावास्येला उपवास धारण करितो तो उत्तम अशा चंद्रगतीच्या क्रमानें असलेल्या व फार मोठी कीर्ति पसरविणाऱ्या अशा चांद्रायण नांवाच्या तपाचें कर्तृत्व धारण करितो ( म्हणजे तें व्रत धारण करितो. )

हें चांद्रायणव्रत कवलपूर्वक सांगितलेलें आहे. म्हणजे पहिल्या दिवशीं एक कवलाचा आहार घ्यावा ( एक घास घ्यावा ) व व्रतास प्रारंभ करावा. ) हें व्रत शिशिरऋतुमध्यें ( थंड ऋतुमध्यें म्हणजे हिवाळ्यांत किंवा पावसाळ्यांत ) बुद्धिमान् मनुष्यानें तीस दिवस करावें. हें व्रत ग्रासवृद्धीच्या व हानीच्या क्रमानें करावें. हें व्रत शुक्ल प्रतिपदेच्या दिवशीं सुरूं करावें.

पौर्णिमेपर्यंत मनुष्य प्रयत्नानें क्रमिकवृद्धिनें दररोज ग्रास वाढवीत व्रत आनंदानें करितो. कृष्णपक्षामध्यें प्रतिपदादितिथींच्या दिवशीं चौदा

दिवसपर्यंत एक एक ग्रास कमी करावा व अमावास्येच्या दिवशीं प्रोषधोपवास धारण करावा. या विधीनें या व्रताची पूर्णता होते. व्रत पूर्ण झाल्यावर व्रती यथाशक्ति उद्यापनाची देखील इच्छा करितो.

जिनागामध्यें अन्य ( म्ह० अन्य प्रकारें ) व्रतें ( चांद्रायणव्रतें ) सांगितलेलीं आहेत. तीस द्वीप, तीस धूप व तीस फळें यावरून तीस तीस चांद्रायणव्रतें होतात. ( हा विधि देखील कवलचांद्रायणाबरोरच करावयाचा आहे. )

प्रारंभाची व अंतीची अमावास्या उपोषणयुक्त घालवावी व शुद्ध प्रतिपदेपासून तों पौर्णिमेपर्यंत एका पासून पंधरापर्यंत कवल वाढवीत जावेत व कृष्णपक्षामध्यें प्रतिपदेपासून तों चतुर्दशी अखेरपर्यंत एक एक कवल कमी करीत जावा असाही एक प्राचीन व्रतविधि आहे.

## ॥ अथ कवलचंदायणवयकहा ॥

पयपालणरिंदें कुवलयचंदें विणयासिरीपियकंतें ।
सुहचंदु मुणीसरु णिज्जियपियवरु पुणु पुच्छिउ वियसंतें ॥१॥
सामिय कहसु कवलचंदायणवउ इह केम किज्जइ ।
किं किउ केण पत्तु फलु, अवियलु किं उज्जवणु *दिज्जइ ॥२॥
तं णिसुणिवि अक्खइ, विदियवित्तु, मुणि णिसुणहि णरवइ एयचित्तु ।
दरिसहिं उववासु करेवि विलक्खे, जेण वि केण वि उज्जालपक्खे ॥३॥
पडिवादिणे भुज्जइ एयगासु, बीयाहिं बिण्णि तिय तिण्ण तासु ।
चउत्थिहिं चयारि पंचमिहिं पंच, छट्ठिहिं छह सत्तमि सत्त सच्च ॥४॥

---

* दिज्जिय (?)

अट्ठमिहिं अट्ठ णव णवमिएहिं, दह दहमि दसिकेयारसीहिं ।
भुञ्जइ बारह बारसीहिं गास, तेरह तेरसियहिं *पावणास ॥५॥
पुणु चउदसि दिणे चउदह णिरीह, छणदिणि †पणरस पुरिससीह ।
पुणु एण कमेण पलट्टमाणु, तिहि तिहि एक्कक्कु जि हीयमाणु ॥६॥
जा चउदसियेहिं एय गासु, दरिसहे करेवि सिहरहो उवासु ।
पुणु पढिवहिं जिण-सुय-गुरुहुं पुज्ज, तंदुलहि कमल तीसहिं मणोज्ज ॥७॥
विरएवि जिणचरण पुरउ समाणु, णियसत्तिए संघाहारदाणु ।
देप्पिणु भुंजिज्जइ एह जुत्ति, इय अवरुवि किज्जइ णिययसत्तिं ॥८॥
चिरु वउ सिउ बाहुबलीसरेण, तब्भवि उप्पायउ णाण तेण ।
बंभी सुंदरि एयउ करेवि, अच्चुए हुए इंद पडिंद बेवि ॥९॥
तह किउ जंबूसामिए विहाणु, णाणुप्पाएवि गउ मोक्खाणु ।
अवर वि को पेक्खइ वउ चरेवि, पत्ता जयंते कम्मइं खवेवि ॥१०॥
एत्तहे विहिजगे केवलहिहाणु, णिम्मलु चंद-कर-समाणु णाणु ।
चंदकर-जसेण पिएवि सगयणु, धवलउ करेवि छह-दव्व-सयणु ॥११॥
कम्मइं हणेवि ¶पावइ मोक्खु, जहिं अवियलसत्त रमंति सुक्खु ।
जा तिय करेइ इउ वउ महंतु, णियजसें धवलेप्पिणु कुलणहंतु ॥१२॥
हंसीव सुणिम्मल उहयपक्ख, विरएवि सुणिम्मल उहयपक्ख ।
तिय-लिंगु हणेवि सग्गापवग्गु, सावउ पालेवि पावइ समग्गु ॥१३॥
घत्ता— मुणिगण तह अज्जहं णिरु णिरवज्जहं सावयाहं तह सावियहं ।
विरएवि कउलायणु वउ चंदायणु साहिउ मोक्खु गुणाहियहं ॥१४॥
ता राएं सपियाएं लएप्पिणु, चंदायणु वउ चारु चरेप्पिणु ।
जिण-कम-कमल हियइं सुमरेप्पिणु, भावणाउ णिम्मल भावेप्पिणु ॥१५॥

---

* पावणास शद्धके पापनाश और प्राप्तन्यास ऐसे दोन्हों अर्थ होते हैं।
† छणदिणि पुण (?) ¶ छंदकी रक्षाके लिये ' पावेइ ' रखना ठीक है.

मणु विसयहो उप्परि खंचेप्पिणु, अट्ट-रउद्द-झाण वंचेप्पिणु।
दयवय समजलेण सिंचेप्पिणु, गुरु-चरणारविंद अंचेप्पिणु ॥१६॥
अइसयवंतु पुण्णु संचेप्पिणु, परम-भाव भावे रचेप्पिणु।
सुसुहुम-सम्मत्ते वि रमेप्पिणु, अंतयालि सण्णासु करेप्पिणु ॥१७॥
घत्ता– अच्चुय-सग्गहरहो मणिरयणघरहो मरेवि अमरु संजायउ।
तियलिंगु हणेप्पिणु जिणु पणवेप्पिणु तेत्थु जि सुरु तहा जायउ॥१८॥

॥ चंदायणवयकहा समत्ता ॥

---

## चान्द्रायण-व्रत-कथा का भाषानुवाद।

**अनुवादक –**

[ प्रो० हीरालालजी जैन, M. A. LL. B. अमरावती. ]

विनयश्री रानी के प्रिय पति प्रजा के पालनेवाले, राजा कुवलयचंद्रने (अथवा भूमंडलमें चंद्रमा के समान राजा प्रजापालने) प्रसन्न चित्त होकर काम को जीतनेवाले शुभचन्द्र मुनीश्वरसे पूछा– "हे स्वामिन् यह कहिये कि कवलचांद्रायणव्रत इस संसारमें किस प्रकार पाला जाता है ? क्या किसीने इसे अभीतक किया है और इसका अविकल फल पाया है ? इसका उद्यापन किस प्रकार कराया जाता है ?" ऐसा सुनकर सब बातों को जाननेवाले (अथवा चांद्रायणव्रत के मर्म को समझनेवाले) मुनिराज बोले, 'हे नरपति, एकचित्त होकर सुनिये–

जो कोई चांद्रायणव्रत करना चाहे वह दर्श अर्थात् अमावश्या के दिन उपवास करके उत्तम शुक्ल पक्ष की प्रतिपदा के दिन एक ग्रास भोजन करे, द्वितीया को दो ग्रास, तृतीया को तीन ग्रास, चतुर्थी को चार, पंचमी को पांच, छठवी को छह, सप्तमी को सात अष्टमी को आठ, नवमी को नौ, दशवीं को दश, एकादशी को एकादश, द्वादशी को द्वादश ग्रास, त्रयोदशी को पापनाशक तेरह ग्रास, फिर चतुर्दशी को निरभिलाष होकर चउदह ग्रास और पूर्णिमा के दिन पन्द्रह ग्रास भोजन करे। हे पुरुषसिंह ! फिर इसी क्रमसे व्रत को पलटावे अर्थात् प्रतिदिन एक एक ग्रास भोजन कम करता जावे, जबतक चतुर्दशी को एक ग्रास भोजन करे और अमावाश्या को शिखरका उपवास करे। फिर प्रतिपदाके दिन जिनेंद्र देव, शास्त्र और गुरु की मनोज्ञ पूजा तंदुल और तीस कमल पुष्पों जिनेंद्र देव के चरणोंमें चढाकर करे। फिर अपनी शक्ति के अनुसार संघ अर्थात् मुनि, अर्जिका, श्रावक और श्राविका को आहारदान देकर स्वयं भोजन करे। यह इस व्रतकी युक्ति है। और भी धर्मकार्य अपनी शक्ति के अनुसार करे।

यही व्रत बाहुबली ईश्वरने चिरकालतक पाला था, जिससे उन्हें केवलज्ञान प्राप्त हुवा। ब्राह्मी और सुंदरी देवियोंने भी यही व्रत पाला जिससे वे अच्युत स्वर्गमें इंद्र और प्रतीन्द्र हुई। उसी प्रकार जम्बूस्वामीने यह विधान किया जिसके फलस्वरूप ज्ञान प्राप्त करके वे मोक्षस्थान को गये। और भी न जाने कितने भव्य इस व्रत को पालकर और कर्मों का क्षय करके जगत के अंत अर्थात् ( सिद्ध-लोक को ) प्राप्त हुए। इस विधिसे जगतमें चंद्रकिरणों के समान निर्मल केवलनामक ज्ञान प्राप्त होता है और चंद्रकिरणोंके समान सुयश-द्वारा निज वंशरूपी छह द्रव्यों को निवास देनेवाले गगन को धवल करके, कर्मों का नाश करके मोक्ष को पाता है जहां अविकल रूपसे शक्तिमान होते हुए सुखों का उपभोग करते हैं। जो स्त्री इस महान्

व्रतका पालन करे वह भी अपने कुलरूपी आकाश को यशसे धवल करके तथा हंसिनी के दोनों उज्वल पंखों के समान ( पिता और पति ) दोनों पक्षों को सुनिर्मल बनाकर, स्त्रीलिंग का छेदन करके सब स्वर्ग और अपवर्ग को प्राप्त होती है।

निर्दोष और गुणवान् मुनिगण तथा आर्जिका, श्रावक तथा श्राविका, कवलाघनचांद्रायणव्रतका पालन करके मोक्ष को साध लेते हैं। ”

( यह सुनकर ) तब राजाने अपनी प्रियासहित यह सुंदर चांद्रायणव्रत लिया और उसका पालन किया और भगवान के चरणकमलों का हृदयसे स्मरण करके, निर्मल भावनायें भाकर अपने मन को विषयों के ऊपरसे खींचकर दयाव्रतको शमताके जलसे सींचकर आर्त और रौद्र ध्यान छोडकर, गुरुके चरणारविंदोंकी पूजा करके अतिशयवंत पुण्यका संचय करके हृदय में परम भावना भाकर अत्यंत सूक्ष्म सम्यक्त्वद्वारा शांति ग्रहण करके तथा अंतकालमें संन्यास ग्रहण करके राजा तो मणिजडित घर जहां हैं ऐसे अच्युतस्वर्ग में देव हुआ और रानी भी स्त्रीलिंग का हनन करके जिनेंद्रदेव को नमस्कार करके वहीं देव हुई।

॥ इति चांद्रायणव्रतकथा समाप्त ॥

# कवलचांद्रायणव्रतकथा का भाषानुवाद

**अनुवादक –**

**[ मोतीचंद गौतमचंद कोठारी, M. A. फलटण. ]**

जिसप्रकार चंद्रमा कमलों को आनंदित करता है उसीप्रकार कुव-लय को ( कु=भुमि, वलय=मण्डल ) यानें भूमण्डलको आनंदित करनेवाले विनयरूप लक्ष्मीके पति अथवा विनयश्री प्रियपत्नी है जिसकी अर्थात् बडा विनय करनेवाले, आनंदितचित्त प्रजापाल नरेंद्र के द्वारा जिन्होंने कामदेव का पराजय किया है ऐसे ( भगवान् ) श्रीशुभचंद्र मुनीश्वर फिर पूछे गये ( श्रीशुभचंद्र मुनीश्वरसे फिर पूछा गया। ) ॥१॥ 'स्वामिन्,' कहिये इस संसारमें कवलचांद्रायणव्रत किस तरह किया जाता है? क्या किसिने किया है? और इसका पूरा २ फल पाया है? क्या उद्यापन दिया जाता है ( उद्यापन किस तरह किया जाता है ) ॥२॥ वह सुनकर आचारशास्त्र के पारंगत मुनिराज कहते हैं "हे नरेंद्र! एकाग्रचित्त होकर सुनिये-किसी भी व्रती के द्वारा अमावास्याके दिन उपवास करके पवित्र ( व्रतके दिन होने के कारण ) शुक्लपक्ष के प्रतिपदा के दिन एक ग्रास खाया जाता है, द्वितियाके दिन दो, तृतीया को तीन, चतुर्थी को चार, पंचमी को पांच, छठी को छह और हे चारित्रवान् सप्तमी को सात ॥३-४॥ अष्टमी को आठ, नवमी को नौ, दशमी को दस, एकादशीको ग्यारह, द्वादशी को बारह, त्रयोदशीको ग्रहणयोग्य ( १००० तंडुलों का एक ग्रास अथवा बडे नींबू जितना एक ग्रास होता है; ऐसे ग्रास को ग्रहणयोग्य कहते हैं। ) तेरह, ( + 'पावणास=प्राप्तन्यास' यह पद मध्यदीपकन्यायसे हर दिन के

+ 'पाइयसद्दमहण्णवो' पं. हरगोविंददासकृत. पृ. ७२१ कॉ. १, पं. २३, पाव ( अप ) देखो पत्त=प्राप्त। पृ. ४७९ कॉ. १ पं २५, णास पुं. ( न्याय ) १ स्थापन.

ग्रासका विशेषण समझना चाहिये।) ॥५॥ फिर चतुर्दशी के दिन आसक्ति छोडकर चौदह ग्रास ('णिरीह' यह पद मध्यदीपक न्यायसे रक्खा गया है। अतः उसका सर्वत्र अन्वय लेना और उसका अर्थ ऊपर मुजब करना चाहिये। व्रत मानसिक शुद्धि के लिये किया जाता है और अन्नपर आसक्ति रखनेसे मानसिक शुद्धि नष्ट होती है क्योंकि, उसमें विकृति पैदा होती है।) हे पुरुषसिंह! पौर्णिमा के दिन पन्द्रह ग्रास (खाये जाते हैं) और फिर पलटाकर इसी क्रमसे प्रत्येक तिथि को एक २ (ग्रास) घटाते २ जबतक (कृष्ण) चतुर्दशी तिथि को एक ग्रास (खाया जावे) और अमावास्या के दिन अंतिम उपवास करके फिर प्रतिपदाके दिन जिनेंद्र-भगवान के साम्हने होते हुए तंडुल और तीस उत्तम कमलों के द्वारा जिनेंद्रभगवान, शास्त्र और गुरु इनकी पूजा रचाकर अपनी शक्ति के अनुसार (चतुर्विध) संघ को आहारदान देकर भोजन किया जाता है। यह (इस व्रतका) योग (विधि) है। इस प्रकार अपनी शक्ति के अनुसार ओर बातें भी की जाती हैं ॥६-७-८॥

भगवान् बाहुबलीने चिरकाल तक (इस) व्रतका आश्रय किया। (और) उसी भवमें उन्होंने केवलज्ञान उत्पन्न किया। ब्राह्मी और सुंदरीने इसको करके दोनों जन अच्युत स्वर्ग में इन्द्र प्रतीन्द्र हुये ॥९॥ उसी प्रकार जम्बूस्वामीने यह विधान किया और ज्ञान उत्पन्न करके मोक्षस्थान को पधारे ? कौन जानता है कि और भी कितने (जीव इस) व्रत का आचरण करके कर्मोंका क्षय करके जगतके अंतको पहुंचे अर्थात् मोक्षस्थानको पधारे ॥१०॥

इस व्रतसे कर्मसमूह से व्याप्त इस जगतमें चंद्रकिरणों के समान निर्मल, जिसमें आत्मलाभ होता है ऐसे केवलनामक ज्ञान को देखकर (अर्थात् उसको प्राप्तकर) चंद्रकिरणों के समान अपने यशके द्वारा

षट्द्रव्योंका स्थान जो आकाश उसको धवल करके, कर्मोंका नाश करके ( व्रती ) मोक्षको पाता है, जहां जिनका स्वभाव निश्चल है ऐसे सिद्धजीव सुखमें रममाण हैं। जो स्त्री यह महान् व्रत करती है वह इसका पूर्णतया पालन करके अपने यशके द्वारा अपने कुलरूपी आकाश को धवल करके हंसी जिसतरह अपने दोनों पंखोंको सुतरां निर्मल बनाती है उसीतरह अपने दोनों पक्षोंके ( पिता और पतिके ) सुतरां निर्मल बनाकर, स्त्रीलिंगको छेदकर स्वर्ग और मोक्षको प्राप्त होती है ॥११-१२-१३॥

जिसमें ग्रास खाये जाते हैं ( क्रमसे बढ़ाकर और घटाकर ) ऐसा चांद्रायणव्रत करके निर्दोष और गुणवान् ऐसे मुनिराज, आर्यिका, श्रावक, श्राविका निश्चयसे मोक्ष प्राप्त करलेते हैं ॥१४॥

उस राजाने अपनी प्रियासहित उस समय चांद्रायणव्रत लेकर और उसका उत्तम रीतिसे पालन करके, जिनेंद्र भगवान के चरण-कमलोंका हृदय में स्मरण करके, निर्मल भावनायें भाकर, अपने मनको विषयोंके ऊपरसे खींचकर, आर्त और रौद्र इन दो ध्यानोंका त्याग कर दयाके मार्ग को समता जलसे सिंचकर ( ताकि क्रोध कषायरूप द्रव्य-कर्मके परमाणु आकर न चिपकने पावें ) गुरुओंके चरणकमलों की पूजा करके, सातिशय पुण्यका संचय करके, आत्मामें परमात्मा को रचकर ( अर्थात् आत्माको शुद्ध द्रव्यार्थिकनय की अपेक्षासे शुद्ध परमात्मा समझकर ) अथवा हृदयमें परमात्मा की रचनाकर (अर्थात् सविकल्प ध्यानकर) अत्यंत सूक्ष्म (इंद्रियागोचर) सम्यक्त्वमें भी रममाण होकर और अन्तकाल में संन्यास ग्रहण कर मरकर मणि-रत्नोंका आकारभूत अच्युत स्वर्गरूप घरका ( वह ) देव हुआ और ( उसकी रानी भी ) स्त्रीलिंग का नाश कर, भगवान् जिनेंद्र को प्रणाम कर उसीप्रकार वहींपर देव हुई ॥१५-१६-१७-१८॥

॥ इति चांद्रायणव्रतकथा सम्पूर्णा ॥

श्रीश्रुतसागरविरचिता

# ॥ कवलचांद्रायणव्रतकथा ॥

अथ नत्वा जिनेशानं श्रीगुरुं च सरस्वतीं ।
वक्ष्येऽहं सद्व्रतं कवल-चांद्रायणसमाह्वयं ॥ १ ॥
इह जम्बूमति द्वीपे, वेष्टिते द्वीपसागरैः ।
चैत्यचैत्यालयाकीर्णे, सरिद्भिर्विविमंडिते ॥ २ ॥
अथात्र भारते क्षेत्रे, धर्मज्ञजनसंभृते ।
देशोऽस्ति मागधः यत्र-परागैर्गौरकुंजरः ॥ ३ ॥
वनानि कल्पवृक्षाणा-मर्जुनानि च शालयः ।
यत्र च क्षीरमेवांऽभो, रोहिण्यः कामधेनवः ॥ ४ ॥
हलाजीवाबलागीतनीतशब्दग्रहाः पथि ।
तिष्ठंति पथिकाः कामं, यत्र वातायुभिः समं ॥ ५ ॥
सत्पौंड्रेक्षुवणान्युच्चैर्ह्यारिगवलाहतेः ।
रसं मुंचंति क्रुग्रंथिरतानामीदृशी गतिः ॥ ६ ॥
यत्र माकंदमंजर्यो रक्ततुंडेन खंडिताः ।
पतंति भूरयो भूमावत्रता इव योषितः ॥ ७ ॥
तत्र राजगृहं नाम, पुरं सुरमनोहरं ।
सुवर्णकोटिमाणिक्य-मंदिरं स्वःपुरोपमं ॥ ८ ॥

---

१ 'गिरिसरिद्भिर्मंडिते' इति सम्यग्भाति ।

चूतैश्च चंदनैर्लोद्दैर्गूवाकै-र्नागवल्लिभिः ।
एलाभिर्नालिकेराद्यै-र्बीजपूरैश्च दाडिमैः ॥ ९ ॥
रंभाभिश्चारुपनसैश्चंपकैर्मुक्तबंधनैः ।
वर्णिकाभिर्लसत्कुंदैरेवमाद्यैर्वनावलिभिः ॥ १० ॥
सर्वत्र शोभितं यत्र, कूपैः क्षीरोदनंदनैः ।
वापीभिस्तत्सुताभिर्वा, तडागैरमृतार्णवैः ॥ ११ ॥
मंडितं यत्र तत्रापि, सर्वत्र श्रावकास्पदैः ।
चैत्यैश्चैत्यालयैः साधु-वृंदैः सिद्धांतपाठकैः ॥ १२ ॥
स्वर्णादिनिर्मिता यत्र, जिनानां प्रतियातनाः ।
गंधाद्यैः सर्वदेज्यंते, विधान्यैः साधुसत्तमाः ॥ १३ ॥
तत्रासीद्वृत्रशत्रुर्वा, श्रेणिकः श्रेयसां निधिः ।
राज्ञीव राजिता तस्य, शची वा चेलनांगना ॥ १४ ॥
स एकदा निजास्थाने, सदष्टापदविष्टरे ।
तस्थौ पूर्णः प्रभुः पूर्वपर्वते कांतिमानिव ॥ १५ ॥
सुधीरुद्यानपालेन, सर्वर्तुकुसुमार्पिणा ।
संविज्ञप्तः सदाचार-लोकलोचनचंद्रमाः ॥ १६ ॥
गोत्राधीशापदां हर्ता, वीरो गंभीरशासनः ।
गोत्रेण विपुले गोत्रे, तीर्थकृत्समवास्थितः ॥ १७ ॥
तच्छ्रुत्वा स्वांगसंस्पृष्टं, दत्वास्मै पारितोषिकं ।
नत्वा सप्तपदान्येत्यानंदभेरीरवादयत् ॥ १८ ॥
नानादिव्यार्चनोपेत-परिवारोपलक्षितः ।
मृगेंद्र इव शैलेंद्रं, करींद्रं चारुरोह सः ॥ १९ ॥

कुंजरादवरुह्यैव, सरणं समवादिकं ।
निजाप्तैरावृतो राजा व्यलोकत स पुण्यधीः ॥ २० ॥
प्रातिहार्याष्टकोपेतं, गणैर्द्वादशभिर्युतं ।
श्रीवर्द्धमानतीर्थेशं, शर्मदं पश्यति स्म सः ॥ २१ ॥
पूर्वजन्म विदंत्यत्र सप्त वापीजलोक्षिताः ।
तद्दर्शनेन पूर्वाणि, सप्त भावीनि सर्वथा ॥ २२ ॥
अंधाः पश्यंति रूपाणि, शृण्वंति बधिराः श्रुति ।
मूकाः स्पष्टं विभाषंते, चंक्रम्यंते च पंगवः ॥ २३ ॥
उक्त्वैवं पूतधीर्दत्वा, जिने तिस्रः प्रदक्षिणाः ।
नत्वामुं पूजयामास, चेलनामंडितो नृपः ॥ २४ ॥
यात्रा जैनी प्रतिष्ठा च त्वत्प्रसादात्प्रवर्तते ।
एवं स्तुत्वा जिनं कोष्ठे, निजे राजा च संस्थितः ॥२५॥
तत्र शुश्राव सद्धर्मं, सम्यक्त्वं दानपूजनं ।
शीलं पर्वोपवासं च चारित्रं गृहमेधिनां ॥ २६ ॥
प्रमाणनयनिक्षेपैस्तत्त्वं जीवादि सप्तधा ।
दर्शनज्ञानचारित्रं, मोक्षमार्गं च शुश्रुवान् ॥ २७ ॥
चतुर्विंशतितीर्थेशां, चरित्राणि पवित्रधीः ।
चक्रिणां बलदेवानां, पुराणान्यशृणोत्कृती ॥ २८ ॥
अथ श्रेणिकभूपालः प्रणम्य जिनपुंगवं ।
वीरं गंभीरगीरब्धिं, गौतमं गणनायकं ॥ २९ ॥
उवाच भगवन् ब्रूहि काविमौ शांतचित्तकौ ।
रूपलावण्यसद्देहौ, मुकुटे सूर्यचंद्रकौ ॥ ३० ॥

अतीवमहिमोपेतौ, दृश्येते सूर्यसन्निभौ ।
गौतमः प्राह राजेंद्र ! द्वौ देवौ च महाप्रभौ ॥ ३१ ॥
पुराकृतव्रतेनैव, जातौ चेमौ महर्द्धिकौ ।
अपृच्छच्छ्रेणिको भूपो, गणिनं भव्यबोधकं ॥ ३२ ॥
किमेताभ्यां व्रतं पूर्वभवे शुभकरं कृतं ।
वद स्वामिन् कृपां कृत्वा, भूमिपं वचनं गणी ॥ ३३ ॥
जम्बूद्वीपेऽतिविख्याते भारते चार्यखंडके ।
सुनासीरपुरे रम्ये, राजाऽभूज्जयवाहनः ॥ ३४ ॥
राज्ञी जयावती तस्य, मंत्री च गुणवाहनः ।
तत्पत्नी गुणभद्राऽभूच्छिवभद्रः पुरोहितः ॥ ३५ ॥
तद्भार्या शिवभद्राख्या, सप्तासन् कन्यकास्तयोः ।
तासां कनिष्ठाऽशीलाह्वा रूपलावण्यमण्डिता ॥ ३६ ॥
षट् कन्या ब्राह्मधर्मेण, द्विजतुग्भ्यो ददौ पिता ।
अशीला विश्वभूदेवतनूजाय गुणाकरा ॥ ३७ ॥
रुद्रदत्ताय दैवाद्वै दत्ता विवाहसद्विधेः ।
अन्नवस्त्रस्य योगो न पूर्णस्यान्नस्य कस्य हि ॥ ३८ ॥
क्षुधादिदुःखसंपूर्णौ, महाश्रमविधायिनौ ।
दंपती तौ वने रम्ये, फलाहाराय द्वौ गतौ ॥ ३९ ॥
भ्रमंतौ वीक्ष्य योगींद्रं, पिहितास्रवनामकं ।
जग्मतुः सविधे साधोः पप्रच्छाशीलका मुनिं ॥४०॥

---

१ 'पप्रच्छ मुनिमशीलका' मूळपाठ.

किं करोषि वने स्वामिन्, निर्जनेऽतिकुशस्त्वकं ।
किं चिंतयसि चाकाशमार्गं किमवलोकसे ॥ ४१ ॥
मुनिराह सुभव्यौ तौ ज्ञात्वा चावधिलोचनात् ।
कर्मक्षयनिमित्तं हि दुःखशोकविमर्दकं ॥ ४२ ॥
दारिद्र्यरोगनाशार्थं, स्वर्गमोक्षफलप्रदं ।
तपः कुर्वे महाविघ्नसंदोहक्षयकारकं ॥ ४३ ॥
संसारासारवाराशौ, भ्रमतां प्राणिनां ध्रुवं ।
समुद्धरणसामर्थ्यं, तपसो विद्धि पुत्रिके ॥ ४४ ॥
सर्वजीवदयाधार, करुणारसरंजित ।
प्राहाशीला मुने शुद्धं, दारिद्र्यदुःखनाशनं ॥ ४५ ॥
व्रतोपायं वद स्वामिन्, येन स्युः सुखसंपदः ।
निर्धनत्वसमं नास्ति, दुःखं लोकत्रयेऽद्भुतं ॥४६॥
तदैव चागतो राजा, जयवाहनसंज्ञकः ।
सांतःपुरो वनक्रीडां कर्तुं वीक्ष्य मुनीश्वरं ॥ ४७ ॥
समागत्य प्रणम्याथोपविष्टो मुनिसन्निधौ ।
मुनिः प्राह तदैवासौ पुत्रि चाकर्णय व्रतं ॥ ४८ ॥
कृतेन येन नश्यंति, बाधा दारिद्र्यसंभवाः ।
कल्याणप्रदं कवलचांद्रायणसमाह्वयं ॥ ४९ ॥
कुरु पुत्रि व्रतं श्रीदं, मनोरथशतप्रदं ।
पुनः प्राह विधिं चास्य, स्वामिन् मम निरूपय ॥५०॥
मुनिराह शृणु पुत्रि, मनः कृत्वा सुनिश्चलं ।
समासेन ब्रुवे चाहं, व्रतस्य संविधानकं ॥ ५१ ॥

हायने मासि कस्मिंश्चिदमावास्यामुपोषितं ।
* घस्त्रे तदनु कर्तव्यं, सिते प्रतिपदाह्वये ॥ ५२ ॥
केवलमेकं सुग्राह्यं, मौनशुद्धिसमन्वितं ।
निःप्रत्यूहं सचित्तादिवर्जितं स्वल्पमानकं ॥ ५३ ॥
पुनर्नीरं न पेयं च, भोजनावसराद्विना ।
गृहारंभं परित्यज्य, कर्तव्यार्चा जिनेशिनां ॥ ५४ ॥
यादृशाः कवला ग्राह्यास्तत्समाः श्रीमदर्हतां ।
पुरः पुत्रि त्वया नित्यं, स्थाप्याश्च शुभभावतः ॥ ५५ ॥
श्रुतं संपूज्य विधिना गुरुं चार्च्य श्रुतप्रदं ।
सूत्रमाकर्ण्य जैनेशं हित्वा हिंसानृतादिकं ॥ ५६ ॥
शुभं कथानकं श्रव्यं, त्याज्यं कुध्यानयुग्मकं ।
भूमिशय्या प्रकर्तव्या, त्वया पुत्रि सुखप्रदा ॥ ५७ ॥
द्वितीयादिदिनेष्वेवं, ग्राह्यं च कवलं तथा ।
एकैकवृद्धिकं यावत्, पूर्णिमा स्याच्छुभा तिथिः ॥ ५८ ॥
तत्रोपादाय कवलान् पंचदश शुभांस्ततः ।
हीयमानान्गृहीत्वैकैकेनैकग्रासकांतकान् ॥ ५९ ॥
एवं चंद्रकलावत्तान्, वृद्ध्या हान्या च संयुतान् ।
त्रिंशद्दिनसुपर्यंतं व्रतं कृत्वा सुपारय ॥ ६० ॥
मुनीनामार्यिकाणां च, देयं भोज्यं सधर्मिणां ।
दीनानाथजनान्सर्वान्, संतोष्य वरभक्तितः ॥ ६१ ॥

---

१—वास्यामित्यत्र 'कालाध्वनोरत्यन्तसंयोगे' इत्यनेन द्वितीया भवति ।
* 'कर्तव्यं तदनु घस्त्रे' मूळपाठ २ पु. न. उभयलिंगी शब्द आहे.

मनोमोदः प्रकर्तव्यो, भावनीयाः सुभावनाः ।
पूर्णेऽथ सुव्रते जाते, तदुद्यापनमाचर ॥ ६२ ॥
शांतिकं चाभिषेकं वा, महान्तं विधिवत्सृजेत् ।
ध्वजाङ्कुशपताकाश्च, नांदिन्यस्तारिकास्तथा ॥६३॥
चामराणां युगान्युच्चैर्धूपस्य दहनान्यपि ।
आरात्रिकाणि कुस्तानि, सवस्त्राणि सहौषधैः ॥ ६४ ॥
भवंति संघदानानि, तथार्घ्याघ्र्युकानि च ।
शौचसंयमसंज्ञानसाधनादीनि यानि च ॥ ६५ ॥
यथायोग्यं प्रदेयानि, मुनिभ्योऽन्यान्यपि ध्रुवम् ।
पंडितानां सुवस्त्राणि, साभरणानि धीमताम् ॥६६॥
मंडलं च शुभं कार्यं, त्रिशन्मितसुकोष्ठकैः ।
पंचविधं सुपक्वान्नं, विस्तार्यं च स्वशक्तितः ॥ ६७ ॥
जलादिफलपर्यंतं, द्रव्यं स्थाप्यं सुपंडितैः ।
स्तोकोऽपि विधिरुद्योत्यो, भक्त्या बहुफलप्रदः॥६८॥
फलं न सर्वथा चिंत्यं, स्तोकेन स्तोकमित्यपि ।
शाकपिंडप्रदानेन, रत्नवृष्टिः प्रजायते ॥ ६९ ॥
तद्भक्तिवैभवं कालापेक्षया च निदर्श्यते ।
स्वशक्ति प्रकटीकृत्य, कर्त्तव्यं पूजनं ध्रुवं ॥ ७० ॥
मुनेर्व्रतविधिं श्रुत्वा, गृहीत्वा व्रतमुत्तमम् ।
चकार शीलसंयुक्ता, भर्त्रामा शुभभावतः ॥ ७१ ॥
पूजादानसमायुक्तौ, दयासत्योपकारकौ ।
तनुं कालेन संत्यज्य, निराकुलत्वयोगतः ॥ ७२ ॥

सौधर्मे च समुत्पन्नौ, सुकृतोदयसंयुतौ ।
देवौ महर्द्धिकौ जातौ, छित्वा स्त्रीलिंगमेव च ॥ ७३ ॥
भर्त्रा सहैव देवोऽभूदशीला च सुशीलका ।
व्रतमाहात्म्यतश्चेमौ, महारूपसुमंडितौ ॥ ७४ ॥
इति व्रतस्य माहात्म्यं, श्रुत्वा भूपादयोऽखिलाः ।
लोका भावेन चक्रुस्ते, व्रतं दत्तमहाफलं ॥ ७५ ॥
व्रतघस्रेषु कर्तव्यं, स्नपनं चैत्यमंदिरे ।
पूजनं गीतनृत्यादि, महोत्सवकथादि च ॥ ७६ ॥
भुक्त्वाऽऽयुरमरौ च्युत्वा, महाराजकुले च तौ ।
समुत्पद्य सुखं प्राप्य, तपस्तप्त्वा यथोचितं ॥ ७७ ॥
पुनर्देवभवं लब्ध्वा, क्रमान्निर्वाणमाप्स्यतः ।
एवं व्रतफलं ज्ञात्वा, तत्कुर्वंतु नराः स्त्रियः ॥७८॥
संसाराब्धौ निमग्नानां, जंतूनां च सुखं व्रतं ।
मानुषं जन्म संप्राप्य, दुर्लभं भवकोटिषु ॥ ७९ ॥
विधेयं शोकदुःखौघरोगदारिद्र्यहं जनैः ।
बुद्धिवैभवसंयुक्तैर्महाभ्युदयदं व्रतं ॥ ८० ॥
तस्मादिदं व्रतं सारं, संसारसरितां पति ।
तितीर्षुराचरेद्भव्यो, व्रतवृंदशिरोमणि ॥ ८१ ॥
श्रुत्वा व्रतस्य माहात्म्यं, श्रेणिकश्चेलनायुतः ।
जहर्ष जिनमानम्य, प्राप राजगृहं पुरं ॥ ८२ ॥
शृण्वंति ये कथामेतां, समेताः पुण्यराशिभिः ।
सद्यः संक्षीयते नूनमनंतभवपातकं ॥ ८३ ॥

कुर्वंति ये व्रतं जैनं, सद्भिरुद्दिष्टमिष्टदं ।
कदाचिदपि ते नैव, सीदंति जगतीतले ॥ ८४ ॥
कर्तुं ये न क्षमाश्चैतन्मानसेनानुमन्वते ।
पारंपर्येण तेऽप्युच्चैर्भवेयुः शिवसंपदे ॥ ८५ ॥
इति कतिपयवाग्भिर्धर्ममुच्चित्य सारं ।
मणिमिव महनीयं मूर्द्धभिः सज्जनानां ॥
जगदुपकृतिहेतुं दर्शितं ये श्रयंते ।
श्रुतजलनिधिजातां संपदं ते लभंते ॥ ८६ ॥
वृषभाद्या जिनाः सर्वे, भारती गुरवस्तथा ।
कथारचकश्रोतॄणां, सदा कुर्वंतु मंगलम् ॥ ८७ ॥

॥ इति कवलचांद्रायणव्रतकथा संपूर्णा ॥

## अथ मंत्रः

ॐ ह्रीं शशांकगोक्षीरहारधवलगात्राय विश्वविद्याकुलगृहाय समस्तविघ्नहराय श्रीचंद्रप्रभतीर्थंकराय नमः ।

इति अष्टोत्तरजातिपुष्पैरखंडतंदुलैर्वा जाप्यं कर्तव्यं ।

---

लिखित सं. १९७८ कार्तिक शुक्ल ४

गुरुवासरे लिखितमिदं ।

हस्ताक्षराणि अजमेरागोत्रोत्पन्न–फूलचंद्रेण

जयनगरमध्ये लिखितं ।

ही प्रत श्री ऐलक पन्नालाल दि० जैन सरस्वती भवन झालरापाटण सिटी हस्तलिखित प्रत ४१८ज.क्र. पृष्ठसंख्या ५ वरून केली आहे.
५६४

मार्गशीर्ष वद्य १० सं. १९९६

---

# कवलचांद्रायण व्रतकथा.

[ अनुवादक--पं. जिनदास पार्श्वनाथ फडकुले न्यायतीर्थ ]

श्रीजिनेश्वर, गुरु आणि सरस्वती यांना नमस्कार करून मी कवलचांद्रायण नामक उत्तम व्रताची कथा विधिसहित सांगेन. १

लवणादिक समुद्र व धातकीखंडादिक द्वीपांनीं हा जम्बूद्वीप वेष्टिला आहे. हा द्वीप अनेक जिनप्रतिमा व जिनमंदिरें यांनीं शोभत आहे. अनेक पर्वत व नद्यांनीं याचें सौंदर्य वृद्धिंगत झालें आहे. २

या जंबूद्वीपांत धर्मज्ञलोकांनीं परिपूर्ण असें भरत नामक क्षेत्र आहे. या क्षेत्रांत मगधनांवाचा देश आहे व त्यांत कमलांच्या परागांनीं पिवळे झालेले हंसी इतस्ततः विहरत असलेले दिसतात. ३

या देशांत वनें ( बगीचे ) कल्पवृक्षांच्या बगीच्याप्रमाणें शोभतात. गवतें साळीच्या शेताची बरोबरी करितात. अर्थात् गवतांचीं कुरणें साळीच्या शेताप्रमाणें दिसतात. येथें दूध पाण्याप्रमाणें विपुल मिळतें व गाई कामधेनुप्रमाणें आहेत. ४

येथें शेतकऱ्यांच्या स्त्रियांचें कर्णमनोहर गाणें वाटसरू लोक हरिणाप्रमाणें निश्चल होऊन यथेच्छ ऐकत उभे राहतात. ५

या देशांत रेड्यांच्या शिंगांनीं भोसकले गेल्यामुळें काळे पांढरे पट्टे असलेले ऊस आपला मधुर रस बाहेर सोडतात. बरोबरच आहे कीं, ज्यांना गांठी असतात त्यांची अशीच परिस्थिति होत असते. तात्पर्य हें कीं, उसाला प्रत्येक पेऱ्याला गांठ असते. व ते आपण होऊन रस देत नाहींत. जेव्हां ते पीडिले जातात तेव्हां ते रस देतात. तसेंच जे लोक कुग्रंथिरत अर्थात् वाईट अभिप्रायांत तत्पर असतात ते आपो-आप आपला दुष्ट विचार प्रगट करीत नसतात जेव्हां त्यांना चांगलें ठोकावें लागतें तेव्हां ते आपला अभिप्राय प्रगट करीत असतात. ६

जेथें ज्याचें तोंड—चोंच लाल आहे अशा पक्ष्यानें अर्थात् राघूनें कुरतुडलेले पुष्कळ आंब्यांचे मोहोर शीलरहित स्त्रियांप्रमाणें जमीनीवर पडतात. अर्थात् व्यभिचारिणी स्त्रिया जशा शील भ्रष्ट होऊन पतित होतात. तसे राघूनें तोडलेले आंब्याचे मोहर जमीनीवर पडतात. ७

तेथें—या मगध देशांत देवांच्या मनाला आकर्षित करणारें, स्वर्ग-नगराप्रमाणें अर्थात् इंद्राच्या अमरावती नगराप्रमाणें सुंदर राजगृह नांवाचें शहर होतें. या राजगृहनगरांत ज्यांच्या सुवर्णशिखरावर रत्नें जडविलीं आहेत असे श्रीमंतलोकांचे पुष्कळ वाडे आहेत. ८

आम्रवृक्ष, सुगंधित चंदन, रक्तचंदन, सुपारीचीं झाडें, नागवेली, वेलदोडे, नारळाचीं झाडें, महाळुंग, दाळिंब, केळी, सुंदर फणस, ज्यांच्या कळ्या फुलल्या आहेत अशीं चाफ्यांचीं झाडें, ज्यांचा रंग सुंदर आहे अशा वेली, मोगऱ्याच्या वेली वगैरे अनेक प्रकारच्या वृक्ष-

लतांनीं शोभत असलेल्या बगीचांनीं राजगृहनगरास अपूर्व शोभा प्राप्त झाली होतीं. ९-१०

या राजगृह नगरांतील आड जणुं क्षीरसमुद्राच्या पुत्राप्रमाणें भासत असत. व विहिरी त्याच्या मुलीप्रमाणें वाटत असत व मोठीं तळीं अमृत समुद्राप्रमाणें शोभत होतीं. ११

या नगरांत सर्वत्र श्रावकांचीं घरें होतीं. जागोजागीं जिनप्रतिमा व जिनमंदिरें शोभत होतीं आणि सिद्धान्तशास्त्राचें ज्ञान करून देणारा मुनिवर्ग विहरत होता. १२

सोनें, चांदी, रत्नें वगैरेच्या अमूल्य जिनप्रतिमांची तेथील श्रावक सर्वदा गंधादिक अष्टद्रव्यांनीं पूजा करीत असत व श्रेष्ठ साधूंना आहारादिक चार प्रकारचीं दानें देत असत. १३

या नगरांत पुण्यांचा साठा असलेला श्रेणिक राजा इंद्राप्रमाणें शोभत होता. त्याला चेलना नांवाची राणी होती. तीही कल्याणांच्या पंक्तीप्रमाणें जणुं दिसत होती व इंद्राणीप्रमाणें शोभत होती. १४

पूर्वपर्वतावर—उदयगिरीवर सर्व कलांनीं प्रकाशणारा चंद्र जसा शोभतो तसा एकेवेळीं आपल्या सभेंत उत्तम सुवर्ण-सिंहासनावर आरूढ झालेला श्रेणिक राजा शोभूं लागला. त्यावेळीं ज्यानें राजाला सर्व ऋतूंतील फुलें अर्पण केलीं आहेत असा शाहणा वनपाल-माळी येऊन त्यानें याप्रमाणें विनति केली:—हे पृथ्वीपते, उत्तम आचाराचें पालन करणाऱ्या लोकांच्या नेत्रांना आनंदित करणारा जणुं चंद्र असे

महावीर स्वामी विपुलपर्वतावर येऊन ते समवसरणांत सिंहासनावर विराजमान झाले आहेत. ते सर्व संकटें दूर करणारे आहेत व तीर्थंकर नामकर्माचा उदय झाल्यामुळें तीर्थाची–धर्माची प्रवृत्ति सर्वत्र करीत आहेत. १५–१७

ही वार्ता ऐकून राजानें आपल्या अंगावरील अलंकार माळ्याला बक्षीस दिले व सात पावलें चालून त्यानें वीरप्रभूला परोक्ष नमस्कार केला. व आनंद-भेरी वाजविली. १८

ज्यांनीं अनेकप्रकारचीं दिव्यपूजनसामग्री स्वत:बरोबर घेतली आहे अशा आपल्या परिवारजनास आपल्याबरोबर राजानें घेतलें. जसा मृगराज–सिंह पर्वतावर आरोहण करितो तसा तो श्रेणिकभूपाल सर्व हत्तींचा अधिपति अशा हत्तीवर आरूढ झाला. २०

पवित्रबुद्धीचा व आप्तजनांनीं सहित असलेला तो श्रेणिकराजा समवसरणाला पाहून हत्तीवरून उतरला व अशोकवृक्षादि आठ प्रातिहार्यांनीं व बारा सभांनीं युक्त असलेल्या सुखदायक श्रीवर्द्धमान तीर्थंकराला त्यानें पाहिलें. २१

हे प्रभो! आपल्या समवसरणांत नंदोत्तरा, नंदा वगैरे नांवाच्या सोळा वापी ( विहिरी ) आहेत. त्यांत जे भव्यजीव स्नान करितात त्यांना पूर्वीचे सात जन्म व पुढें होणारे सात जन्म दिसत असतात. समवसरणांत गेलेले अंधळे रूप पाहूं शकतात बहिरे ध्वनि ऐकूं शकतात मुके स्पष्ट बोलतात आणि पांगळ्यांना चालतां येते. २२-२३

पवित्र आहे बुद्धि ज्याची अशा श्रेणिकराजानें याप्रमाणें बोलून प्रभूला त्यानें तीन प्रदक्षिणा दिल्या. व तदनंतर चेलनेसहित प्रभूला नमस्कार करून त्यांचें पूजन केलें २४

हे प्रभो! आपल्या कृपेनें जैनाचें सर्व व्यवहार सुरळीत चालतात व जिनशासन स्थिर राहतें! अशी वीरजिनाची राजानें स्तुति केली या नंतर तो मनुष्यसभेंत जाऊन बसला. २५

समवसरणांत सद्धर्माचें स्वरूप, सम्यक्त्व, पूजा, शील, पर्वतिथींचा उपवास, गृहस्थांचें चारित्र इत्यादिकाचें स्वरूप प्रभूंनीं सांगितलें व तें श्रेणिकराजानें ऐकिलें. २६

याचप्रमाणें प्रमाण नय व निक्षेप यांच्या द्वारें वीरप्रभूनें जें जीवादिक सात तत्त्वांचें स्वरूप सांगितलें तें व दर्शन, ज्ञान आणि चारित्र यांचें एकीकरण असलेला असा जो मोक्षमार्ग तो या सर्वांचें स्वरूप श्रेणिकानें ऐकिलें. २७

यानंतर विद्वान् व पुण्यवान् अशा श्रेणिकानें चोवीस तीर्थंकरांचीं चरित्रें व चक्रवर्ती, नारायण, प्रतिनारायण आणि बलभद्र यांचीं पुराणें त्यानें प्रभुमुखापासून ऐकिलीं. २८

यानंतर गंभीरवाणीरूपी समुद्राला धारण करणाऱ्या जिनश्रेष्ठ वीरप्रभूला आणि बारा गणांचा अधिपति अशा गौतमगणधरास वंदन करून श्रेणिकराजा भगवंतांना हे प्रभो! रूप व लावण्याचें माहेरघर असलेले, ज्यांच्या मुकुटावर सूर्य व चंद्र आहेत व ज्यांचें

चित्त शांत आहे असे हे दोघेजण कोण आहेत ? हे फार महत्त्वशाली दिसतात, सूर्यासारखें यांचें तेज तळपत आहे. यास्तव यांची मला माहिती सांगा असें म्हणाला. तेव्हां गौतमगणधर म्हणाले राजन् ! हे महाकान्तिसम्पन्न असे दोघे देव आहेत. २९।३०।३१

पूर्वी यांनी जें व्रत केलें होतें त्याच्या प्रभावानें हे ऐश्वर्यशाली देव झाले आहेत. हें गणधराचें भाषण ऐकून भव्यांना उपदेश कर-णाऱ्या गौतमगणधरांस श्रेणिकानें विचारलें कीं हे प्रभो ! यांनीं पूर्वभवीं कोणतें हितकर-पुण्योत्पादक व्रत केलें होतें बरें ? हें मला कृपा करून सांगा असें म्हटल्यावर गौतमगणधर श्रेणिकाला याप्रमाणें सांगू लागले. ३२-३३

या जम्बूद्वीपाच्या अतिशय प्रसिद्ध असलेल्या भरत क्षेत्रामध्यें आर्यखंडांत सुनासीर नामक रमणीय नगरांत जयवाहन नांवाचा राजा होऊन गेला. त्याला जयावती नांवाची राणी होती. या राजाचा गुण-वाहन नामक मंत्री होता. त्याला गुणभद्रा नांवाची पत्नी होती. राजाच्या पुरोहिताचें शिवभद्र असें नांव होतें. ३४ । ३५

या पुरोहिताच्या पत्नीचें शिवभद्रा असें नांव होतें. या उभय-तांना सात कन्या होत्या. या सर्व कन्यामध्यें अशीला नांवाची कन्या धाकटी होती. व ती रूप लावण्यानें अलंकृत झालेली होती. ३६

या शिवभद्र पुरोहितानें सहा मुलींचा ब्राह्मण-पुत्राबरोबर विवाह केला. विश्वभूदेव नांवाच्या ब्राह्मणाचा रुद्रदत्त नामक मुलगा होता.

त्याला शिवभूतिपुरोहितानें आपली अशीला नामक कन्या विवाहविधीनें अर्पण केली. पण त्यांच्या नशीबीं अन्नवस्त्राचा योग नव्हता. पूर्णपणें अन्नवस्त्राचा योग कोणास तरी असतो सर्वांस असत नाहीं. ३८

पोट भरण्यासाठीं ते उभयतां फार श्रम करीत असत पण त्यांची भूक तहान वगैरेंची दुःखें नाहींशीं होत नसत. एकेवेळीं हें जोडपें एका सुंदर वनांत फळें आणण्यासाठीं गेलें. ३९

तेथें तें फिरत असतां त्यास पिहितास्रव नामक मुनि दिसले. तेव्हां तें त्यांच्याजवळ गेलें. अशीलेनें मुनींना पुढें लिहिल्याप्रमाणें प्रश्न केले—हे प्रभो ! अतिशय कृश झालेले आपण या निर्जनवनांत काय बरें करीत आहांत ? आपण मनांत कोणत्या गोष्टींचा विचार करीत असतां. व आकाशमार्गांकडे कां बरें पहात असतां ? ४० । ४१

मुनींनीं अवधिज्ञानरूपी डोळ्यानें हे दोघे आसन्नभव्य आहेत अर्थात् दोन चार भवांनीं हे मुक्त होणार आहेत असें जाणिलें व ह्मटलें कीं, कर्मांचा क्षय व्हावा, सर्व दुःखांचा नाश व्हावा, दारिद्य व रोगाचा नायनाट व्हावा ह्मणून मी स्वर्ग व मोक्षरूपी फल देणारें तपश्चरण करीत असतो. या तपानें मोठमोठ्या विघ्नांचा नाश होतो. ४२ । ४३

पुनः मुनि ह्मणाले ' हे मुली या संसाररूपी असारसमुद्रांत भ्रमण करणाऱ्या प्राण्यांना वर काढण्याचें सामर्थ्य तपांत आहे असें समज. ' ४४

यानंतर ती अशीला मुनीश्वरास असें ह्मणाली, हे प्रभो ! आपण सर्व प्राण्यावरील दयेस आधार आहांत. दयारसानें आपलें हृदय

थवथवलें आहे. यास्तव दारिद्र्यदुःखाचा नाशक असा शुद्ध व्रतोपाय आह्मास सांगा ह्मणजे त्यानें आह्मास सुखसंपदा प्राप्त होतील. निर्धन-पणासारखें आश्चर्यकारक दुःख या त्रैलोक्यांत दुसरें नाहीं. ४५।४६

त्याचवेळीं जयवाहन नांवाचा राजा आपल्या अन्तःपुरासह वनक्रीडा करण्यासाठीं आला. तेथें त्यानें मुनीश्वराला पाहून जवळ येऊन व त्यांना वंदून त्यांच्याजवळ बसला. त्यावेळीं मुनि ह्मणाले ' हे बाळे मी जो व्रतोपाय सांगणार आहे तो ऐक. ४७–४८

जो आचरणांत आणिला असतां दारिद्र्यापासून उत्पन्न होणारें दुःख नाश पावतें व कल्याणाची प्राप्ति होते तो कवलचांद्रायण नामक व्रतोपाय होय. ४९

हे बाळे, हें व्रत संपत्ति देतें. व शेकडो मनोरथांची पूर्णता करिते. अशीला ह्मणाली, महाराज या व्रताचा काय विधि आहे तो मला आपण सांगा. ५०

मुनि ह्मणाले–हे मुली, मन स्थिर करून ऐक. संक्षेपानें या व्रताचा मी विधि सांगतो. वर्षाच्या कोणत्याहि महिन्यांत अमावास्येच्या दिवशीं उपवास करावा. तदनंतर शुद्धप्रतिपदेच्या दिवशीं शुद्ध मौन धारण करून निर्विघ्नपणें एक घास घ्यावा तो सचित्तादिकांनीं वर्जित असावा. ५१–५२–५३

जेवणाच्या वेळेखेरीज पुनः पाणी घेऊ नये. घरांतील सर्व आरंभ त्यागून श्रीजिनेश्वराची पूजा करावी. ज्या दिवशीं जितके घास घ्यावयाचे असतील तेवढ्या संख्येचे घास, हे बाळे, तुह्मी शुभपरिणाम

ठेऊन जिनेश्वराचे पुढें ठेवावेत. शास्त्राची विधिपूर्वक पूजा करून ज्ञानदान देणाऱ्या गुरूचेंहि पूजन करावें. जिनेश्वराच्या आगमाचा उपदेश ऐकावा. हिंसा, खोटें भाषण वगैरे पापें त्यागावीत. उत्तम धर्मकथा ऐकावी. आर्त्तध्यान व रौद्रध्यान त्यागावें व हे पुत्रि जमी-नीवर झोपावें. ५४।५५।५६।५७

दुसऱ्या तिसऱ्या वगैरे दिवशीं याचप्रमाणें एक एक घास वाढवावा. अर्थात् पौर्णिमेपर्यन्त घास वाढवावेत. पौर्णिमेच्या दिवशीं पंधरा घास घ्यावेत. चंद्राच्या वाढत्या कलेप्रमाणें शुक्लपक्षांत घास वाढवीत जावें व कृष्णपक्षांत चंद्राची कला दररोज एक एक कमी होते त्याप्रमाणें एक एक घास क्रमानें कमी घेत जावा; याप्रमाणें तीस दिवसपर्यन्त हें व्रत करून नंतर पारणें करावें. ५८।५९।६०

मुनींना, आर्यिकांना व साधर्मिकांना, उत्तम भक्तीनें आहार द्यावा. दीन व अनाथांना आहार देऊन सन्तुष्ट करावें. याप्रमाणें सर्वांचें मन प्रसन्न करावें. मनांत मैत्रीप्रमोदादिक चांगल्या भावनांचें चिन्तन करावें. व्रत पूर्ण झाल्यावर त्याचें हे पुत्रि, तूं उद्यापन कर. ६१।६२

उद्यापनांत पुढील कार्यें करावीतः— शांतिक अथवा मोठा अभिषेक करावा. ध्वज व उत्तम पताका, घंटा व चंद्रोपक, चवऱ्यांची जोडी, धूप ज्यांत जाळतात असें पात्र अर्थात् धूपपात्र-धुपाटणें, आरसा हे पदार्थ जिनमंदिरांत द्यावेत. संघाला पुस्तकें, वस्त्रें, औषध हे पदार्थ द्यावेत. आर्यिका, क्षुल्लक, ऐलक यांना वस्त्रें द्यावीत. याचप्रमाणें कमंडलु–शौचोपकरण, पिंछी–संयमोपकरण, शास्त्र–ज्ञानोपकरण अशीं

उपकरणें यथायोग्य मुनींना द्यावींत. व दुसरींहि योग्य द्यावीत. शास्त्री व पंडित लोकांना उत्तम वस्त्रें व अलंकार द्यावेत. ६३।६४।६५।६६

तीस कोष्ठकांचें सुंदर कोष्टक लिहावें. त्यापुढें पांचप्रकारचीं पक्वान्नें यथाशक्ति स्थापन करावींत. विद्वानांनीं जलापासून फलापर्यन्त अष्टद्रव्यें संस्थापन करून लहानसें विधान देखील भक्तीनें प्रभावना होईल असें करावें म्हणजे त्यापासून विपुल पुण्यरूपी फल मिळेल. ६७।६८

आपल्या अल्पवैभवास अनुसरून उद्यापनविधि केला म्हणजे अल्पफल मिळतें असा विचार करूं नये. कारण भक्तियुक्त अन्तःकरणानें भाजीभाकरीचा आहार मुनींना दिला तरीही रत्नवृष्टि होते अर्थात् अतिशय भक्तीनें उद्यापन केलें पण आपल्या सामर्थ्यानुसार तें केलें तर विपुल फळ मिळतें असें समजावें. हें सर्व भक्तीचें माहात्म्य आहे. परिस्थितीच्या अपेक्षेनें भक्ति व वैभव कमी जास्त होतें. आपलें सामर्थ्य न छपवितां पूजन करावें. अर्थात् उद्यापन करावें. ६९-७०

याप्रमाणें व्रताचा विधि मुनिमुखांतून ऐकून शीलवती अशा अशीलेनें मोठ्या भक्तीनें आपल्या पतीसह तें उत्तम व्रत धारण केलें व पूर्ण केलें. ७१

हें जोडपें नेहमीं पूजा करणें व दान देणें या कार्यांत तत्पर असे. दया, सत्य व उपकार हीं कार्यें नेहमी तें करीत असे. आयुष्य समाप्तीच्या वेळीं निराकुल होऊन या जोडप्यानें शरीर त्यागिलें. हे दोघे पतिपत्नी मोठ्या पुण्योदयामुळें सौधर्म स्वर्गांत महर्द्धिक देव

होऊन जन्मले. उत्तम शील पाळणारी अशीला स्त्रीपर्यायाचा नाश करून व्रतमाहात्म्यानें पतीबरोबर देव झाली. हे दोघे देव अतिशय सुंदर होते. ७२ । ७३ । ७४

याप्रमाणें व्रतमाहात्म्य ऐकून जयवाहन राजानें व इतर लोकांनीं महाफल देणारें तें व्रत भक्तीनें केलें. व्रताचे जितके दिवस सांगितलेले असतात त्या दिवसांत जिनमंदिरांत अभिषेक करावा, पूजन करावें, गीत, नृत्यादि करावें, मोठा उत्सव, कथा, व्याख्यानें वगैरे व्रत-प्रभावक कार्यें करावीत. ७५ । ७६

हे दोन देव देवायूचा उपभोग घेऊन मोठ्या राजकुलांत उत्पन्न होऊन तेथें उत्तम सुख भोगून यथायोग्य तपश्चरणानें पुनः देवभवाची प्राप्ति करून घेतील. व क्रमानें मुक्त होतील. याप्रमाणें व्रताचें फल जाणून तें स्त्रियांनीं व पुरुषांनीं करावें. ७७ । ७८

संसारसमुद्रांत बुडलेल्या प्राण्यांना व्रत सुख देतें. या कोट्यवधि जन्मामध्यें मनुष्यजन्म फार दुर्लभ आहे. तो प्राप्त झाला असतां ज्ञानी व वैभव–सामर्थ्ययुक्त स्त्रीपुरुषांनीं शोक, दुःख, रोग, दारिद्र्य वगैरेंचा नाश करणारें व मोठें ऐश्वर्य देणारें असें हें व्रत करावें. ७९।८०

यास्तव सर्व व्रतांचा शिरोमणि सारभूत असें हें व्रत संसार-समुद्र तरून जाण्याची इच्छा करणाऱ्या भव्यजीवानें करावें. याप्रमाणें व्रताचें माहात्म्य गौतमगणधराच्या मुखानें ऐकून चेलना राणीसहित श्रेणिकाला हर्ष झाला. नंतर तो वीरजिनास नमस्कार करून राजगृह नगरास परत आला. ८१।८२

जे भव्यजीव ही कथा ऐकतात त्यांना पुष्कळ पुण्य प्राप्त होतें. व त्यांचें अनंतभवाचें पातक तत्काल क्षीण होतें. गौतमादि सज्जनांनीं सांगितलेलें व इष्ट फल देणारें हें जिनप्रणीत व्रत जे भव्य जीव करितात ते या जगांत कधींही कष्टी होत नाहींत. ८३ | ८४

जे लोक हें व्रत आचरण्यास समर्थ नसतात त्यांनीं मनानें या व्रताची प्रशंसा करावी. अशा मनानें प्रशंसा करणाऱ्या लोकांनाही परंपरेनें उत्कृष्ट मोक्षसम्पत्ति मिळते. ८५

सज्जनांनीं अमूल्य रत्नाप्रमाणें मस्तकानें धारण करण्यास योग्य असलेल्या या श्रेष्ठ व्रताचें थोड्या वचनांनीं मी वर्णन केलें आहे. जगावर उपकार करण्यास कारण असलेलें व म्हणून वर्णिलेलें हें व्रत जे भव्य अवलंबितात, त्यांस ज्ञानसमुद्रापासून उत्पन्न झालेली संपत्ति मिळते. 'श्रुतजलनिधि' हा शब्द श्रुतसागर मुनींचा वाचक आहे. अर्थात् त्यांनीं ही कथा रचिली आहे. ८६

सर्व वृषभादिक चोवीस तीर्थंकर, जैनसरस्वती, व निर्ग्रन्थगुरु हे कथा रचणाऱ्याचें व ऐकणाऱ्याचें नेहमी मंगल करोत. ८७

---

## मंत्र.

ॐ ऱ्हीं शशांकगोक्षीरहारधवलगात्राय विश्वविद्याकुलगृहाय समस्त विघ्नहराय श्रीचंद्रप्रभतीर्थंकराय नमः ।

जाईच्या १०८ पुष्पांनीं किंवा १०८ अखंड तांदळांनीं या मंत्राचा १०८ वेळां जप करावा.

# अभंग

जिन धर्म गुरु वचन । हेंचि तत्त्वरूप जाण ॥
करा तयाचें श्रद्धान । मनीं निश्चय आणून ॥
मग सम्यक्त्व ऊपजे । अष्ट आचारें पाळीजे ॥
त्यागि पंचवीस मळ । होय सम्यक्त्व उज्ज्वळ ॥
महति ह्मणें समकित । हेंचि तारू त्रैलोक्यांत ॥ १
ज्ञानवंत जीव शुभ । स्वर्गमुक्तीचा वल्लभ ॥
ज्ञानहीन या संसारीं । फिरे दुःखाचे सागरीं ॥
जेथें ज्ञानीचा प्रवेश । तेथें अज्ञानी उदास ॥
ज्ञानी कर्माप्रती तोडी । कर्म अज्ञानी तो जोडी ॥
महति ह्मणे ज्ञानी नर । विचारितो सारासार ॥ २
गुणीजन संग करीं । योग्य आचार आचरी ॥
सर्व जीवदया पाळी । सत्य वचन सांभाळी ॥
परधन नको घेऊं । कुशीलत्व नको सेवूं ॥
परिग्रह करी दूर । पाळी गृहस्थ आचार ॥
महति ह्मणें ऐसे करी । तरसिल या संसारीं ॥ ३ ॥
भावें तप पूजा दान । मुक्ति सुखाचें कारण ॥
भावाविण पूजादिक । व्यर्थ जप तपादिक ॥
भावाविण दीक्षा घेणं । जैसे शेळीगळा स्तन ॥
महति ह्मणे तूं समज । भाव हाचि मुक्तीबीज ॥ ४ ॥

---

टीपः— पान १५ तील टिपेमध्यें 'इति सम्यग्भाति' च्या ठिकाणीं 'मूळपाठ' असें समजावे. व पान २० ओळ १९ मध्यें 'मुनीनामार्यिकाणां च' च्या ठिकाणीं 'मुनीनां चार्यिकाणां च' असा मूळपाठ आहे.

## पद:- चाल बधाइकी

बलहारी तुह्मारी प्यारीरे ॥ बल०॥ प्यारीरे सुखकारीरे ॥ बलहारी० । टेक० ॥ सब देवनके देव जिनेश्वर ॥ कोटकाम छब वारीरे ॥ बलहा०॥१॥ सुरगलोकतैं चय कर जब तुम मातगरभमें आये ॥ इंद्रादिक सुनकर विद्याधर रोमरोम हरखाये ॥ षट नौमास रतन नगरीमें तीन काल बरखाये ॥ सेवत छप्पन कुमारीरे ॥ बलहारी०॥२॥ मति श्रुति अवधी फुनि दश अतिशय सहित जनम तुम लीनो । ऐरावत चढ मेरुशिखरपर थापि न्हवन हरि कीनो ॥ करि शृंगार मातकौं सौंपी भक्ति बिखै चित दीनो ॥ नाचत राचत भारीरे ॥ बलहारी० ॥३॥ भवतनभोग विरक्त भये अनुप्रेक्षा चित्त चितारी ॥ लोकांतिक सुर आय प्रसंसे तुमने भली बिचारी ॥ पंचमहाव्रत मंडित दीक्षा परमदिगंबरधारी ॥ राजकाज सब छारीरे ॥ बलहारी०॥४॥ घातिकरम हरि केवल पायो लोकालोक निहारे ॥ समोशरण धनपती रच्यो पूजनकौं सर्व पधारे ॥ आरजखंड विहार करी बहुजनकौं पार उतारे ॥ दुविध धरम विसतारीरे ॥ बलहारी० ॥५॥ और अघाती च्यार करम तिनकौं तुमनै जब भाजे ॥ तीन लोकके शीखरऊपर आपू जाय विराजे ॥ निराकार अविकार निरंजन अजरामर पद साजे ॥ आवागमन निवारीरे ॥ बलहारी०॥६॥ च्यार ग्यानके धारक गणधर तिनहूं पार न पावे ॥ इंद्र चंद्र धरणेंद्र मुनि चरणारविंद तुम ध्यावे ॥ अमुलिकनंद मतीमंद हिराचंद कहालग गावे ॥ तार तार भव वारीरे ॥बलहारी०॥७॥

---

# कवलचांद्रायणव्रतकथा

# भाग ३ रा.

# श्रीकवलचांद्रायणव्रतकथा

[ कवि:—खुशालचंद कोदरजी गांधी ]

### हरिगीता.

श्रीजिनेश सुभारती सद्गुरुस भावें वंदुनी ।
कवलचांद्रायण विधीसह व्रतकथा सांगू जनीं ॥
स्फूर्ति मनिं येई परी मति तिळहि मम ठायीं नसे ।
भक्तीवशें अपुल्याच मीं हें करितसें धाडस असें ॥ १ ॥

लवणादि वारिधि धातकीखंडादि द्वीपें वेष्टित ।
सुजंबुद्वीप जिनालयें जिनबिंब यांहीं शोभित ॥
होय तत्सौंदर्य गिरिसरितादिकें वृद्धिंगत ।
धर्मज्ञजन परिपूर्ण जथिं तें क्षेत्र तथिं सद्भारत ॥ २ ॥

### शार्दूल

आहे मागधदेश उन्नत तयीं त्या देशिं वृक्षोत्तम ।
शोभा देति वनें तशीं उपवनें कल्पोपवन्यासम ॥
हत्ती त्यांत इतस्ततः विहरती जे पीतवर्णी असे ।
होत्साते बिसतंतुनीं दिसति कीं अन्योपमा ज्या नसे ॥ ३ ॥

### दिंडी

गवत कुरणें जणुं साळिंचीच शेतें ।
दूध पाण्यापरि विपुल जिथें येतें ॥
कामधेनूसम गाइ शोभतात ।
शेतकरिणी मनहरण गाणिं गात ॥ ४ ॥

### शार्दूल

ज्यां शृंगें महिषें विदीर्ण करितां पुंड्रेक्षु ते गोडसे ।
गांठी ज्या पिळल्याशिवाय रस जे केव्हांहि ना देतसे ॥
कुंग्रंथीरत मर्त्य जेंवि न त्यजी दुष्टस्वभावा स्वतां ।
सांगे तो निजहेतु सर्व मनिचा त्या चांगलें ठोकितां ॥ ५ ॥

### दिंडी

लाल ज्याचें मुख चोंच असे तोते ।
आम्र-मंजिरि कुरतुडुनि टाकिताते ॥
शीलविरहितशा पतित स्त्रीसमान ।
भूमिवर मंजिरि पडे ती सुकून ॥ ६ ॥

### शार्दूल

होतें मागधदेशिं राजगृह हें उत्कृष्ट मोठें पुर ।
स्वर्गातुल्य असूनही सुरपती पाहावया आतुर ॥
ज्यांचीं रत्नजडीत हेमशिखरें स्वर्गास कीं भेटती ।
वाडे उंच अनेक ज्यांत वसती श्रीमंत ऐसें किती ॥ ७ ॥

### वसंततिलका

डाळिंब आम्रतरु पेरु सुपारि ज्यांत ।
चाफा सुगंधि तरु चंदन पारिजात ॥
केळीं बहू फणस नारळ नागवेली ।
शोभा अशा उपवनें नगरास आली ॥ ८ ॥

### स्वागता

क्षीरसिंधु सुत ते जणुं आड । तेंवि बीहिरि सुता जल गोड ।
शोभती तळिं अतीशय थोर । पीयुषाब्धिसम खोलहि फार ॥ ९ ॥

**वसंततिलका**

सर्वत्र श्रावकगृहीं जिनमंदिरें तीं ।
आहेत ज्यांत मणि कांचन रौप्य मूर्ती ॥
होई विहार मुनिचा नित तन्निवास ।
सिद्धांत आगम सुबोध तयें जनांस ॥ १० ॥

**शार्दूल**

ऐशा रम्य अमूल्य रत्नप्रतिमा पन्ना हिरे आदिक ।
द्रव्यें अष्ट भरून पात्रिं करिती पूजा सदा श्रावक ॥
सत्पात्रास जघन्य मध्यम तशा उत्कृष्ट साधूवरा ।
आहाराभय शास्त्र भैषज अशीं देतात दानें घरां ॥ ११ ॥

**॥ कामदा ॥**

दीन दुःखितां पाहुनी क्षणीं ॥ द्रवुनि चित्तिं दे अन्न जल कुणी ।
वस्त्रहीनशा वस्त्र देउनी ॥ तुष्टवी दयादान हें जनीं ॥ १२ ॥

**वसंततिलका**

यत्पुण्यसंचय अती नृप इंद्रतुल्य ।
श्रेणीक तत्पुरिं वसे मुळिं ज्या न शल्य ॥
त्या चेलना सुगुण भामिनि पुण्यशाली ।
शोभे शचीसम अशी सुकृतें मिळाली ॥ १३ ॥

**शार्दूल**

शोभे पूर्व दिशेस शांत शशि तो तेजस्वि ज्याच्या कला ।
एकेवेळिं सभेंत श्रेणिक तसा हेमासनीं शोभला ॥
त्यावेळीं नृपतीस अर्पुन फलें साऱ्या ऋतूंचीं फुलें ।
वंदोनी वनमाळि सुज्ञ विनवी तच्चित्त जेणें खुलें ॥ १४ ॥

आलासे विपुलाद्रिं वीर जिन तो ऐश्वर्य वानूं किती ।
लोकांच्या नयना प्रहर्षित करी इंद्र जणुं ये क्षितीं ॥
ये तीर्थंकर नामकर्म उदया धर्मप्रवृत्ती करी ।
शोभे तो कमलासनीं जिनविभू जो संकटातें हरी ॥ १५ ॥

### दिंडी

समवसरणासह तीर्थनाथ ऐसा ।
वीर येतां षड्ऋतू फुले कैसा ॥
श्रवुनि वार्ता निज वसन अलंकार ।
देउनी त्या संतुष्ट करी फार ॥ १६ ॥

### वसंततिलका

चालून सप्त पद भूप परोक्ष आता ।
वंदून भेरि मग दे कळण्या सुवार्ता ॥
घेऊन दिव्य वसुपूर्ण जनास सर्व ।
आरूढ हस्तिवरि हो जणुं शैलिं सिंह ॥ १७ ॥

### शार्दूल

पाहोनी वसुप्रातिहार्य विभवा सोडोनिया वाहन ।
येई पार्थिंच चालुनी मग पुढें घेवोनि सारे जन ॥
वंदोनी नृपती वदे विविधशी श्रीवर्धमानस्तुती ।
पंगु, अंध, मुके, बधीर सकला सर्वेंद्रियें लाभती ॥ १८ ॥

### स्त्रग्धरा

नंदा नंदोत्तरादी समवसृतिं तुझ्या वापिका सर्व सोळा ।
सोडोनी वैर सारें वनचर बसती होउनी एक मेळा ॥ १९ ॥

पुतांचू पूर्ण वापी स्नपन घडत तों भव्य जीवास होय ।
पूर्वीची सात तैशी पुढिल भवस्मृती वर्णु ऐश्वर्य काय ॥ २० ॥

शार्दूल

ज्याची बुद्धि पवित्र श्रेणिक तशी तद्भामिनी चेलना ।
देवोनी त्रिप्रदक्षिणा यजि मुदें वंदोनि भावें जिना ॥
भो स्वामिन् अपुल्या कृपें सरळसा आचार जैनांतला ।
चाले सर्व जिनेशशासन सदां सुस्थीर या भूतलां ॥ २१ ॥

दिंडी

नरसभेमाजीं स्तवुनि वसे भूप । शील पूजा सम्यक्त्व वृषस्वरूप ॥
पर्वतिथि अनशन भव्यशा जनांनीं । वागणें केसे प्रभुमुखें श्रवोनी ॥२२॥
तसें नयनिक्षेपें प्रमाणयोगें । प्रभू जीवादिक सप्त तत्व सांगे ॥
असें सम्यग्दृगज्ञानचरण यांहीं । मोक्षपथ साचा तत्त्वरूप पाही ॥ २३ ॥

शार्दूल

ऐके चोविस तीर्थराज सुकथा श्रेणीक अर्हन्मुखें ।
चक्रीच्या प्रतिवासुदेव हरिच्या रामादिकांच्या सुखें ॥
वाणी दिव्य गभीर सिंधुसम यत् श्रीवीर अर्हज्जिना ॥
वंदोनी गणराज गौतमपदीं भावें करी वंदना ॥ २४ ॥

वसंततिलका

ज्यांच्या किरीटिं रविचंद्र सुशांत चित ।
लावण्यखाण जणुं दिव्य स्वरूपयुक्त ॥
हे पुण्यशालि तनुकांति रवीसमान ।
ऐसे महान असती प्रभु कोण दोन ॥ २५ ॥

केलें असें सुव्रत पूर्वभवांत ज्यांनीं ।
ऐश्वर्ययुक्त सुर होत तयें करोनी ॥
तें कोणतें व्रत वदा शिवसौख्यदायी ।
सांगा कृपा करुन हा नत दास पायीं ॥ २६ ॥

### शार्दूल

सांगे गौतम श्रेणिका सुरकथा केलें जयांनीं व्रत ।
जंबूद्वीपिं सुक्षेत्र भारत तयीं खंडार्य तो विस्तृत ॥
त्यामाजीं नगरी सुनासिर असे राज्ञी जयावंति ती ।
राजा श्री जयवाहनाख्य मदना शोभे जणूं कीं रती ॥ २७ ॥

### आर्या

गुणवाहन मंत्री त्या गुणभद्रा कामिनी असे ज्यास ।
शिवभद्र पुरोहित ज्या शिवभद्रा भामिनी गुणें सरस ॥ २८ ॥
त्या शिवभद्रा होत्या सप्त सुता त्यांत धाकटी अशिला ।
सुंदर सुगुणालंकृत लावण्याचीच खाण भूमितलां ॥ २९ ॥

### दिंडी

विप्रपुत्रासह षट्सुता विवाही । मिळे अशिला वर कसा काळजी ही ॥
विश्वभूदेवा रुद्रदत्तपुत्र । दिली त्या पण ना कळे विधीसूत्र ॥ ३० ॥

### अंजनिगीत

कष्ट करिति बहू पोट भराया ।
भूकतृषेचें दुःख हराया ॥
अन्न न लाभे स्वल्पहि उभयां ।
दुःखें तळमळतीं ॥ ३१ ॥

### इंद्रवज्रा

एके दिनीं सुंदर काननांत । दोघे फळें आणुं म्हणून जात ।
तेथें तया दृष्टिस साधु येत । नामें पिहीतास्रव ज्ञानवंत ॥ ३२ ॥

### स्रग्धरा

जाणोनी त्या मुनींच्या निकट पुसतसे वंदुनी त्या अशीला ।
भो स्वामिन् होउनी कां कृश तप करितां निर्जनारण्यि बोला ॥
तैसा चित्तीं मुनींद्रा निशिदिनिं करितां काय ऐसा विचार ।
कांहो आकाशमार्गीं नजर निज विभो काय त्यामाजिं सार ॥ ३३ ॥

### आर्या

अवधिज्ञानसुनेत्रें मुनिवर्यें उभय भाव जाणून ।
आसन्नभव्य होतिल, मुक्त सुभव दोन चार घेऊन ॥ ३४ ॥

### पद्य ( चालः-आनंदकंद )

मुनि बोलती तयास ॥ विधिनाश व्हावयास ॥ ध्रु० ॥
दुःखें समस्त विलया ॥ दारिद्र्यरोग हरण्या ॥
विघ्नें महान सारीं ॥ अनिवार्य सुतप हारी ॥
भवसिंधु हा असार ॥ भ्रमतां न येइ पार
त्यांतून तारण्यास ॥ तप हें समर्थ खास ॥
ने स्वर्गमोक्षधामीं ॥ करितों सुतप असें मी ॥ ३५ ॥

### शार्दूल

स्वामिन् पूर्ण दयाजलेंच अपुलें सच्चित्त ओथंबलें .
सांगा या उभयां व्रतोत्तम असें होईल जेणें भलें ॥
दारिद्र्यें पिडिलों अती नच कुणी यांतून तारावया ।
आहा एकच सद्गुरू मुनिवरा येवोच तुम्हां दया ॥ ३६ ॥

### भुजंगप्रयात

नसे अन्य दारिद्र्य दुःखासमान ।
जगीं दुःख आश्चर्यकारीं महान ॥
शुभाशीस योगें गळे सर्व पाप ।
असें बोलुनी बैसती त्यां समीप ॥ ३७ ॥

### दिंडी

भूप जयवाहन तोंच तिथें येई । वनीं क्रीडा करण्यास सौख्यदायीं ॥
आपुल्या अंतःपुरासह मुनिसि । नमुनि बैसे तो बोध ऐकण्यास ॥ ३८ ॥
ऐक बाळे व्रतविधी हा समस्त । आचरी भावें होसि क्रमें मुक्त ॥
जाय विलया दारिद्र्यदुःख सर्व । मुनी वदती या कवलचंद्र नांव ॥ ३९ ॥

### शिखरिणी

सुभावें पाळी जो व्रत मिळत त्या द्रव्य विपुल ।
तया जें ना लाभे सहज शतशा हेतु सफल ॥
असें ऐकोनी सद्-गुरुवचन प्रार्थीत अशिला ।
व्रताचा त्या सांगा विधि मुनिवरा सर्व मजला ॥ ४० ॥

### दिंडी

ऐक बाळें मुनि वदति स्थीर चित्तें । कथी संक्षेपें व्रतविधान तूंतें ॥
एक वर्षांतुन कोणत्याहि मासीं । अमावस्यादिनिं करीं अनशनासी ॥ ४१ ॥

### वसंततिलका

होऊन शुद्ध करि पूजन श्रीजिनाचें ।
तैसें जिनोक्त विधिपूर्वक आगमाचें

दे ज्ञानदान गुरु जो जगिं एक दाता ।
पूजी तयास सुमनें भविं हेंच त्राता ॥ ४२ ॥
तूं ऐक बोध नितशा जिनआगमाचा ।
रौद्रार्तध्यान त्यजि धर्मकथामृताचा ॥
हिंसादि पंच अघत्याग जमीन शेज ।
आरंभत्याग करि या व्रतकार्यिं रोज ॥ ४३ ॥

### चामर

शुद्धशा प्रतीपदेस अन्न शुद्ध पाहुनी ।
वस्तु त्या सचित्त ज्या अभक्ष्य सर्व त्यागुनी ॥
ग्रास दोन त्या दिनीं करून एक श्रीजिना ।
दाखवून घे दुजा निरंतराय भोजना ॥ ४४ ॥

### स्वागता

जेवणासमयिं घे जल फक्त । घे न तें पुनरपी विधि उक्त ॥
एक एक चढत्या दिवसास । घेई वाढवुन यापरि ग्रास ॥ ४५ ॥

### शार्दूल

घेसी तूं दररोज ग्रास जितुके ते तेवढे श्रीजिना ।
सद्भावें चरु दाखवून करणें त्या शुद्धशा भोजना ॥
पौर्णिमेस तसेंच पंचदश ते घे शुद्ध पक्षामधें ।
वाढे चंद्रकला जशी करि तसें सांगीतलें हें बुधें ॥ ४६ ॥

### भुजंगप्रयात

कमी होत इंदु-कला वद्यपक्षीं ।
तसा ग्रास एकेकसा ऊन भक्षी ॥

असा शेवटीं ग्रास घेऊन एक ।
करी पारणें बोलवोनी सुलोक ॥ ४७ ॥

### साकी

वद्य चतुर्दशिदिनीं घेउनी ग्रास एक आनंदें ।
तीस दिवस मोजून पूर्ण करि दान चतुःसंघा दे ॥
तुष्ट करी दीना ॥ शुद्ध अन्न देउन त्यांना ॥ ४८ ॥

### वसंततिलका

मैत्री, प्रमोद करुणादि सुभाव चित्तीं ।
सर्वां प्रसन्न करि देउन दानपूर्ति ॥
उद्यापनोत्तम करी व्रत पूर्ण होतां ।
शक्तीपरी कथिन मी तुज योग्य आतां ॥ ४९ ॥

### शार्दूल

आधीं तूं अभिषेक शांतिक तसा मोठा स्वशक्तीसम ।
घंटा आरति धूपपात्र चवऱ्या दे दोनशा उत्तम ॥
दे चंद्रोपक चांगला जिनगृहीं तैशा पताका ध्वजा ।
संघा पुस्तक वस्त्र औषध अशा या लागती वस्तु ज्या ॥ ५० ॥

### इंद्रवज्रा

या आर्यिका क्षुल्लक ऐलकास । पिंछी तसें वस्त्र कमंडलूस ।
शौचा असे साधन संयमास । ज्ञानी जना शास्त्रच होय खास ॥ ५१ ॥

### आर्या

दे उपकरणें ऐसी, अन्यहि मुनि पाहुनी यथायोग्य ।
उत्तम वस्त्राभूषण, शास्त्री, पंडित जनास उपभोग्य ॥ ५२ ॥

### दिंडी

काढणें स्वस्तिक तीस कोष्टकांते । रम्यसें बघुनी मोद हो जनांते ।
पुढें पक्वान्नें पांच प्रकाराचीं । मांडुनी करि पूजा सुविधानाची ॥ ५३ ॥

### हरिगीता

जलफलादि सुअष्टद्रव्यें घेउनी शक्तीसम ।
करि विधान लहान परि ठेवून भक्ती उत्तम ॥
सुज्ञ लोकाकडून मंत्रोच्चार स्पष्ट निवेदवी ।
फळ मिळे उत्कृष्ट तरि तूं तरुन जासि भवार्णवीं ॥ ५४ ॥

### शार्दूल

शक्ती स्वल्प म्हणून अल्प फल दे ऐसी नसो भावना ।
लाभें उत्तम भक्तिनेंच फळ तें भावाविणें द्रव्य ना ॥
सद्भावें शुचि शुष्क अन्न मुनितें आहार देतां जसें ।
होते तद्गृहिं रत्नवृष्टि फळ हें सद्भावनेचें दिसें ॥ ५५ ॥

### दिंडी

भक्ति वैभव परिस्थिती अपेक्षेनें । होतसे नित कमिजास्त कालमानें ।
करी पूजन निजशक्ति छपवितां न । हाचि उद्यापनविधी होय पूर्ण ॥५६॥

### द्रुतविलंबित

व्रतविधी श्रवुनी मुनिच्या मुखें ।
सुशिलशी अशिला गुरुसन्मुखें ॥
व्रत पतीसह घेउन बोललें ।
गमत आज मुनीवर पावलें ॥ ५७ ॥

### शार्दूल

केलें पूर्ण विधीसहीत व्रत हें सद्भक्तिनें पाळुन ।
पूजा दान करीत नित्य असती चित्तीं दया ठेवुन ॥
प्रामाणीक असून वर्तन जगीं लोकोपकारी कृती ।
अंतीं आकुलता रहीत उभयें त्यागीयली ही क्षिती ॥ ५८ ॥

### वसंततिलका

स्त्रीलिंग छेदि अशिला व्रतपुण्ययोगें ।
सौधर्मस्वर्गि सुर होऊन सौख्य भोगे ॥
दोघे महर्द्धिक असे सुर त्या ठिकाणीं ।
आहेत सुंदर तया उपमे न कोणी ॥ ५९ ॥

### दिंडी

जन्मती तिथुनी श्रेष्ठ नृपकुलांत । तपबळें पुनरपि जन्म सुरभवांत ।
मुक्त होतिल याक्रमें ते त्वरीत। करा व्रत फळ जाणुनी जन समस्त ॥६०॥

### दिंडी

भूप जयवाहन पूर्ण व्रत श्रवून ।
इतर जनतेसह शक्ति निज बघून ॥
करिति ऐसें घेऊन व्रत समस्त ।
पूर्ण होई तों रत जिनोत्सवांत ॥ ६१ ॥

### मालिनी

स्तवनिं यजनिं त्यांच्या नृत्य मोदें करावें ।
मधुर भजनिं तैसें प्रेमभावें रमावें ॥
श्रवण श्रुत कराया पंडितां बोलवावें ।
प्रतिदिनिं जन सारे कीर्तनें गुंगवावें ॥ ६२ ॥

### शार्दूल

भावें श्रीजिनमंदिरीं व्रतदिनीं पूजाभिषेकादिक ।
ऐसा कीं करणें महोत्सव जयें वाटे जना कौतुक ॥
संसाराब्धि बुडे जिवास सुख दे दारिद्र्यदुःखा हरी ।
रोग्यांना बनवी निरोगी व्रत हें जो त्या व्रतां आचरी ॥ ६३ ॥

### पद ( चालः-काय मला भूल० )

दुर्लभ नरजन्म सुकुल सुवृष लाभुनी ।
ये न पुनरपी मुळीं न दवडणें कुणीं ॥ ध्रु० ॥
कोट्यवधिभव फिरुन न योग ये झणीं ।
भवसागर जाउं तरुन आस ज्या मनीं ॥ ६४ ॥

### शार्दूल

ऐकोनी गणराज गौतममुखें ख्याती व्रताची अशी ।
राजा श्रेणिक चेलनेसह मनीं अत्यंत होई खुशी ॥
आला राजगृहीस वीरविभुतें अत्यादरें वंदुनी ।
लाभे पुण्य करी कथा श्रवण त्या सद्भक्ति जो ठेवुनी ॥ ६५ ॥

### पृथ्वी

अनंत भवपातकें हरुन सौख्य दे शाश्वत ।
अशी कथिलि श्रीजिनें गणधरें कथा अद्भुत ॥
अभीष्ट फलदायिनी व्रत सुभक्तिनें जो करी ।
न कष्टि कधिं तो जगीं वरिल मुक्ति ही नोवरी ॥ ६६ ॥

### भुजंगप्रयात

नसे अंगिं सामर्थ्य ज्याच्या तयांनीं ।
करावी प्रशंसा मनोभावनांनीं ॥

अशा भव्य जीवा क्रमें मोक्ष प्राप्त ।
असे सांगती सत्य जे होत आप्त ॥ ६७ ॥

शार्दूल


ऐसें एक अमूल्य रत्न सुजना जें मस्तकीं धारण्या ।
प्रासादीक महान थोर वचनें ज्यांनीं जगा तारण्या ॥
वर्णीलें उपकारि हें व्रत असें वंदी श्रुताब्धी[1] यती ।
ज्ञानाब्धीं उपजे असें धन मिळे जे या व्रता धरिती ॥ ६८ ॥

पद–भैरवी ( मंगलमय आरति करि )

वृषभादी चोविस जिन भारती गुरू मुनी ।
मंगलकारी जगांत खचित योग्य हे तिन्हीं ॥ ध्रु० ॥
ही सुकथा रचणारे ।
तैसें जे श्रवणारे ॥
मंगल त्यांचे करोत नित्य भाव हा मनीं ॥ ६९ ॥

---

१ श्रुतसागर



जीवराज देवचंदकृत

# ॥ कवलचांद्रायणव्रतकथा ॥

## आर्या

श्रीवृषभादि जिनासी श्रुतदेवीसी तसेंच सद्गुरुसी ।
वंदुनि आतां कथितों व्रत चांद्रायण समस्त भव्यासी ॥१॥
भूमंडल देशांवरि राज्य करी नृप सखा प्रजापाल ।
नीती निपुण असे तो जिनचरणीं लीन होइ त्रीकाल ॥२॥
त्याच्या बहुतचि राण्या अग्रगणी होति त्यांत विनयश्री ।
सद्गुणि सुशील जगीं या नांवापरि ती असेंचि विनय श्री ॥३॥
एके दिवशीं आले राजोद्यानीं मुनीश शुभचंद्र ।
बहुभक्ति नम्र होउनि देवासह नमितसे जया इंद्र ॥४॥
त्यांच्या तपःप्रभावें वापी भरल्या तुडुंब पाण्यानें ॥
वायू सुगंध सुटला तरुवर भरलेहि दिव्य पुष्पानें ॥५॥
व्याघ्रादि हिंस्र पशुही समभावें बसति वैर सोडून ॥
वनपालें हें बघुनी नमिला मुनिवर्य चकित होऊन ॥६॥
त्यादिवशीं तो नृपवर बसला होता सभेंत येऊन ॥
इतक्यांत माळि येउन सांगे मोदें फळांस ठेवून ॥७॥

## भुजंगप्रयात

महाभक्तराजा निघे त्या वनाला ॥
सवें घेउनीया समस्ता जनाला ॥
वसूद्रव्य तें सर्व घेवोनि ताटा ॥
क्षणीं पातले पूजण्या योगिनाथा ॥८॥
नमस्कारुनी बैसला राव तेथें ॥
म्हणे देशसेवा पदीं या जनातें ॥

अतां पाप माझें झडो सर्व देवा ॥
असें मागणें सत्वरीं दे विसावा ॥९॥

**मंदाक्रांत**

वंदोनि तो मगहि पुसतो राव त्या योगिराया ।
कोणी केलें कवलव्रत हें सांग बा याच ठायां ॥
आहे याचा विधि मुनि म्हणें सांगतो भूमिपाला ।
ऐके तूं हे स्थिरमन करीं पाप जाई लयाला ॥१०॥

**आर्या**

हें व्रत करीत असतां जिनचरणीं मन सदैव ठेवावें ।
मैत्री प्रमोद करुणा माध्यस्था भावनासि चिंतावें॥११॥
इंद्रियविषय त्यजावा सोडी तूं आर्त-रौद्र ध्यानांसी ।
आरंभ ना करावा रत व्हावें गुरुपदाब्ज युगलासी ॥१२॥

**इंद्रवज्रा**

व्रता करावें मुनि आर्यिकांनीं ।
तैसेंचि ते श्रावक श्राविकांनीं ॥
आमावस्येचा उपवास घेई ।
पूजा करोनी मग जाप देई ॥१३॥
शुक्लांत येई प्रतिपत्तिथी ती ।
एकाच घासीं करि तूंच भुक्ति ॥
बीजी दिनीं दोनच घास घ्यावे ।
तैसेचि मित्ती परि वाढवावे ॥१४॥
शुक्लांतिं येई मग पौर्णिमेसी ।
उपोषणा घे करि आदरासी ॥
घे कृष्णपक्षीं प्रतिपत्तिथीस ।
तूं ग्रास चौदा करि या विधीस ॥१५॥

ऐशापरी वद्य चतुर्दशीसी ।
एकाच घासां करि भोजनासी ।
मासांतिं येतां मग ती अमोशा ।
उपोषणा घेइ नमी जिनेशा ॥१६॥

### आर्या

दुसरें दिवशिं सकाळीं जिनपूजा ती करोनि मोदानें ॥
मग पारणें करीं तूं जिनभक्ता अन्नदान तें देणें ॥१७॥
आणिक जिनगुणगाथा वाटाव्या श्रावकांस शक्तिपरी ॥
व्रत हें करीत असतां चंद्रप्रभूचें सदां गुणांस स्मरीं ॥१८॥

### भुजंगप्रयात

हिंवाळ्यांत तैसें करी पावसाळा ।
व्रता ना करी तूं कदापी उन्हाळा ॥
गणोनीच भूपा दिना तीस घ्यावे ।
जिना चंद्रनाथा सदां आठवावें ॥१९॥

### आर्या

पूर्वीं व्रतांस करुनी बाहुबलीसह अनेक भव्य मुनी ॥
केवलज्ञाना पाउनि मुक्तिरमेचे अवश्य होति धनी ॥२०॥
आदी जिनात्मजात्या ब्रह्मा आणि तसेंच सुंदरिनीं ॥
स्त्रीलिंग छेद केलें सुरलोकीं जन्म घेति व्रत करुनी ॥२१॥
अंतिम केवलि ऐशा जंबुमुनीशेंहि या व्रता केलें ॥
त्या योगें केवलपद पाउनि मुक्ती सुखांतही रमले ॥२२॥

### शार्दूलविक्रीडित

भक्तीनें व्रत जें करीत असती चंद्रापरी कीर्तिला ।
होती पूज्य जनांत मंगलामयी पावे क्रमें मुक्तिला ॥

ऐसी ही महिमा असें कथियली आचार्यवर्यें जरी ।
ती मी भव्य जनांस अल्पमतिनें सांगीतली हो पुरी ॥२३॥

आर्या

चुकलों असें तरी ही सुधरुनि घ्या हंसक्षीर न्यायानें ॥
बुधजन क्षमोत मजला खोडी करितां तसीच बालानें ॥२४॥
पद्यात्मक ही रचिली पूर्ण कथा देवचंद्र तनयानें ॥
जिवराज हस्त जोडुनी जिनचरणीं लीन होइ विनयानें ॥२५॥

( जाप्य-ॐ ऱ्हीं असिआउसाकवलचांद्रायणव्रतेभ्यो नमः । असें रोज १०८ जाप देणें )

॥ इति श्रीकवलचांद्रायणव्रतकथा समाप्त ॥

# कवलचांद्रायणव्रतकथा

# भाग ४ था.

ॐ

# श्रीचांद्रायणव्रतकथा व उद्यापन

## अथ कथाप्रारंभ

### मंगलाचरण

### मालिनी

प्रथम नमुन भावें चंद्रनाथप्रभूला ।
नमन अखिल सिद्धाचार्य साधूगणाला ॥
स्मरुन गुण सुचित्तीं वंदितों भारतीस ।
शरण सुमतिदात्या सद्गुरू सन्मतीस *॥ १॥

### ॥ ग्रंथकर्त्याची भावना ॥

### शिखरिणी

वदूं ही हो माते मति कवलचांद्रायण कथा ।
जिनेशापासोनी मुनि गुरुमुखें हो सुरुं प्रथा ॥
मनोभावें यातें श्रवण करितां ने शिवपथा ।
प्रयत्ना या येवो यश गुरुकृपें हो नच वृथा ॥२॥

---

* महतिसागरांनाच ' सन्मतिसागर ' म्हणतात.

## दिंडी

पूर्वी भूवरि भूपती प्रजापाल ।
तया विनयश्री भामिनी सुशील ॥
काल क्रमितां एकदां तत्पुरास ।
मुनी आले शुभचंद्र नांव ज्यास ॥ ३ ॥

## शार्दूलविक्रीड

घेवोनी नृप राज्ञितें निजसवें गेला मुनीदर्शना ।
वंदोनी मुनीपादपद्म वदती त्यां भूपभूपांगना ॥
केलें कोणि कधीं कसें व्रत तसें चांद्रायणोद्यापन ।
द्यावें काय तयांत तत्फळ वदा भो ! सद्गुरू आपण ॥ ४ ॥

## भुजंगप्रयात

मुनी बोलती प्रश्न त्यांचा श्रवून ।
कथा ऐकणें शांतचित्तें करून ॥
नसे हानि वृद्धी तिथीची जयास ।
असा द्वादशांतून घ्या एक मास ॥ ५ ॥

## आर्या

व्रतनिर्णयग्रंथी हें करूं नये व्रत कधीं उन्हाळ्यांत ।
उल्लेख स्पष्ट आहे वर्षाकालांत करि हिंवाळ्यांत ॥ ६ ॥

## अनुष्टुप्

अमावास्याद्यमासाची । तद्दिनीं सुरु हो व्रत ।
उपोषण करा आद्य । पूजा अर्हत्पदा नित ॥ ७ ॥

## ॥ शार्दूल ॥

घ्यावा ग्रास प्रतीपदेस पहिला तेथून वृद्धी करा ।
ग्रासैकैक प्रती तिथीस क्रम हा हो पौर्णिमेला पुरा ॥
चौदा वद्य प्रतीपदे दिनिं पुन्हां घेऊन त्यानंतर ।
घ्या एकैक कमी करून पुजुनी श्रीचंद्रनाथेश्वर ॥ ८ ॥

## वसंततिलका

घ्यावा चतुर्दशिस एकच फक्त ग्रास ।
अंतीं उपोषणच शेवटल्या तिथीस ॥
ही एक मध्यम विधी दुसरी जघन्य ।
अंतीं उपोषण न ती करि तोहि धन्य ॥ ९ ॥

## दिंडी

आद्य मध्यांतिम उपोषणें तीन ।
होत जयिं ती उत्कृष्ट विधी जाण ॥
असे कथिली हरिवंशपुराणांत ।
असे जैनागमिं हीच विधि जिनोक्त ॥ १० ॥

### पंचचामर

भ्यावया अमूक अन्न नच कुठेंहि वर्णिलें ।
तसेंच अन्य हातुनीच घ्या असें न पाहिलें ॥
श्रावका न योग्य हें जिनागमीं कथीयलें ।
तरी अलोन अन्न घेति जन किती भले भले ॥ ११ ॥

### दिंडी

द्वितियमासाच्या शुद्ध प्रतिपदेस ।
पूजुनी अर्हतश्रुत गुरू मुनीस ॥
चतुःसंघा आहारदान द्यावें ।
आप्तमित्रांसह पारणें करावें ॥

### कामदा

दान आणखी करुं असें जरी ।
वाटतां मनीं निजबलापरी ॥
व्रतोद्यापनीं द्रव्य लावुनी ।
करि यथाविधी नवल हो जनीं ॥ १३ ॥

### ॥ शार्दूल ॥

केले हें व्रत आदि बाहुबलिनें प्रख्यात भूमंडली ।
तेणें केवलज्ञान होउन तया मुक्तीरमा लाभली ॥
ब्राम्ही सुंदरि या व्रतें सुरपुरी होती अच्युतेंद्रही ।

जंबूस्वामिहि आठवी मिळविती येणेंच मुक्तीमही ॥ १४ ॥
आद्योत्कृष्ट विधी मुनीच करिती मध्यांतिम श्रावक ।
शुद्धांतःकरणें करील व्रत जो जें कर्मसंहारक ॥
वाढे इंदुसमान किर्ति कुल हो जाती तशी उज्वल ।
सर्वोत्कृष्ट मिळेल सौख्य सुव्रतें स्त्रीलिंग हें छेदिल ॥ १५ ॥
द्विंद्रीयादिक दुःखदायक गतीमाजीं न घे जन्म तो ।
पावे मोक्ष न जोंवरी सुख सदां स्वर्गादि तो भोगितो ।
या चांद्रायणिं ध्यायिजे जिनप्रभू पादारविंदा सदां ॥
सच्चित्तांबुजिं आपुल्या सुजनहो धारून त्यागा मदा ॥ १६ ॥
ब्राह्मी सुंदरि कन्यकेस दिधलें आदीश्वरें शिक्षण ।
होतें जें व्यवहारि धार्मिक तसें संसारिं या तारण ॥
तेणें जाणुन पितृभाव विनयें वंदून श्रीमाज्जिन ।
पाळोनी दृढ ब्रह्मचर्य करिती स्त्रीलिंग त्या छेदन ॥ १७ ॥

## निःशल्यतपावाचून मुक्ति नाहीं. (शार्दूल)

केलें द्वादशमास बाहुबलिनें उत्कृष्ट मोठें तप ।
वेली वारूळ वाढले तनुवरी सोसी किती आतप ॥
होतां किंचित शल्य ही भरत भू त्यांच्या मनीं तोंवर ।
नाहीं केवलज्ञान शल्य निघतां हो मुक्तिचा तो वर ॥ १८ ॥

## —ब्रह्मचर्यव्रताचा प्रभाव—(शार्दूल)

झाले अंतिम केवली जिनश्रुती श्रीजंबुस्वामी मुनी ।
त्यांचें बालपणींच शौर्य बघुनी लज्जीत योद्धे मनीं ॥

आरंभींच सुब्रम्हचर्यव्रत हें घेऊन पाळी सदां ।
तेणें तद्भवि साधिली शिववधू वंदूं तयांच्या पदां ॥ १९ ॥

## —इंद्रवज्रा—

आषाढ वद्याद्य शनीसुवार ।
चोवीस त्रेसष्ट शकांत वीर ॥
श्रीशांतिसिंधू गुरुच्या प्रसादें ।
निर्विघ्न हो पूर्ण कथा प्रमोदें ॥ २० ॥

## द्रुत.विलंबित

करुन विंशाति या कविता अशा ।
पुरि करीत कथा परि हो हशा ॥
असति दोष जरी सुजनें मशी ।
कळविलें तरि मी बहु हो खुशी ॥ २१ ॥

# श्रीचंद्रप्रभुअष्टक

## ॥ स्थापना ॥

### भुजंगप्रयात

महासेन भुपात्मजा चंद्रनाथा ।
करी वंदना ठेवुनी पायिं माथा ॥
असे लक्ष्मणाश्री प्रभूजन्ममाता ।
इथें स्थापितों तिष्ठ बोलून आतां ॥

॥ अष्टक ॥ (चाल :– जिनधर्मका डंका)

तन मन वाणी शुद्ध करोनी प्रासुक जल शुचि पात्रि भरूं ।
ढाळूं श्रीचंद्रप्रभुचरणीं जन्मजरांतक दोष हरूं
ॐ ऱ्ही शशांकगोक्षीरधवलगात्राय श्रीचंद्रप्रभदेवाय जळं
निर्वपामीति स्वाहा ।
चंदन केशर आदि सुगंधी अष्टगंध मिश्रीत करूं ।
लावूं श्रीचंद्रप्रभुचरणीं भवआतापा शांत करूं ॥ गंधं ॥
सौरभमंडित शुभ्र अखंडित तंदुल ऐसें पात्रि भरूं ।
अक्षयसुखपद दायक श्रीचंद्रप्रभुचरणीं पुंज करूं ॥ अक्षतं ॥
कमल केतकी चंपक मरवा जाइजुई दवना बकुली ।

कामविनाशक सुमनें चढवूं श्रीचंद्रप्रभुपदकमलीं ॥ पुष्पं ॥
क्षीर, करंज्या, बर्फी, मोदक, पोळि, जलेबी, शुद्ध चरू ।
दाखवुं श्रीचंद्रप्रभुचरणीं क्षुधा अनादि रोग हरूं ॥ नैवेद्यं ॥
रत्नजडितशा कांचनभाजनीं कर्पुर ज्योती लावोनी ।
ओवाळूं मिथ्यात्वतिमिर हरि मोदें चंद्रप्रभुचरणीं ॥ दीपं ॥
अगर, तगर, कृष्णागरु पावकिं घालूं वसुविधि जाळाया ।
दशांग धूपामोद असा हा दाखवुं चंद्रप्रभुराया ॥ धूपं ॥
आम्र, चकोतर, निंबू, दाडिंब, कवठ, फणस, श्रीफल पेरू ।
चंद्रनाथपदिं सुरस फळें हीं अर्पुन शिवफल प्राप्त करूं ॥फलं॥
जल, गंधाक्षत, पुष्प, दीप, चरु, धूप, फलादि अर्घ्य भरूं ।
चंद्रनाथ सन्मुख उतरोनी संसृतिसागर सहज तरूं ॥अर्घ्यं॥

## ॥ शांतिधारा ॥

**चाल :**– मजगिरी दाखविता नयनीं–

जलधार करूं श्रीजिनचरणीं ॥ शांत करी जी सकल जिवांतें ॥ जन्मजरांतक हरुनि हरुनि ॥ १ ॥ इहपरलोकीं सौख्य भोगुनी ॥ अंतिं वरूं शिवरमणि रमणि ॥ ॥ शांतये शांतिधारा ॥

## ॥ पुष्पांजलि ॥

**चाल :**– जरठास तरुण हो स्त्री जरी

गुल्नार बकुल मधुमालती जुइजाइ चमेली शेवती ॥
घेउनी करीं सुमनें भलीं । करूं जिनचरणीं पुष्पांजली ॥
॥ दिव्य पुष्पांजलिं क्षिपेत् ॥

ॐ ह्रीं अ सि आ उ सा कवलचांद्रायणव्रतेभ्यो नमः ॥ जाप्य १०८ ॥

## ॥ अथ जयमाला ॥

चाल :– नृपति कन्या कांऽवाऽटे (भैरवी)

स्तवुनि वंदू सद्‌भावें प्रभुचंद्रनाथा॥ध्रु०॥ बघुनि या विमलानना॥ मनिं स्फूर्ति गाऽयना ॥ सहज येई। कुमति जाई। त्वरित देई ॥ फलचिंतितार्था ॥ १ ॥ त्रिभुवनी शशिनायका ॥ अघतापशामका ॥ विधिविनाशा, सुखद ऐशा ॥ शिवरमेशा ॥ पदिं ठवी माथा ॥ २ ॥ तनु प्रभा हरवि तमा॥ पदिं चिन्ह चंद्रमा ॥ धवल किर्ती, सकल गाती, सतत ध्याती ॥ तुजतीर्थनाथा ॥ ३ ॥ शिवसुखास जया जना ॥ करितात वंदना ॥ स्मरण अपुलें ॥ करुनि तरले अधम कसले ॥ जयमुक्तिनाथा ॥ ४ ॥ शत सुरेश तुझ्या पदां ॥ नत होति सर्वदां ॥ विविध स्तवनें ॥ वदुन सुमनें ॥ जयध्वनीनें। जन मुक्ति-पंथा ॥५॥ सगुण ही सुमनें अशीं ॥ जयमाल छोटिशी ॥ असुन साधी ॥ हरि उपाधी ॥ जन सुबोधी ॥ तिज धारूं चित्तां ॥ ६ ॥ तुजविणें नच आसरा ॥ मज अज्ञ पामरा ॥ जनन मरणा ॥ चुकवि भ्रमणा ॥ करूनि करुणा ॥ झणिं तारि भक्ता ॥ ७ ॥

## ॥ आशिर्वाद ॥

चाल :– प्रभुच्या स्मरोनी ( भैरवी )

धरुनी मनी जो शुचि भाव नित्य ॥ यजितो जिनेशागम साधु सत्य ॥
खग भूप सुरसौख्य भोगून अंतीं ॥ क्रमें होय त्या मानवा साध्य मुक्ती ॥
॥ इत्याशीर्वाद ॥

# अथ प्रत्येक पूजा

॥ दिंडी ॥

सर्व दोषापासून असे मुक्त ।
शुद्ध एकात्मध्यानिं अनुरक्त ॥
दोष सारे मम नष्ट व्हावयास ।
यजी भावें त्या चंद्रप्रभुपदास ॥ १ ॥

ॐ ऱ्हीं एकात्मध्यानसंलीनश्रीचंद्रप्रभुदेवाय अर्घ्यं ॥ १ ॥

रागद्वेष न हे दोष दोन ज्यास ।
मुक्तिश्री सहवासांत मग्न खास ॥
सर्व इच्छित भक्तां पदार्थ दायी ।
सदां पूजीं त्या चंद्रप्रभूपायीं ॥ २ ॥

ॐ ऱ्हीं रागद्वेषरहितश्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥ २ ॥

युक्त सम्यग्दृग्ज्ञान चरण यांहीं ।
पूर्ण शुद्ध स्वरूपांत मग्न राही ॥
तीन रत्नें गुण लाभण्या तयांचे ।
चंद्रप्रभुपद यजि सुमन-तनू-वाचें ॥ ३ ॥

ॐ ऱ्हीं रत्नत्रयस्वरूपाय श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥ ३ ॥

क्रोध, मद, माया, लोभ विवर्जीत ।
भवाब्धींतुन जे पैलतिरीं नेत ॥
योग, अविरति, मिथ्यात्व हरि प्रमादा ।
दुःखनाशक यजुं चंद्रप्रभूपादां ॥ ४ ॥

ॐ ऱ्हीं चतुःकषायरहितश्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥ ४ ॥

अहिंसादिक या महाव्रता धारी ।
पांच समिती भूषीत सदाचारी ॥
भवांबुधि पारग लोकशैलि वास ।
यजी ऐशा त्या चंद्रप्रभूपदास ॥ ५ ॥

ॐ ऱ्हीं पंचसमितिधारकाय श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥ ५ ॥

असे [१] षड्द्रव्या जाणणार साचा ।
पंचस्थावर त्रस सहा कायिकांचा ॥
खास रक्षक त्या चंद्रप्रभुपदाब्जीं ।
भाव निर्मळ ठेवून नित्य पूजी ॥ ६ ॥

ॐ ऱ्हीं षड्द्रव्यप्रकाशकाय श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥ ६ ॥

सप्तभय वर्जित सप्ततत्व वक्ता ।
धूप, दीपक, फल ग्रास व्रतोद्योता ॥
नांव चांद्रायण व्रतां या म्हणून
यजी त्या चंद्रप्रभुपदीं नमून ॥ ७ ॥

ॐ ऱ्हीं सप्ततत्वप्रकाशकाय श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥ ७ ॥

गर्व जात्यादि अष्ट रहित ऐशा ।
गुणाष्टक भूषित अघअरी विनाशा ॥
आठव्या त्या तीर्थेश चंद्रनाथा ।
यजी भावें नमवून नित्य माथा ॥८॥

---

१ जीव, पुद्गल, धर्म, अधर्म, आकाश, काल.

ॐ ऱ्हीं अष्टमदवर्जिताय श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥८॥

जयें कथिले नयभेद नव पदार्थ ।
सप्त तत्वादिक पुण्य अघ यथार्थ ॥
वर्णिले त्या श्रीचंद्रप्रभूपायां ।
यजीं भावें भवदुःख नाश व्हाया ॥९॥

ॐ ऱ्हीं नवनयवाचकाय श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥९॥

सत्क्षमादी दशधर्म भेद ध्यानीं ।
बोधिलें जिंकुनि मोहमल्ल ज्यांनीं ॥
अशा चंद्रप्रभ जिनपदांबुजांस ।
शुद्ध करुनी यजि वाणि-तनुमनास ॥१०॥

ॐ ऱ्हीं दशधर्मप्रकाशकाय चंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥१०॥

अंग अकरा प्रतिमाहि श्रावकांच्या ।
निरूपण केल्या अशा श्रीजिनांच्या ॥
असें लांछन शशि तत्पदारविंदीं ।
शुद्धभावें अर्पून अर्घ्य वंदी ॥११॥

ॐ ऱ्हीं एकादशांगप्ररूपकाय श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं॥११॥

जयें द्वादशविध कथन सत्तपाचें ।
बाह्य अभ्यंतर मुख्य भेद ज्याचे ॥
असें सांगितलें तोचि चिदानंद ।
सुखाकर यजि नित आठवा जिनंद ॥१२॥

ॐ ऱ्हीं द्वादशविधतपःख्यापकाय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं॥१२॥

त्रयोदशविध चारित्र जें हितैषी ।

पाळिलें तत्तनु शशिसमान खाशी ॥
अशा चंद्रप्रभुजिनवरा नमोनी ।
यजी अनुदिनिं तद्गुण स्तुति करोनी ॥१३॥

ॐ ऱ्हीं त्रयोदशचारित्रचरिताय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥१३॥

जयें चौदा मार्गणा, गुणस्थान ।
निरूपण करुनी दयाधर्म छान ॥
पाळिला ऐशा चंद्रप्रभू देवा ।
जलफलाद्यर्घ्यें यजि करून सेवा ॥१४॥

ॐ ऱ्हीं चतुर्दशगुणस्थाननिरूपकाय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥१४॥

जीव भावें भ्रमति पंचदश प्रमादें ।
अन्य उपदेशाविणें त्यागुनी दे ॥
अशा चंद्रप्रभु दयाघन जिनेशा ।
यजी भावें तोडण्या कर्मपाशा ॥१५॥

ॐ ऱ्हीं पंचदशप्रमादरहिताय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥१५॥

पूर्वजन्मी दर्शनविशुद्धि ज्यांनी ।
भावना षोडश भाविल्या तयांनी ॥
मेळवीलें अर्हत्पदास ऐशा ।
यजी संतत त्या चंद्रप्रभुजिनेशा ॥१६॥

ॐ ऱ्हीं षोडशभावनाभावितात्मने श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥१७॥

सप्तदशविध संयमांचे जयांनीं ।
प्रतिपालन केलें तया नमोनी ॥
मोक्षसुख इच्छुक पूजितों सदैव ॥

आस पुरवो तो चंद्रप्रभू देव ॥ १७ ॥

ॐ ऱ्हीं सप्तदशविधसंयमपालकाय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥ १७ ॥

दोष अष्टादश पीडिती न ज्यास ।

लब्धि नव ज्याच्या निकट करिति वास ॥

सकल भव्यां हितकारि अशा साच्या ।

नित्य स्तवितों पदिं चंद्रप्रभुजिनांच्या ॥

ॐ ऱ्हीं अष्टादशदोषनिवारकाय श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥ १८ ॥

भेद असती एकोनवीस ज्याचे ।

कथन केले त्या जीवसमासाचें ।

दयाघन ऐसा चंद्रप्रभू ध्याई ॥

सतत पूजुन नत होय तया पायीं ॥ १९ ॥

ॐ ऱ्हीं एकोनविंशतिजीवसमासप्ररूपकाय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं १९॥

मार्गणा चौदा गुणस्थान यास ।

तसें पर्याप्ति जीवसमासास ॥

तीन त्र्यसंज्ञा आणि दशप्राण ।

चार उपयोगें प्ररूपणा जाण ॥ १ ॥

वीस ऐशा निरुपिल्या श्रीजिनांनीं ।

तत्वस्वरुपा वचनानुसार ज्यांनी ॥

जाणिलें त्या भव्यांस मोक्ष प्राप्त ।

यजी चंद्रप्रभु असा सत्य आप्त ॥ २० ॥

ॐ ऱ्हीं विंशतिप्ररूपणाप्ररूपकाय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥ २० ॥

पंच पापें, मद, क्रोध, मान, माया ।

वचनतनमन दुष्टता जुगुप्सा या ॥
अरति भय रति मिथ्यात्व प्रमादास ।
चुगलि करणें अज्ञान या विसास ॥ १ ॥
इंद्रिया वश करणें न मिळविल्यास ।
एकविंशति हे दोष त्याज्य खास ॥
जयें पूर्णत्वें त्यागिलें तयास ।
नित्य पूजी त्या चंद्रप्रभुपदास ॥ २१ ॥

ॐ ऱ्हीं हिंसादिएकविंशतिदोषरहिताय श्रीजिनचंद्रप्रभाय अर्घ्यं ।२१

परीषह बाविस साहिले जयानें ।
रोकिले नच होतांहि दुःख तेणें ॥
नित्य याजि ऐशा चंद्रप्रभुजिनास ।
शुद्ध करुनी निज वचनमनतनूस ॥२२॥

ॐ ऱ्हीं द्वाविंशतिपरिषहमर्षिताय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥२२॥

पुद्गलाणू तेवीस वर्गणांनीं ।
तीन जग भरलें आगमांत ज्यांनीं ॥
वर्णिलें त्या श्रीचंद्रप्रभुजिनातें ।
वंदुनी ध्यायी सदा शुद्धचित्तें ॥२३॥

ॐ ऱ्हीं त्रयोविंशतिपुद्गलाणुप्रकाशकाय श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥२३॥

परिग्रह चोविस बाह्य अंतरंग ।
जिनागमिं भव्या करावया त्याग ॥
बोधिलें त्यागुन जयें दहा चौदा ।
यजी मनशुद्धिकाग्र करुन वंदा ॥२४॥

ॐ ह्रीं चतुर्विंशतिपरिग्रहरहिताय श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥२४॥

अहिंसादी जीं पांच व्रतें होत ।
पांचि पांच प्रति भावना व्रतांत ॥
चिंति त्या एकाग्रें पंचवीस ।
स्तवी यजुनी त्या चंद्रप्रभुजिनास ॥२५॥

ॐ ह्रीं पंचविंशतिभावनाभावितार्थ श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥२५॥

दृग्विशुध्यादिक क्षमादिकोत्कृष्ट ।
वर्णिल्या वृषभावना सर्व स्पष्ट ॥
अशा षड्विंशति जिनागमी ज्यांनीं ।
यजी त्या चंद्रप्रभूतें स्तवोनी

ॐ ह्रीं षड्विंशतिवृषभावनाप्ररूपकाय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥२६॥

देव, मानव, पशु त्रिविध भामिनी ते ।
त्यागिले निर्मळ तनूवचन चित्तें ॥
शुद्धभावें कृतकारितानुमोदें ।
अशा चंद्रप्रभुजिना यजि प्रमोदें ॥२७॥

ॐ ह्रीं सप्तविंशतिमनोवाक्कायादिदोषनिवारकाय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥२७॥

श्रेष्ठतपधारी अचलध्यान ज्यांचें ।
मूळगुण अठ्ठावीस त्या यतिचे ॥
वर्णिले त्या श्रीचंद्रप्रभुजिनाची ।
सतत करुनी स्तुति पदांबुजा चर्चा ॥२८॥

ॐ ह्रीं अष्टाविंशतिमूलगुणप्रकाशकाय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥२८॥

जयें सम्यग्दृगज्ञानचरण यांचे ।
वर्णिले गुण एकोनतीस वाचें ॥
अशा चंद्रप्रभजिना शुद्ध चित्तीं ॥
भक्तिनें पूजन करुन सदां चिंती ॥२९॥
ॐ ऱ्हीं एकोनत्रिंशत्‌रत्नत्रयगुणप्रख्यापकाय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं२९।
पंचस्थावर द्वींद्रियादीक प्राणी ।
भेद दश हो संज्ञि असंज्ञि यांनीं ॥
आणखी तयिं पर्याप्त अपर्याप्त ।
अपर्याप्तिनिर्वृती लब्धि होत ॥ १ ॥
दहानें तीहिस गुणुन होत तीस ।
सर्व प्राण्यांचे असे जिवसमास
कथन केलेल्या चंद्रप्रभुजिनास ।
सरस शुचि द्रव्यें यजि निजानुदास ॥ ३० ॥
ॐ ऱ्हीं त्रिंशत्‌जीवसमासप्रकाशकाय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥३०॥

## पूर्णार्घ्य (भुजंगप्रयात)

गुणानंत श्रीमज्जिनाचे समोर ।
करी नित्य गाऊन हा दास मोर ॥
तशीं वाजवोनीं सुवाद्यें मधूर ।
सुपात्रीं सुद्रव्यार्घ्यें अर्पीत थोर ॥३१॥
॥ इति कवलचांद्रायणव्रताय पूर्णार्घ्यं ॥

इति श्री. खुशालचंदकृत
कवलचांद्रायणव्रतकथा व उद्यापन समाप्त.

# कवलचांद्रायणव्रतविधीचे श्लोक

योऽमावास्योपवासी प्रतिपदि कवलाहारमात्रः पुरस्तात् ।
तद्वृद्ध्या पौर्णमासीमुपवसनयुतो ऱ्हासयन्ग्रासमग्रे ॥
सामावास्योपवासः स भजति तपसश्चंद्रगत्यानुपूर्व्या ।
चार्व्यां चांद्रायणस्य प्रविततयशसः कर्तृणः कर्तृभावं ॥९०॥

¶( जिनसेनाचार्यविरचित हरिवंशपुराण सर्ग ३४ वा )

चांद्रायणं कवलपूर्वकमेतदुक्तं,
कुर्यादृतौ शिशिरके च दिनेषु धीमान् ।
त्रिंशन्मितेषु व्रतमत्र हि ग्रासवृद्ध्या ।
हान्या च शुक्लप्रतिपत्तिथिमाचरेच्च ॥
पूर्णिमातिथिपर्यंतं क्रमवृद्ध्या प्रयत्नतः ।
प्रत्यहं ग्रासवृद्ध्या च करोतीह व्रतं मुदा ॥
पक्षे कृष्णे ग्रासहान्या प्रतिपत्प्रमुखासु च ।
आचतुर्दशघस्रातममायां प्रोषधं भजेत् ॥
अनेन विधिना चैतद्व्रतमायाति पूर्णताम् ।
व्रते पूर्णे यथाशक्ति प्रोद्यापनमपीहते ॥

---

¶अमावास्येचा उपवास करून पौर्णिमेचा उपवास व शेवटीं पुन्हां अमावास्येचा उपवास करणें हा तीन उपवासाचा उत्तम विधि होय.

जिनागमे प्रणीतानि व्रतान्यन्यानि संति च ।
दीपधूपफलानां च त्रिंशच्चांद्रायणा मताः ॥
¶ ( व्रतनिर्णयग्रंथ )

---

अथ *किसनसिंह कृत

# कवलचांद्रायणव्रतकथा

दोहा

बरत कवलचंद्रायणा, बारहमास मझार ।
एक महीनामैं करै, एकवार चितधार ॥ १ ॥

चौपाई

करहि अमावासको उपवास । पाछि तैं इक चढता ग्रास ।
पडिवादिवस ग्रास इकलीन । दोयज दोय तीज दिन तीन ॥ १॥
चौथचार पण पांचै सही । छट्ठिछह सातैंसतलही ।
आठैंआठ नवमिनो टेक । दशमीदस ग्यारहि दस एक ॥ ३॥
बारसिबारह तेरसी जान । तेरसि चौदस चौदह ठान ।
पून्यो ¶दिवस लेई दस पांच । सुकलपक्ष कीए विधि सांच ॥ ४॥
कृष्णपक्षकी पडिवा जास । चौदह गास तणौ परगास ।
दोयज तेरह बारह तीज । चौथ ग्यार पंचमि दसलीज ॥ ५॥

---

¶ अमावास्येचा उपवास करून शेवटीं अमावास्येचा उपवास करणें हा दोन उपवासाचा मध्यम विधि होय.

* अमावास्येचा उपवास करून शेवटीं अमावास्येला पारणें हा एक उपवासाचा जघन्य विधि होय.

छ नवसातैं आठ वखांण । आठैं सात नवमि छह जाण ।
दसमी पांच ग्यारसी चार । बारसि तिहुं तेरसि दुयवार ॥६॥
चौदस दिनहि गास इक जाण । मांवस दिन पारणौ ठाण ।
एकमासको व्रत है एह । गास लीजिये तिम सुणि लेह ॥७॥
गासलैन कों ऐसी करैं । मुखमैं देत न करतै परै ।
बीच पीवो पाणी न गहाय । अंतराय गल अटकै थाय ॥८॥
जिनपूजा विधिजुत दिनतीस । करे वंदनी गुरु नमि सीस ॥
शास्त्रवखांण सुणें मनलाय । धरमकथा मैं दिवस गमाय॥९॥
पालै शीलवचन मन काय । इहविधि महा पुण्य उपजाय ॥
यातैं सुरपद होवै ठीक । अनुक्रम शिवपावै तहकीक ॥१०॥

---

श्रीदेवेंद्रकीर्तिकृत

# समुच्चय-पूजा

सकलगुणसमुद्रं देवदेवेंद्रवंद्यं
विमलवपुषि पीठे तीर्थतोयैश्च धौते ॥
वसुमितजिनदेवं चंद्रधौतं नमामि ।
सकलदुरितव्यूहं हर्तुकामो भजेऽहं ॥१॥

ॐ ह्रीं शशांकगोक्षीरधवलगात्र श्रीचंद्रप्रभदेव अत्रावतरावतर संवौषट् आह्वाननं । संस्थापनं । संनिधीकरणम् ॥

गंगादितीर्थोद्भवनीरपूरैः । काश्मीरकर्पूरसुगंधमिश्रैः ।
प्रासदिदीपोद्गमपूजनार्थं । चंद्रेशदेवं सततं यजामि ॥१॥

ॐ ह्रीं शशांकगोक्षीरधवलगात्राय श्रीचंद्रप्रभदेवाय जलं नि. ॥
श्रीखंडकाश्मीरसुगंधमिश्रैः सौगंध्यसंवासितादिग्विभागैः ॥ प्रासादि० ॥
गंधं० ॥२॥
चंद्रांशुगौरैः सदकैर्मनोज्ञैर्हृद्घ्राणनेत्रप्रियदैः समक्षतैः । प्रासादि० ॥
अक्षतान्० ॥३॥
मंदारजातीबकुलादिपुष्पैः सौगंधिकैः कृष्टमधुव्रतौघैः । प्रासादि० ॥
पुष्पाणि० ॥४॥
सर्पिःपयोजन्यसुभक्ष्यजातैः शाल्यादिपूपप्रमुखैर्निवेद्यैः । प्रासादि० ॥
नैवेद्यं० ॥५॥
दीपोत्करैर्ध्वस्ततमोवितानैः कर्पूरजैर्मोहविनाशनाय । प्रासादि० ॥
दीपं० ॥६॥
सिल्हारकृष्णागरुधूपवर्गैः, संवासिताशेषनभोविभागैः । प्रासादि० ॥
धूपं० ॥७॥
नारंगपूगादिफलैर्मनोज्ञैर्जंबीरजातीफलकेलिजातैः । प्रासादि० ॥
फलं० ॥ ८ ॥
नीरादिद्रव्याष्टकदर्भदूर्वासिद्धार्थमांगल्यवरप्रदानैः । प्रासादि० ॥
अर्घ्यं० ॥९॥

---

## अथ प्रत्येक पूजा

एकात्मध्यानसंलीनं सर्वदोषविवर्जितं ।
चंद्रप्रभं प्रभुं चार्चे सर्वदोषप्रशांतये ॥१॥
ॐ ह्रीं एकात्मध्यानसंलीनश्रीचंद्रप्रभुदेवाय अर्घ्यं ॥१॥

रागद्वेषविनिर्मुक्तं मुक्तिश्रीसंगतत्परं ।
सर्वकामप्रदं नित्यं चर्चे तीर्थंकरं विभुं ॥२॥
ॐ ह्रीं रागद्वेषरहितश्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥२॥
रत्नत्रयमयं शुद्धं तद्गुणप्राप्तयेऽनिशं ।
मनोवाक्कायसंशुद्ध्या भजे चंद्रप्रभं विभुं ॥३॥
ॐ ह्रीं रत्नत्रयस्वरूपाय श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥३॥
चतुःकषायनिर्मुक्तं संसारांभोधिपारगं ।
चतुरास्रवहंतारं सेवे दुःखौघहानये ॥४॥
ॐ ह्रीं चतुःकषायरहितश्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥४॥
महाव्रतधरं धीरं पंचसमितिराजितं ।
भवाब्धेः पारगं वंदे लोकशिखरवासिनं ॥५॥
ॐ ह्रीं पंचसमितिधारकाय श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥५॥
षड्द्रव्यज्ञातारं षट्कायरक्षणोद्यतं ।
चंद्रप्रभजिनं चर्चे भावशुद्ध्या निरंतरं ॥६॥
ॐ ह्रीं षड्द्रव्यप्रकाशकाय श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥६॥
भयसप्तकनिर्मुक्तं सप्ततत्वप्रकाशकं ।
दीपधूपफलैरासन्नतोद्योताय संयजे ॥७॥
ॐ ह्रीं सप्ततत्वप्रकाशकाय श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥७॥
जात्यादिमदसंत्यक्तं गुणाष्टकविभूषितं ।
श्रीजिनं प्रत्यहं वंदे पापशत्रुप्रहाणये ॥८॥
ॐ ह्रीं अष्टमदवर्जिताय श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥८॥
नयानां भेदवक्तारं पदार्थनवसूचकं ।

संसारदुःखनाशाय चर्चेऽहं सारवस्तुभिः ॥९॥

ॐ ह्रीं नवनयवाचकाय श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥९॥

दशधर्मयुतं धर्मध्यानदशकख्यापकं ।

मोहमल्लविजेतारं पूजयामि जिनेश्वरं ॥१०॥

ॐ ह्रीं दशधर्मप्रकाशकाय श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥१०॥

एकादशांगवक्तारं नेतारं श्रावकस्य च ।

एकादशप्रमाणायाः प्रतिमायास्तमर्चये ॥११॥

ॐ ह्रीं एकादशांगप्ररूपकाय श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥११॥

तपो द्वादशधा प्रोक्तं येन तीर्थेन स्वामिना ।

तं चार्ये श्रीप्रभुं नित्यमष्टमं श्रीसुखाकरं ॥१२॥

ॐ ह्रीं द्वादशविधतपःख्यापकाय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥१२॥

चरितं येन चारित्रं त्रयोदशविधं शुभं ।

तं जिनं प्रत्यहं वंदे मृगांकतनुसंन्निभं ॥१३॥

ॐ ह्रीं त्रयोदशचारित्रचरिताय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥१३॥

मार्गणाख्यापकं धीरं गुणस्थानप्ररूपकं ।

जलगंधादिभिश्चर्चे श्रीजिनं सुदयापरं ॥१४॥

ॐ ह्रीं चतुर्दशगुणस्थाननिरूपकाय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥१४॥

यैः प्रमादैरहो जंतुः संसारे भ्रमति स्वयं ।

तैस्त्यक्तं श्रीजिनं वंदे मोहमल्लविमर्दकं ॥१५॥

ॐ ह्रीं पंचदशप्रमादरहिताय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥१५॥

दृष्ट्यादिभावनाः पूर्वजन्मानि भाविताः स्फुटं ।

येन भव्येन जीवेन तं जिनं प्रार्चयेऽनिशं ॥१६॥

ॐ ह्रीं षोडशभावनाभावितात्मने श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥१६॥

प्रकारैः सप्तदशकैः संयमः प्रतिपालितः ।
तं ध्यायामि प्रभुं नित्यं मोक्षसौख्याभिलाषुकः ॥१७॥

ॐ ह्रीं सप्तदशविधसंयमपालकाय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥१७॥

क्षुधादिदोषकैरष्टादशभिरनुपद्रुतं ।
नवलब्धियुतं सार्वं सर्वज्ञं संस्तुवे सदा ॥१८॥

ॐ ह्रीं अष्टादशदोषनिवारकाय श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥१८॥

एकोनविंशप्रतिमसमासानां प्रभेदकाः ।
ख्यापिता येन तीर्थेन तं ध्यायामि निरंतरम् ॥१९॥

ॐ ह्रीं एकोनविंशतिजीवसमासप्ररूपकाय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं १९॥

दश द्विगुणिताः ख्याताः प्ररूपणा जिनैः स्मृताः ।
जानन्नपि स संयाति मोक्षं तद्वचसा ननु ॥२०॥

ॐ ह्रीं विंशतिप्ररूपणाप्ररूपकाय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥ २० ॥

हिंसादिपंचदुरितप्रमुखा विंशकाधिकाः ।
चंद्रेण दोषाः संत्यक्तास्तं विभुं नित्यमर्चये ॥ २१ ॥

ॐ ह्रीं हिंसादिएकविंशति-दोषरहिताय श्रीजिनचंद्रप्रभाय अर्घ्यं ॥२१॥

परीषहा द्वाविंशतिर्मर्षिता येन स्वामिना ।
तं देवं प्रत्यहं वंदे मनोवाक्कायशुद्धितः ॥ २२ ॥

ॐ ह्रीं द्वाविंशतिपरिषहमर्षिताय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥२२॥

त्रयोविंशप्रमाः प्रोक्ता जिनेन पुद्गलाणवः ।
येन देवेशचंद्रेण तं ध्यायामि निरंतरं ॥२३॥

ॐ ह्रीं त्रयोविंशतिपुद्गलाणुप्रकाशकाय श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥२३॥

चतुर्विंशप्रमाः ख्याताः सिद्धांते च परिग्रहाः ।
येन त्यक्ताः प्रभुं तं च भजे शुद्धैकचेतसा ॥२४॥
ॐ ह्रीं चतुर्विंशतिपरिग्रहरहिताय श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥२४॥

व्रतानां भावनाः प्रोक्ताः पंचविंशतिसम्मिताः ।
भाविता ध्यानसमये तं देवं सततं स्तुवे ॥२५॥
ॐ ह्रीं पंचविंशतिभावनाभाविताय श्रीचंद्रप्रभदेवाय अर्घ्यं ॥२५॥

दृष्ट्यादिभावनाः सप्तनवभिरधिका वराः ।
वृषा दश स्फुटं येन प्रणीतास्तं स्तुवे जिनं ॥२६॥
ॐ ह्रीं षड्विंशतिवृषभावनाप्ररूपकाय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥२६॥

त्रिधा स्त्रियो जिनैः ख्यातास्तास्त्यक्ताः शुद्धभावतः ।
मनोवाक्काययोगेन कृतकारितसंम्मतैः ॥२७॥
ॐ ह्रीं सप्तविंशतिमनोवाक्कायादिदोषनिवारकाय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥२७॥

मुनीनां ध्यानलीनानामष्टाविंशतिसम्मिताः।
प्रोक्ता मूलगुणा येन तमधीशं स्तुवेऽनिशम् ॥२८॥
ॐ ह्रीं अष्टाविंशतिमूलगुणप्रकाशकाय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥२८॥

रत्नत्रयगुणाः प्रोक्ता येन तीर्थेशिना वराः ।
एकोनत्रिंशत्प्रमितास्तं ध्याये सततं हृदि ॥२९॥
ॐ ह्रीं एकोनत्रिंशद्रत्नत्रयगुणप्रख्यापकाय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ।२९।

दशभिः सहिताः पंच द्विगुणाः परिकीर्तिताः ।
समासाः सर्वसत्वानां येन तं चर्चये जिनं ॥३०॥
ॐ ह्रीं त्रिंशत्जीवसमासप्रकाशकाय श्रीचंद्रप्रभजिनाय अर्घ्यं ॥३०॥

अमितगुणयुतानां श्रीजिनानां पुरस्ताद्-
बहुविधबहुभक्त्या स्वर्णपात्रे निधाय ।
कलरववरतूर्यैर्गीतनृत्यादियुक्तै-
र्वसुमितवरद्रव्यैश्चार्घमुत्तारयामि ॥२१॥
ॐ ह्रीं श्रीचंद्रप्रभजिनाय महार्घ्यं निर्वपामि स्वाहा ॥२१॥

---

## ॥ अथ जयमाला ॥

यस्यामले ज्ञानमये सुदर्शे, प्रकाशतामेति जगत्स्वरूपं ।
चराचराख्यं क्षितिपैर्नतं तं, चंद्रप्रभं देवमहं स्तवीमि ॥१॥
सतो गुणांस्तस्य प्रभुर्न वक्तुं, क्षोणीतले कोऽपि नरोऽमरो वा ।
चतुष्टयानंतसमुद्भवं तं, चंद्रप्रभं देवमहं स्तवीमि ॥२॥
देवा असंख्यातमिता जगत्यां, संतीह ये दोषशतैरुपेताः ।
न ते नृणां मोदकरा अतस्तं, चंद्रप्रभं देवमहं स्तवीमि ॥३॥
क्षमो भवान्काममतंगजस्य, मदं प्रमार्ष्टुं सकलावशस्य ।
अपूर्वकंठीरवतां दधानं, चंद्रप्रभं देवमहं स्तवीमि ॥४॥
अमेयसद्बोधकलासुभासुरं, दयोदयोद्भूतकलंकवर्जितं ।
चंद्रोऽप्यभद्रस्तुलयेत्कथं त्वां, चंद्रप्रभं देवमहं स्तवीमि ॥५॥
नागेंद्रदेवेंद्रनरेंद्रमुख्यैर्दक्षैरलक्ष्योऽसि गुणान्गृणद्भिः ।
अतो गुणातीतमतः समेषां, तमष्टमं तीर्थकरं प्रवंदे ॥६॥
सद्भक्तियुक्ता मनुजा गुणाढ्या, यमर्चयन्त्यष्टविधोपचारैः ।
ते प्राप्नुवंतीह सुखानि नित्यं, वंदेऽहकं कांतगुणं जिनेशं ॥७॥
विशुद्धबोधं दृढभक्तिकाय, प्रदेहि मे त्वद्गुणरंजिताय ।
कारुण्यबुद्ध्या प्रभुणा हि भाव्यं, विश्वेषु मत्वेति जिनेशदेवम् ॥८॥

॥ घत्ता ॥

अमितगुणगरिष्ठं नष्टकर्मारिकष्टं ।
सकलभुवननाथं सर्वदोषप्रमाथं ॥
सुरवरपतिसेव्यं चाष्टमं श्रीजिनेशं ।
प्रणयचयनियुक्तः स्तौति देवेंद्रकीर्तिः ॥९॥

इति श्रीभट्टारकदेवेंद्रकीर्तिविरचितं कवलचांद्रायण-दीपचांद्रायणधूपचांद्रायणव्रतोद्यापनं समाप्तं

---


मालेचें नवीन पुष्प

**जैन संगीत पद्यावलि**


लवकरच छापून प्रसिद्ध होईल.

यांत आधुनिक नव्या चालीच्या पद्यांचा बराच मोठा संग्रह आहे. गायनप्रेमी लोकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

पत्ता :— वीरचन्द कोदरजी गांधी
फलटण ( सातारा )

# कवलचांद्रायण–ग्रासक्रम

( अमावास्येचा उपवास )



# जंबूस्वामीनी दीक्षा

माताः—जंबु मत लोने संजम भाररे ॥ जंबु० ॥

जंबुः—रवी उगता केम रहे माता । वदन वदन कम लाय ॥ काम भोगता संसारना रे माता । ज्ञानी जो जाणत फंद रे ॥ जनुनी ॥१॥

माताः—चंद्रविना कैसी चांदनीरे जंबु । ताराविना कैसी रात ॥ कंथविना कैसी कामिनीरे जंबु । मत लोने संजम भाररे ॥ जंबु ॥२॥

जंबुः—रत्नजडीत पींजरोरे माता । वढो जाणे छे बंध ॥ काम भोगता संसारनारे माता । ज्ञानी जो जाणे फंद । मोरी सांभळोरे । जनुनी ॥३॥

माताः—तुज मुज अंधा लाकडीरे जंबु । तुज मुजही प्राणधार । तुजविना मारे जग सुनोरे जंबु । जो चाहे सोही जाण ॥ जंबु ॥४॥

जंबुः—संसारमां काइ सार नथीरे माता ॥ मोहनी रूप झाळ ॥ मुज उपर आधार मत राखोरे, मानीश नहीं आवाररे ॥ जनुनी ॥५॥

माताः—पंच महाव्रत दोहीलारे जंबु । पंचही मेरुसमान ॥ बावीस परीषह जीतवारे जंबु ॥ संजम खांढानी धार ॥ जंबु ॥६॥

जंबुः—पंच महाव्रत पालशुंरे माता । पंचही मेरुसमान ॥ बावीस परीषह जीतशुंरे माता ॥ चालीशुं खांढानी धार ॥ जनुनी ॥७॥

माताः—फुलविना झुले पीपळी जंबु ॥ फळविना झुले नागरवेल स्त्री झुले रंगमहेलमांरे जंबु ॥ माता झुले परिवार ॥ जंबु ॥८॥

जंबुः—वेन रुए क्युं कारण माता ॥ माता रुए परिवार । स्त्री रुए सुख कारण माता, धीक धीक पड्यो संसार ॥ जनुनी ॥९॥

माताः—आटला जीवोने दुःख देशोरे जंबु । क्युं करी जावोजी मोक्ष । सेज तळाईमां पोढतारे जंबु । क्युं करी सहेसो कष्ट ॥ जंबु ॥१०॥

जंबुः—ना मती कहे मोरी मायरे माता । मैं तो ले शुंके संजम-भार ॥ चोरासी लाख जीवोजोनी भमेरे माता । मैं तो केवली यो अवा-तार ॥ भव्य जीवोनी प्रति बोधशुं माता । मोक्षगामी केरो वास ॥ जनुनी ॥११॥

माताः—जंबुकुंवर वार्यो नहीं वळेरे । जेम चढीओ मेघकुमार । वनमां जई मुनि वांदीआ ॥ जंबु ॥ तीन प्रदक्षिणा दे शीर नमाय ॥ जंबु ॥१२॥

मुनिः—बाळअवस्था सुख भोगवोरे जंबु ॥ वृद्धपणें संजमभार ॥ पहेला तीर्थंकर थया रे जंबु ॥ सुख भोगी अवतार ॥ जंबु ॥१३॥

जंबुः—जो संसारमां सुख होताहो । तीर्थंकर चक्रवर्ती केम त्याग। वीषवेल नारी संसारमांहो ॥ स्वामी ॥ त्यागी चले मुनीराय ॥ स्वामी में तो ल शुंके संजमभार ॥१४॥

माताः—गुरुजी ए बहु समजावीआ । तोयन समज्या लगार । चोवीस बरसनी उमर मारे । जंबु दिक्षा लीधी निरधार ॥१५॥

—दोहरो—

मथुराक्षेत्र सोहामणो । जंबुस्वामी विख्यात ॥
पंचमुष्टी लोचन करी । गुरुजी मुद्रा धार ॥
उग्र तप बहु करी । लोकालोक प्रकाश ॥
केवलज्ञानप्रकाशके । मोक्ष गये मुनिराज ॥
जसकीर्ती सुरवर कहे । जयजय मंगलाचार ॥
जे नरनारी पढसे ते । घरघर मंगलाचार ॥

# बाहुबलीनो रास

के छोटीजी मोटीये मायेडी । के बहुबलना प्रति बूध्या हो ॥ के लोच लेईने संजम लीधो। के मन मोही दरीयो वेरागे हो ॥ वीरा मारा गजथकी ऊतऱ्या। बंधव मारा गजथकी ऊतऱ्या॥ के गज चढी केवढानी होशे हो। के दोइरे आंगोठाजी ऊपर॥ के रह्या वर्ष चौमासे हो। के पंखीडे माळाज घालीया॥ के वेलडीयो वेटाळी हो। वीरा मारा० ॥ के भामिनी सुंदरी दे बेनडी॥ के आव्यास बहुबलना पासे हो॥ के गज (हती) घोडा रथ परीहाऱ्या॥ के उजेड हेंकारहो ॥ वीरा मारा०॥ के बेनीना वचनी सुनी करी॥ के सोमा कटेर सोमेर जादा हो॥ के बहुबळ ते बेनीन पुशीऊ॥ के बेनीते जुठू नही बोलू ॥ वीरा मारा० ॥ के उचा मासपग मेलता॥ के उपन्यास केवळगन्यानो हो॥ के कर्म खपेइ निर्वाण पोक्या॥ के कर्म खपेई मुगती पोक्या॥ के वर्षे ते जयजय कारो हो॥ वीरामारा गजथकी ऊतऱ्या॥ बंधव मारा गजथकी ऊतऱ्या॥ के गज चढी केवढानी होशे हो॥

## बाहुबलीची स्तुति

किति शांत मनोहर मूर्ति बघुन वाटे धन्यता ॥धृ०॥ तप हें जयाचें श्रेष्ठ ॥ स्मृति दे ही मूर्ति स्पष्ट ॥ तनु पुष्ट ॥ चक्री बंधु कनीष्ट ॥ नाम बाहूबलि जयास ॥ तात आदीनाथ त्यास ॥ सुनंदा ॥ कुशिं जन्म सुभावें बंदुं धरुन चित्तीं विनयता ॥१॥ वृषभेशजनका आधीं ॥ शिवस्थान अविचल साधी ॥ भवव्याधी ॥ नाशी सर्व उपाधी ॥ व्हावया वैराग्य त्यांतें ॥ भरत बाहूबलि समर तें ॥ तयांच्या ॥ मनिं शल्य वसे कीं भूप भरतभूहि विषमता ॥२॥ म्हणुनी न केवलज्ञान ॥ तप घोर मेरुसमान ॥ धरि ध्यान ॥ खड्गासन राहून ॥ वेलि अहि वारूळ शरिरीं ॥ चढुन झांके तनुहि सारी ॥ असें हें ॥ भरतेश श्रवोनी वृत विनवि सोडी ॥ कुटिलता ॥३॥ श्रवुनी भरतसद्बोल ॥ कैवल्य शिव तात्काल ॥ चिरकाल ॥ भोगी सौख्य अतूल ॥ कवलचांद्रायण जयांनीं ॥ प्रथम भावें आचरोनी ॥ जनातें ॥ विधि दाखविला त्या ध्याउं सतत प्रेमें ॥ निजहिता ॥४॥ शुभ घेउनी वसुद्रव्यें ॥ करिती चकित सौंदर्यें ॥ शुचिहृदयें ॥ स्थापी वंदुन विनयें ॥ तीन वेळां तिष्ठ तिष्ठ ॥ मंत्र उच्चारून स्पष्ट ॥ पुजाया ॥ विनती करि मोदें जन्म सफल व्हाया ॥ सुजनता ॥५॥

### —बाहुबलीस्वामीचें पद—

दाक्षिणदेशीं म्हैसुरसंन्निध श्रवणबेळगुळिं असे गिरी ॥ दीपकमणि त्यावरी विराजे नामें,बाहूबळस्वामी ॥ वेष्टित ज्याचे वेलि शरीरा असा असे गोमटस्वामी ॥ सुरनरखग संतोष पावती मूर्ती त्याची बघुनि मनीं ॥ चाल-अष्टदशधनू, उंच कीं असे ॥ कांतिनें बहू, रम्य कीं दिसे ॥ चित्रवल्लिका वेष्टि शरीरा ॥ अंगुष्टीं धरी, श्रीफलानवा ॥ जैन हो ॥ चाल- चट्‌चट्‌चट्‌चट् करा तयारी मूर्ती ऐसी पहावया ॥ शुद्धमनानें आल्हादानें स्नपना घालूं आजि तया ॥१॥

### ( बाहुबली स्तुति )

बाहुबली जिनराया ॥ वंदन करितों मी तव पाया ॥धृ०॥ जो भरतासी युद्ध करुनिया ॥ सामर्थ्य दावी अतुल भुवनिं या ॥ म्हणुनी कीर्ति गाया ॥ देवो शक्ति प्रभु मज जगिं या ॥१॥ आत्मबलानें जिंकुनि

विषया ॥ द्वादशविध तप नित्य करुनिया ॥ म्हणुनि किर्ती गाया ॥ शाश्वत मुक्तीपद मिळवाया ॥२॥ पाळायासीं या ब्रह्मचर्या ॥ विद्याधनिं रत संतत व्हाया ॥ आरोग्य ज्ञणिं वाढाया ॥ घाली माळा नत होउनिया ॥३॥

( बाहुबली स्तवन )

( चाल–चंद्रकांत राजाची )

गोमटेश ! जगदीश ! मुनीशा ! गतमद गुणधीशा ! ।
मुक्तिरमेश ! सुरेश ! नरेशा ! अघहर परमेशा ! ॥
षट्खंडाधिप 'भरत' चक्रि, जो वीर जगा जिंकी ।
तुझ्यापुढें निज ऐश्वर्याची मिरवाया शेखी ॥
जेष्ठ बंधु तव निजाधीन तुज करण्या करि नाथा ! ।
दुर्वार संगर; अहंकार परिहरिला तूं संता ! ॥
अतुल शक्ति तव, अतुल शौर्यही ब्रह्मचर्य तेज ।
यशोदुंदुभी दिगंतरीं तव गर्जतसे आज ॥
'दास बनावें भरताचा' ही रुचलि न तुज वृत्ति ।
उदास झाला शांत दिगंबर बनला यतिमूर्ती ॥
खरा सुभट तूं धीर साहसी खडतर तप करुनी ।
अजिंक्य कर्मे जिंकुनि झाला ज्ञाणिं विमलज्ञानी ॥
परम सुखाचें धाम जिथें नच जननमरण-भीती ।
मदनशक्तिहर ऋषभसुता ! तूं मेळविली मुक्ती ॥
शरीर, मन दृढ असल्याविन ना साधन धर्माचें ।
धर्मसाधनाविणें कुणा हो ज्ञान न आत्म्याचें ॥
निजरूपीं रंगला चमकतें ब्रह्मचर्य त्याचें ।
वज्रदेहधर बनतो करि बलमर्दन कर्माचें ॥
शक्ति कमविली तीच विभो ! दे आम्हां वरदान ।
दास्यशृंखला खलकर्माच्या तोडाया तूर्ण ।
रविकांतीसम तेजपूर्ण, अति शांत तुझी मूर्ती ।
तुजसम व्हाया 'बालसुत'–मनीं राहो अनुदिनिं ती ॥

## ॥ श्री १०८ आ० शांतिसागराष्टक ॥

॥ स्थापना ॥

( चाल :—पांडुनृपति- )

शांतिजलधि सुगुरु असा ॥ मोहमहातम निरसा ॥ नच त्याविण जगिं सरसा ॥ अन्य कुणि यति ॥ १ ॥ दर्शितांच तुज मुनिवर ॥ अघ समस्त जाय दूर ॥ भववारिधि होय पार ॥ हे दयानिधे ॥ २ ॥ भवविपिनीं फिरुनि फिरुनी ॥ गेलों मी बहु थकुनी ॥ सांपडलासी चुकुनी ॥ सुपथ दाखवी ॥ ३ ॥ शरण दीन बालक तव ॥ स्मरण प्रभो करि सदैव ॥ देई तुझ्या चरणिं ठाव ॥ हीच विनवणी ॥ ४ ॥

ॐ ह्रीं आचार्यश्रीशांतिसागरमहामुनये अत्रावतरावतर संवौषट् आह्वाननम्
ॐ ह्रीं आचार्यश्रीशांतिसागरमहामुनये अत्र तिष्ठ तिष्ठ ठः ठः स्थापनं ॥
ॐ ह्रीं आचार्यश्रीशांतिसागरमहामुनये अत्र मम सन्निहितो भव भव वषट् सन्निधापनं ॥ परिपुष्पांजलिं क्षिपेत् ॥

चाल :—जनमानस मंदिरांत- ) राग-यमन

नमुं निश्चल शांतिसिंधू । गुणवारिधि विमल साधू ॥
सकल जनां दीन बंधु । वंद्य जगीं गुरु अराधूं ॥ धृ० ॥
घेउन शुचि जल प्राशुक । जन्म-जरा-यम क्षायक ॥
प्रक्षाळुन सुगुरुअंक । मोक्षसौख्य खचित साधुं ॥ जलं ॥
केशरमिश्रित चंदन । क्रोधादि कषाय शमन ॥
कारक गुरुपदिं लावुन । मोक्षसौख्य सहज साधुं ॥ गंधं ॥
हिमकरसम शुचि अक्षत । जें दें सुख निर्बाधित ॥

चढवुन गुरुपदिं अक्षत । मोक्षसौख्य सहज साधुं ॥ अक्षतं॥
बकुल जाइजुइ सुमना । वशकारक जे मदना ॥
वाहुन त्या गुरुचरणा । मोक्षसौख्य खचित साधुं ॥ पुष्पं ॥
सरस मधुर शुद्ध चरु । अर्पुं क्षुधारोग हरूं ॥
वंदुनि ऐसा सद्‌गुरु । मोक्षसौख्य सहज साधुं ॥ चरूं ॥
मोहसघनतम निरसा । गुरुचरणीं दीप असा ।
ओंवाळुन निर्मळसा । मोक्षसौख्य सहज साधुं ॥ दीपं ॥
धूप सुगंधित अनलीं । जो करील विधि हाली ॥
दाखवुं गुरुपदकमलीं । मोक्षसौख्य खचित साधुं ॥ धूपं ॥
अर्पुं सुरस विविध फलें । सकल भवापत्ति टळे ।
ऐशा गुरुपदकमलें । मोक्षसौख्य सहज साधुं ॥ फलं ॥
वसुद्रव्यें पात्रिं भरूं । गुरुचरणीं अर्घ्य करूं ।
तोच भवोदधिं तारु । मोक्षसौख्य खचित साधुं ॥ अर्घ्यं ॥

॥ शांतिधारा ॥

( चाल :– देइ मला इतुके रघुराया- )

राग– यमन

शांत महा सुयती गुरू राया ॥ भवजलधी तरी तूं उतराया ॥ भक्ति करी जो अपुली भावें ॥ गुण मानिं स्मरें शिवमार्गा पावे ॥

॥ पुष्पांजली ॥

( चाल :– मोहन श्याम शोभना- )

वंदन शांतिसागरा ॥ भावें स्तव करुंया ॥ भवरोग नाश करणारा ॥ धृ० ॥ शुद्ध भक्ति गुरुसेवा ॥ शिवदायी खलु जीवा ॥ याविणें तुज भ्राता ॥ अन्य कोणि नच त्राता ॥ १ ॥

## शांतिसागराष्टक

॥ स्तोत्रार्घ्य ॥

( चाल :- कशी घालूं गळ्या- )

नमुं शांति जलधि अविकारी ॥ धृ० ॥ सद्बोधा जो देउन तारी ॥ मोह सघन भवताप निवारी ॥ १ ॥ शिवपथ-दायक सद्‌गुरु ऐसा ॥ कुमती, कुगति, कुरिती, नाशी जन उद्धारी ॥ २ ॥

॥अथ जयमाला॥

( चाल :- श्रीशांतिशरणमें )

स्वामी शांत दयानिधि सत्य मुनी ॥ धृ० ॥ शांतमुद्रा पाहुनी तव क्रूर पशु खल मानव ॥ लीन त्वत्पादिं होउनी हृदिं धारिती गुण मार्दव ॥ होई मोद अनावर सकल मनीं ॥ १ ॥ करुन तुंचि विहार जगभर केवलीसम मुनिवरा ॥ दाविला सन्मार्ग बोधुनि भावि मुक्तिच्या वरा ॥ तेणें त्यागिति जन मिथ्यात्व झणीं ॥ २ ॥ लागती तव पाद जेथें शुद्र क्षत्रियादिक बोधामृतें तव मद्य मधुपल त्यजुनि बनति अहिंसक ॥ महती थोर अशी तव सर्वजनीं ॥ ३ ॥ दुःखि रोगी तव निकट कस-लाहि येइ असावध ॥ वरदहस्तें होय आपुल्या सुखि निरोगी सावध ॥ ऐसी जीवनशक्ती तुझ्या वचनीं ॥ ४ ॥ लाभे न ऐसा सुगुरु आजवरी पुढेंहि दुर्मिळ ॥ शरण जा जनहो त्वरित मनीं भाव ठेउनि निर्मळ ॥ शांतीसागर परम यती चरणीं ॥ ५ ॥ तोचि या भवजलनिधींतुन नेइ तारुनि आपणां ॥ प्रेमभक्तीनें सकल गाऊं निरंतर तद्गुणा ॥ होऊं दंग सुपुज्य गुरुभजनीं

॥ ६ ॥ दास भृंग तुझ्या पदाब्जीं होउनी रत रमतसे ॥ भक्तीवशें अपुल्या अहर्निशि जरि अती जडधी असे ॥ वाहे मन तव विमल सुयश कवनीं ॥ ७ ॥ गुंफुनी गुणसुमनमाला स्वामि जय जय बोलुनी ॥ शुद्ध वसुद्रव्यार्घ्य अर्पण करितसूं कर जोडुनी ॥ २ ॥ जाण्या घोर भवाब्धींतुन तरुनी ॥ ८ ॥

## ॥ आशिर्वाद ॥

( चाल :– चलो चालो )

मुनिसंघा वंदुं चला ॥ धृ० ॥ शुद्ध भाव मनिं धरुनि विनवुंया ॥ चिंतूं नित तद्वाणिला ॥ १ ॥ संघ न ऐसा पुनरपि भेटे ॥ दवडि समय नच स्वल्प भला ॥ २ ॥ इच्छु चिरायू मुनिवर आदी सकल नमुनि जिनपद कमलां ॥ ३ ॥

## आरती

( चाल :– बँडची )

करूं आरती वदुं जय शांति हरि भ्रांति मंगलमय ही ज्योति ॥ धृ ॥ सकल जना हितकारक ॥ भवजलधी जो तारक ॥ नमुं ऐसा मुनिनायक ॥ गाउन तद्-गुण किर्ती ॥ करूं आरती ॥१॥ होतां सद्गुरुप्रसाद ॥ घडुं न दे कधीं प्रमाद ॥ तद्वाणी निर्विवाद ॥ आठवून निज चित्तीं ॥२॥ सम्यग्-दृग-ज्ञान मूर्ति ॥ सुआचरणीं चक्रवर्ति ॥ कलियुगिं तव थोर ख्याति ॥ वदुं जय जय जय शांति ॥३॥ दास जरी मंदमती ॥ भक्तिवशें ये स्फूर्ति ॥ प्रगट होय आत्मज्योति ॥ नष्ट होय झणि कुमति ॥४॥

समाप्त